सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. ०२ सप्टेंबर २०२५ वर्ष - तिसरे अंक १५१ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मनोज जरांगे आंदोलनावर हायकोर्टाचे १० धडाकेबाज निरीक्षणं!

## सरकारने तात्काळ पावलं उचलावी नाहीतर...हायकोर्टाचा इशारा

मुंबई : मुंबईतील आझाद मैदानात मनोज जरांगे पाटील (चरपेक्ष क्षरीरपसश) यांनी मागील चार दिवसांपासून आमरण उपोषण सुरू ठेवले आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी त्यांनी उचललेलं पाऊल आता न्यायालयापर्यंत पोहोचलं आहे. आज मुंबई उच्च न्यायालयात या आंदोलनासंदर्भातील याचिकांवर सुनावणी पार पडली. सुनावणीदरम्यान राज्य सरकारने न्यायालयाला कळवलं की, आझाद मैदानावर सुरू असलेल्या उपोषणासाठी सरकारकडून कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही. यासोबतच, याचिकाकर्ते मनोज जरांगे पाटील यांचे वकील आणि हस्तक्षेप याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी आपली बाजू मांडली. न्यायालयाने सर्व बाजू ऐकून घेतल्यानंतर महत्त्वाची निरीक्षणं नोंदवली असून राज्य सरकारला आवश्यक आदेशही दिले आहेत. याचबरोबर, मराठा आरक्षणासंदर्भातील सर्व याचिकांवर उद्या दुपारी तीन वाजता पुढील सुनावणी होणार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनावर आज मुंबई उच्च न्यायालयात महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. या सुनावणीत न्यायालयाने सरकार तसेच आंदोलकांच्या वकिलांना काही महत्त्वपूर्ण सूचना केल्या. न्यायालयाने स्पष्ट केलं की, मोठ्या संख्येने आंदोलक मुंबईत एकत्र येऊ नयेत. विशेषतः ५००० पेक्षा जास्त आंदोलकांनी शहरात उपस्थित राहू नये, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. यासाठी कायद्यातील तरतुदीनुसार योग्य ती कारवाई करावी, अशा सूचनाही न्यायालयाने राज्य सरकारला केल्या आहेत. दरम्यान, आंदोलना थांबविण्याची मागणी काही बाजूंनी करण्यात आली होती. मात्र, न्यायालयाने या संदर्भात कोणताही थेट आदेश देण्यास नकार दिला. त्यामुळे आंदोलन सुरू ठेवायचं की थांबवायचं, हा निर्णय आता आंदोलक आणि प्रशासन यांच्या पातळीवरच ठरणार आहे.

**हायकोर्टाच्या राज्य सरकारला सूचना**

आरोग्य आणि अन्नपुरवठा आझाद मैदानावर उपोषण करणाऱ्या आंदोलनकर्त्यांना तातडीने वैद्यकीय उपचार आणि जेवणाची सोय करून द्यावी, असे स्पष्ट आदेश न्यायालयाने दिले.

परवानगीशिवाय आंदोलन- कायदेशीर कारवाई आंदोलनाला अधिकृत परवानगी नसल्याने



कायद्यानुसार कारवाई करण्यास राज्य सरकार मोकळं आहे. तसेच, आणखी आंदोलनकर्त्यांनी मुंबईत येऊ नये यासाठी सरकारने खबरदारी घ्यावी.

मुंबईत प्रवेश रोखा नवीन आंदोलनकर्त्यांनी मुंबईत येण्याचा प्रयत्न केला, तर त्यांना थांबवण्यासाठी योग्य पावले उचलावीत, असे निर्देश हायकोर्टाने दिले.

दक्षिण मुंबईतील ठिकाणे रिकामी करा उड्चढ, मरिन ड्राईव्ह, फ्लोरा फाऊंटन आणि दक्षिण मुंबईतील महत्त्वाच्या परिसरातून आंदोलनकर्त्यांना हटविण्याचे आदेश न्यायालयाने राज्य सरकारला दिले.

शहराच्या दैनंदिन जीवनाचा प्रश्न शाळा-कॉलेज बंद पडल्यास विद्यार्थ्यांचे काय? दूध-भाजीचा पुरवठा ठप्प झाल्यास काय परिणाम होतील? याबाबत हायकोर्टाने सरकारला थेट विचारणा केली.

आंदोलनाचा आवाज न्यायालयात पोहोचला न्यायालयीन सुनावणीदरम्यान आंदोलनकर्त्यांचा आवाज कोर्टात ऐकू आल्याने हायकोर्टाने आश्चर्य व्यक्त केले.

हायकोर्टाच्या आंदोलकांच्या वकिलांना थेट सूचना

५००० आंदोलकांनाच परवानगी हायकोर्टाने आंदोलकांच्या वकिलांना विचारलं, २६ ऑगस्टचा आदेश पाळणार का? फक्त ५००० लोकांनाच परवानगी आहे, त्यापेक्षा जास्त नाही.

अधिक लोकांना परत पाठवा ५००० पेक्षा अधिक लोक मुंबईत आले असल्यास त्यांना परत जाण्याचे प्रसिद्धीपत्रक काढणार का, अशी सरळ विचारणा न्यायालयाने केली.

शहर पूर्ववत करा मुंबई थांबवली जाऊ शकत नाही, कारण गणेशोत्सवही जवळ आला आहे. त्यामुळे रस्ते आंदोलनकर्त्यांनी मोकळे करून स्वच्छ करावेत आणि आझाद मैदान वगळता इतर सर्व ठिकाणे दुपारपर्यंत रिकामी करावीत, असे स्पष्ट निर्देश न्यायालयाने दिले.

फोटो-व्हिडिओंचा पुरावा न्यायालयात दाखवलेले फोटो आणि व्हिडिओ पाहून रस्ते अडवले जात असल्याचे स्पष्ट दिसते, असे निरीक्षण हायकोर्टाने नोंदवले.

आंदोलन हाताबाहेर गेले मुंबई थांबवणे, रस्ते अडवणे किंवा दिनचर्या विस्कळीत करणे शक्य नाही. पण प्रत्यक्षात हेच घडत असल्याचे हायकोर्टाने नमूद केले. दरम्यान, हायकोर्टात ॲड श्रीराम पिंगळे, ॲड रमेश दुबे पाटील, ॲड वैभव कदम यांनी आंदोलनकर्त्यांनी बाजू मांडली

**हायकोर्टाचे महत्त्वाचे निरीक्षण- मराठा आंदोलनावर गंभीर टिप्पणी**

आंदोलन हाताबाहेर गेलं मुंबईतील मराठा आंदोलन नियंत्रणाबाहेर गेलं असल्याचं थेट निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवलं. आंदोलनाला दिलेल्या परवानगीच्या निर्णयाकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

वर्तमानपत्रातील बातमीची दखल मागणी पूर्ण होईपर्यंत आमरण उपोषण, तोवर मुंबई सोडणार नाही या मजकूरासह आलेल्या वर्तमानपत्रातील बातमीची उच्च न्यायालयाने दखल घेतली.

कबड्डी खेळतानाचा फोटो न्यायालयात वर्तमानपत्रात छापलेला आंदोलक कबड्डी खेळतानाचा फोटो देखील न्यायालयाच्या निदर्शनास आला.

सिग्नलवर नाचणारा व्हिडिओ सिग्नलवर नाचणाऱ्या आंदोलकांचा व्हिडिओ उच्च न्यायालयात सादर करण्यात आला.

संयोजकांवर प्रश्नचिन्ह आंदोलनकर्ते हे आयोजकांच्या नियंत्रणात नाहीत, अशी गंभीर नोंद हायकोर्टाने केली.

स्टेडियम धोक्यात? वानखेडे आणि ब्रेबॉन सारखी ऐतिहासिक स्टेडियम्स आंदोलकांनी व्यापली तर त्यांचे नुकसान होईल, मैदानांवर झोपण्याचीही शक्यता आहे, अशी चिंता हायकोर्टाने व्यक्त केली.

हायकोर्ट परिसराला घेराव मुंबईत संपूर्ण उच्च न्यायालय परिसराला आंदोलनकर्त्यांनी घेराव घातल्याचं न्यायालयात नमूद करण्यात आलं.

न्यायमूर्तींच्या गाड्यांना अडथळा हायकोर्ट न्यायमूर्ती स्वतः म्हणाले की, त्यांच्या गाड्यांना अडवण्यात आलं आणि न्यायालयात प्रवेश थांबवण्यात आला.

# डिजिटल जनगणनेसाठी गृह मंत्रालयाने मागितला १४.६१९ कोटींचा अर्थसंकल्प

नवी दिल्ली, ०१ सप्टेंबर : भारतामध्ये जनगणना २ टप्प्यांमध्ये पार पडणार आहे. आता भारताच्या नोंदणी महानियंत्रक (आरजीआय) यांनी जनगणनेसाठी १४ हजार ६१८.९५ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मागितला आहे. यावेळी जातनिहाय मोजणी आणि जनगणना प्रथमच डिजिटल पद्धतीने होणार आहे. आरजीआय हे केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाच्या अखत्यारीत येते. आरजीआयने एस्पेंडिजचर फायनन्स कमिटीकडे (ईएफसी) गेल्या महिन्याच्या सुरुवातीला

मान्यता मिळवण्यासाठी एक नोट पाठवली होती. ईएफसीने हे वित्त मंत्रालयाच्या अखत्यारीत आहे. ईएफसीची मान्यता मिळाल्यानंतर गृह मंत्रालय केंद्रीय मंत्रिमंडळाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव मांडणार आहे. मागणी केलेला हा अर्थसंकल्प दोन्ही टप्प्यांतील जनगणनेसाठी आहे.पहिल्या टप्प्यात घरांची यादी तयार करणे आणि घरांची जनगणना करणे, तर दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्येची मोजणी केली जाणार आहे. ही जनगणना प्रथमच पूर्णपणे डिजिटल माध्यमातून होणार आहे. मोबाइल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून आकडे संकलित केले जातील. जनतेलाही स्वतःची माहिती स्वतः भरता येईल अशी सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे आणि जातीनिहाय माहिती देखील इलेक्ट्रॉनिक स्वरूपात गोळा केली जाईल. गेल्या ३० एप्रिल रोजी सीसीपीएने जनगणनेत जातीनिहाय गणना समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला होता. आरजीआय ही संपूर्ण प्रक्रिया मॉनिटर करणे, अधिकृत वेबसाइट आणि 'सेन्सस मॅनेजमेंट एन्ड मॉनीटरिंग सिस्टीम' (सीएमएमएस) विकसित करण्याचे काम करत आहे. जनगणनेसाठी ३५ लाखांहून अधिक पर्यवेक्षक आणि गणनाकार नियुक्त केले जातील. ही संख्या २०११ मध्ये नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांपेक्षा ३० टक्क्यांनी अधिक आहे. केंद्र सरकारने १६ जून रोजी २०२७ साली होणाऱ्या जनगणनेसाठी अधिसूचना जारी केली होती. ही पहिलीच वेळ आहे की, जनगणनेत ६ वर्षांची विलंब झाला आहे.

डिसेंबर २०१९ मध्ये, केंद्रीय मंत्रिमंडळाने २०२१ मध्ये ८.७५४.२३ कोटी रुपये खर्चून जनगणना करण्यास मंजुरी दिली होती. ती जनगणनादेखील दोन टप्प्यांत होणार होती, परंतु कोरोना महामारीमुळे ती होऊ शकली नाही. भारतात १८७२ पासून सातत्याने जनगणना होत आली आहे. आगामी २०२७ मधील जनगणना ही एकूण सोळावी आणि स्वातंत्र्यानंतर आठवी जनगणना असेल.जनगणनेच्या प्रक्रियेदरम्यान गावे, कसबे आणि वॉर्ड स्तरांवर लोकसंख्येची माहिती गोळा केली जाते. यामध्ये निवास स्थिती, सुविधा, धर्म, भाषा, साक्षरता, स्थलांतर आणि शिक्षण यासंबंधित आकडेवारी घेतली जाते.

# अभिनेता सलमान खानने घेतली राजनाथ सिंह यांची भेट





नवी दिल्ली : अभिनेता सलमान खानने आज, रविवारी दिल्लीत लखनौचे खासदार आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेतली. दोघांमध्ये सुमारे ४५ मिनिटे चर्चा झाली. राजनाथ यांचा धाकटा मुलगा नीरज सिंहने सलमानचे गेटवर स्वागत केले. सलमानने राजनाथ सिंह यांना त्यांच्या घरी गणपती पूजेला उपस्थित राहण्याचे आमंत्रणही दिले.

दरम्यान दोघांमधील संभाषणाचा तपशील उघड झालेला नाही. माहितीनुसार, सलमान त्याच्या वैयक्तिक कामासाठी राजनाथ सिंह यांना भेटण्यासाठी आला होता. २०२३ मध्ये लॉरेन्स गँगकडून धमक्या मिळाल्यानंतर सलमानची सुरक्षा वाढवण्यात आली होती. महाराष्ट्र सरकारने त्याला ध+ श्रेणीची सुरक्षा दिली आहे.

दोघांमधील भेटीचे फोटो समोर आलेले नाहीत. फक्त नीरज सिंह सलमानचे स्वागत करतानाचा फोटो समोर आला आहे. यामध्ये सलमानने निळा शर्ट घातला आहे. बिहारमध्ये निवडणुका आहेत. अशा परिस्थितीत राजकीय वर्तुळात या भेटीचे राजकीय अर्थही काढले जात आहेत.

# पंतप्रधान मोदींकडून अफगाणिस्तानात झालेल्या भूकंपाबद्दल शोक व्यक्त

नवी दिल्ली, १ सप्टेंबर - रविवारी रात्री उशिरा अफगाणिस्तानात झालेल्या भूकंपात ८०० हून अधिक नागरित मृत्युमुखी पडल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. अफगाणिस्तानमध्ये झालेल्या या आपत्तीत झालेल्या जीवित आणि मालमत्तेच्या नुकसानीबद्दल मी खूप दुःखी आहे असे ते म्हणाले.

पंतप्रधानांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, या कठीण काळात भारत शोकग्रस्त कुटुंबांसोबत उभा आहे आणि जखमींना लवकर बरे व्हावे अशी शुभेच्छा देतो. भारत अफगाणिस्तानातील बाधित नागरिकांना सर्वतोपरी मानवतावादी मदत आणि मदत करण्यास तयार आहे. भारत भूतकाळात नैसर्गिक आपत्तींदरम्यान आंतरराष्ट्रीय सहकार्यात आघाडीवर राहिला आहे आणि यावेळीही तो मागे राहणार नाही.

# आता कोर्टाच्या आदेशांचं प्रशासन पालन करेल - फडणवीसांचा इशारा

मुंबई : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनावर आज मुंबई उच्च न्यायालयात महत्त्वपूर्ण सुनावणी पार पडली. या सुनावणीत न्यायालयाने स्पष्ट आदेश देत म्हटलं आहे की उद्या दुपारी ४ वाजेपर्यंत आझाद मैदान वगळता, मुंबईतील इतर सर्व ठिकाणी आंदोलकांनी हटले पाहिजे. न्यायालयाने आंदोलकांच्या वर्तणुकीवर कठोर शब्दांत नाराजी व्यक्त केली. आंदोलकांमुळे रस्ते अडवले गेले, सार्वजनिक जीवन विस्कळीत झाले आणि अगदी न्यायमूर्तींच्या गाड्यांनाही अडवण्यात आलं, यावरून न्यायालयाने तीव्र अप्रसन्नता दर्शवली. न्यायालयाने सरकारलाही तात्काळ प्रभावी पावलं उचलण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, या सुनावणीनंतर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया दिली. त्यांनी म्हटलं की, सरकार न्यायालयाच्या आदेशाचा मान ठेवून आंदोलकांशी संवाद साधेल



आणि परिस्थिती नियंत्रणात आणेल.

प्रशासन कोर्टाचा निर्णय अंमलात आणेल

ज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, मी प्रवासात असल्यामुळे नेमकं कोर्टाने काय म्हटलं आहे ते मी प्रत्यक्ष ऐकू शकलो नाही. मात्र मला जे समजले त्यानुसार, न्यायालयाने पूर्वी आंदोलकांना परवानगी देताना काही अटी-शर्ती घातल्या होत्या. त्या अटी-शर्तींचं वारंवार उल्लंघन होत असल्याचं कोर्टाच्या निदर्शनास आलं आहे. फडणवीस पुढे म्हणाले की, आंदोलकांकडून रस्त्यांवर जे प्रकार सुरू आहेत, त्याबाबत उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे न्यायालयाने प्रशासनाला काही स्पष्ट निर्देश दिले असून, आता प्रशासन हे निर्णय योग्य प्रकारे अंमलात आणेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या या प्रतिक्रियेतून स्पष्ट होतं की राज्य सरकार न्यायालयाच्या आदेशांना गांभीर्याने घेणार असून, आंदोलनामुळे बाधित झालेल्या सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाला पूर्ववत करण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या जाणार आहेत.

उपसमिती बैठकीत आरक्षणावर सखोल चर्चा

आमच्या झालेल्या बैठकीत आम्ही सर्व कायदेशीर बाबींचा आणि विविध पर्यायांचा सखोल विचार केला आहे. तसेच, हे पर्याय न्यायालयात कशा प्रकारे टिकतील यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. फडणवीस म्हणाले की, याबाबत अधिक माहिती मागवण्यात आली असून ती मिळाल्यानंतर पुन्हा एकदा बैठकीत चर्चा करण्यात आली आहे. त्यांनी स्पष्ट केलं की, मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर कोणताही मार्ग काढायचा असल्यास तो पूर्णपणे कायदेशीर चौकटीत राहूनच काढला जाईल. राज्य सरकारची कार्यवाहीही याच दृष्टीने सुरू असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. त्यामुळे सरकार या संवेदनशील प्रश्नावर केवळ तात्पुरता तोडगा न काढता, कायद्याच्या चौकटीत राहून दीर्घकालीन तोडगा शोधण्याच्या प्रयत्नात असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

महिला पत्रकारांशी गैरवर्तन

मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर गंभीर आणि चिंताजनक घटना उघडकीस आली आहे. काही आंदोलकांकडून महिला पत्रकारांवर हल्ला करण्याचा किंवा त्यांचा विनयभंग करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप समोर आला आहे. पत्रकारांशी केलेले असे वर्तन हे आंदोलनाला मोठं गालबोट लावणारं असल्याचं स्पष्ट करण्यात येत आहे. गेल्या काही वर्षांत ३० पेक्षा अधिक मराठा मोर्चे पार पडले असून ते शिस्तबद्ध आणि शांततेत झाल्याचं सर्वांनी पाहिलं आहे. त्या वेळी सरकारने सकारात्मक पद्धतीने निर्णय घेतलेले उदाहरणे आहेत. मात्र, पत्रकारांवर हल्ला किंवा छळ झाल्याने आंदोलनाची सकारात्मक प्रतिमा मलीन होत असल्याची भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, पत्रकार हे आपलं काम प्रामाणिकपणे बजावत असतात. त्यांना त्रास देणे किंवा हल्ला करणे हे महाराष्ट्राच्या संस्कृतीला आणि परंपरेला शोभणारे नाही. त्यामुळे या घटनांचा सर्व स्तरातून तीव्र निषेध होणे आवश्यक असल्याचे मत नोंदवले जात आहे.




# पावसाची धडाकेबाज एंट्री! कोकण-घाटमाथ्यावर ऑरेंज अलर्ट, मराठवाडा-विदर्भात सतर्कतेचा इशारा

मुंबई : यंदाचा ऑगस्ट महिना महाराष्ट्रासह देशासाठी पावसाळी ठरला आहे. मराठवाडा आणि विदर्भात तर हा पाऊस शेतकऱ्यांसाठी अक्षरशः बोनस ठरला आहे. लातूर, नांदेड, धाराशिव आणि बीड जिल्ह्यांत सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला असून, शेतीला मोठा दिलासा मिळाला आहे. विदर्भातील नागपूर, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांसोबतच उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार तसेच सातारा जिल्ह्यातही अति मुसळधार पावसाची नोंद झाली आहे. दरम्यान, मुंबईसह मध्य महाराष्ट्रालाही ऑगस्ट महिन्यात पावसाने चांगलाच झोडपून काढलं. भारतीय हवामान खात्याच्या माहितीनुसार, ऑगस्टमध्ये तुफानी हजेरी लावल्यानंतर आता सप्टेंबर महिन्यातदेखील देशभरात सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता वर्तवली आहे. पुढील सात दिवसांत कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, गुजरात आणि कर्नाटकच्या सीमावर्ती भागात जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

देशभरात पुन्हा मुसळधार पावसाचा इशारा!

भारतीय हवामान विभागाने आगामी दिवसांसाठी दिलेला अंदाज महत्वाचा ठरला आहे. सध्या समुद्राच्या तळाशी मान्सूनची द्रोणीय परिस्थिती सक्रिय असून, त्यामुळे कमी दाबाचा पट्टा तयार होत आहे. याचबरोबर राजस्थानच्या मध्यभागी चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, २ सप्टेंबरपासून बंगालच्या उपसागरावर नव्याने कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. या प्रणालीमुळे देशाच्या विविध भागांत पुढील काही दिवसांत जोरदार ते अतिजोरदार पावसाची हजेरी लागणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामान खात्याच्या या अंदाजामुळे पावसावर अवलंबून असलेल्या शेतीला दिलासा मिळणार असून, नागरिकांना मात्र सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र-गुजरातसह कोकण, गोव्यात मुसळधार पावसाचा इशारा

सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीलाच पावसाने जोरदार हजेरी लावण्याची चिन्हे दिसत आहेत. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, पुढील सात दिवसांत गुजरात, कोकण-गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा या भागांत तुफान पावसाची शक्यता आहे. विशेषतः २ आणि ३ सप्टेंबर रोजी कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र तसेच मराठवाड्यात मुसळधार पाऊस कोसळण्याचा अंदाज आहे. तर ३, ४ आणि ५ सप्टेंबर रोजी कोकण-गोवा आणि मध्य महाराष्ट्र या भागांत अति मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. या अंदाजामुळे शेतीला पाण्याचा मुबलक पुरवठा होण्याची अपेक्षा असली तरी, नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन हवामान विभागाने केले आहे.

पुढील चार दिवसांचा पावसाचा कहर!

हवामान विभागाने पुढील चार दिवसांसाठी महाराष्ट्रातील विविध भागांना अलर्ट जारी केला आहे. आजपासूनच तळ कोकणासह पुणे, सातारा आणि कोल्हापूर घाटमाथ्यावर जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, मराठवाड्यातही पावसाची धमक कायम असून, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने येलो अलर्ट जारी केला आहे. विदर्भही पावसापासून वंचित राहणार नाही. नागपूर, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये पुढील चार दिवसांत मुसळधार पावसाचा जोर राहणार असल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. राज्यातील शेतकऱ्यांना यामुळे दिलासा मिळणार असला, तरी नद्यांच्या पातळीत वाढ, तसेच पाणी साचण्याची शक्यता लक्षात घेऊन नागरिकांनी सतर्क राहावे, असा इशारा हवामान खात्याने दिला आहे.

०२ सप्टेंबर : उद्यापासून (२ सप्टेंबर) राज्यभरात पावसाची तीव्रता वाढणार असून, हवामान विभागाने विविध जिल्ह्यांना अलर्ट जारी केला आहे. सातारा, सांगली आणि कोल्हापूर घाटमाथ्यावर ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर तळ कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड आणि पुणे घाटमाथ्यासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान, मराठवाड्यात लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. उत्तर महाराष्ट्रात नाशिक, धुळे, नंदुरबार आणि जळगाव या जिल्ह्यांनाही पावसाचा फटका बसणार आहे.

०३ सप्टेंबर : सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड तसेच पुणे, सातारा आणि कोल्हापूर घाटमाथ्यावर ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. या भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. मुंबई, ठाणे, पालघर, नाशिक, नगर, पुणे, बीड, परभणी, हिंगोली, जालना, छत्रपती संभाजीनगर तसेच संपूर्ण विदर्भात यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. येथे पावसाची जोरदार हजेरी लागण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे आणि जळगाव जिल्ह्यांमध्येही ३ सप्टेंबर रोजी तुफानी पाऊस कोसळणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

०४ सप्टेंबर : रत्नागिरी, रायगड, पालघर तसेच पुणे, सातारा आणि कोल्हापूर घाटमाथ्यावर ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. या भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता असून, नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, सिंधुदुर्ग, मुंबई, ठाणे, नाशिक, नगर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, जालना, जळगाव, धुळे, नंदुरबार आणि संपूर्ण विदर्भासाठी यलो अलर्ट जारी केला गेला आहे. या भागांत जोरदार पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

www.tarunbharat.net
तरुण भारत
छोटे उस्ताद



## तुम्हाला माहिती आहे का?

- मौल्यवान धातू आणि वस्तूंचे वस्तुमान मोजण्यासाठी एकक म्हणून कॅरटचा वापर केला जातो. खरा शब्द कॅरोब असा आहे, जे एक झाडाचे नाव आहे, ज्याच्या बिया एक समान वस्तुमानाच्या असतात असा समज आहे. कॅरोब्स, वाटाणा कुटुंबातील भूमध्यसागरीय प्रदेश आणि मध्य पूर्वेमध्ये आढळणारे स्थानिक झाड आहे. भारतात मात्र पूर्वी मौल्यवान वस्तूंचे वजन मोजण्यासाठी गुंजाच्या बिया वापरण्यात येत. गुंजा बी एकसमान असून या बियाण्याला किड लागत नाही.

## अशी पाखरे येती

निशिकांत मायी / ९८८११५२४३९

# सोनपाठी सुतार

निसर्गाने अनेक पक्ष्यांना विविध रंगांची देणगी बहाल केली आहे. प्रत्येक पक्षी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण रंगांनी प्रचलित होतो. सोनपाठी सुतार नामक पक्षी एक पक्षी आहे, ज्याला निसर्गाने सोनेरी पाठ प्रदान केली आहे. पाठीचा रंग सोनेरी असल्याने त्याला सोनपाठी सुतार असे नाव पडले आहे. सुमारे ३० सेंमी आकाराचा सोनपाठी सुतार या पक्ष्याला मराठीत सोनटी असेही म्हणतात. संपूर्ण भारतात आढळून येणारा सोनपाठी सुतारच्या नर पक्ष्याच्या पाठीचा रंग सोनेरी पिवळा असतो. त्याच्या डोक्यावर लाल तुराही दिसतो. डोळ्याच्या जवळ काळे आणि पांढुरके पट्टे असून, पोट फिकट पांढऱ्या रंगाचे असते. विविध जंगलात, बागांमध्ये तो प्रामुख्याने विहरताना नजरेस भरतो तो त्याच्या सोन्याच्या रंगाच्या पाठीच्या रंगामुळे! कीटक किंवा



त्यांची अंडी तसेच फळे, बिया आणि मध हा या पक्ष्यांचा आहार असून झाडाच्या सालीत लपलेले कीटक पकडण्यासाठी वेगाने झाडाच्या खोडात छिद्र पाडतो आणि ही याची विशेषता आहे. कीटकांशिवाय पिकलेली फळेही या पक्ष्याला आवडतात. उडताना कर्कश्श ओरडणे ही याची प्रमुख ओळख असून, या आवाजावरून त्याला सहज शोधून काढता येते. जमिनीपासून उंचावरील झाडाच्या ढोलीत सोनपाठी सुतार घरटे तयार करतो आणि तिथे मादी विणीच्या हंगामात एकाच वेळी दोन ते तीन चमकदार अशी पांढऱ्या रंगांची अंडी देते. नर आणि मादी दोघेही पिलांची देखभाल करून कालांतराने सोन्याच्या रंगाची पाठ असणारे पुन्हा जीव जन्माला येऊन सोनपाठी सुताराची वंश परंपरा सुरू होते.

सुतार पक्ष्यांप्रमाणेच हे पक्षीही झाडांमध्ये खोबणी करून घरटे बनवतात. तिथेच मादी सोनपाठी सुतार पिलांचे संगोपन करतात. सोनपाठी सुतार या पक्ष्याच्या रंग आणि आकारावरून त्याच्या उपजाती असल्याची नोंद करण्यात आली आहे. काळ्या रंगाची शेपटी या पक्ष्याला लाभली आहे. नर आणि मादी दोघेही दिसण्यात सारखेच असतात. मात्र, दोघांच्या रंगांवरून नर आणि मादीची ओळख पटवता येते. भारतासह पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका येथे दोन तर म्यानमार येथे तीन उपजाती नोंदविण्यात आल्या आहेत. सोनपाठी सुतार पक्षी

## Math Puzzle

Solve the puzzle and answer it

A * A * A = 27

A * B * B * B = 24

A * B * C * C = 96

A * B * C = ?




## प्रश्नसंच - २७



तरुण भारतचा अभिनव उपक्रम

# ज्ञानांजली!

**संतश्रेष्ठ** गजानन महाराज यांच्या चरित्राविषयी सविस्तर जाणून घेण्यासाठी श्रीगजानन महाराज अध्ययन समूह, नागपूरच्या सहकार्याने तरुण भारतच्या वतीने, 'ज्ञानांजली' हा अभिनव उपक्रम सुरू आहे. श्री गजानन विजय या ग्रंथावर आधारीत दहा प्रश्न दर शनिवारी आकांक्षा पुरवणीत प्रसिद्ध केले जातील. अचूक उत्तर निवडण्यासाठी चार पर्यायही दिले जातील. ज्ञानांजलीतील सर्व १० प्रश्नांची अचूक उत्तरं देणाऱ्या भाग्यवंत भक्तांची नामावली पुढच्या आकांक्षामध्ये प्रकाशित करू. ही प्रश्नावली तुम्हाला गूगल फॉर्म स्वरूपातच सोडवायची आहे. प्रिंट किंवा हस्तलिखीत स्वरुपात दै.तरुण भारत कार्यालयाकडे ती पाठवू नये. आपली ज्ञानसेवा श्रींच्या चरणी रुजू करण्याची ही सुवर्णसंधी आहे. प्रत्येक शनिवारी गूगल फॉर्म मिळविण्यासाठी 'तरुण भारत नागपूर' या आमच्या व्हॉट्स ॲप चॅनेलला फॉलो करा. अधिक माहितीसाठी सुरेखा देशपांडे ९८२२४४४२४५ या क्रमांकावर संपर्क करा.

### ओवीतील चूक चरण ओळखा

१) अ) **तैसी लोचटा तुझी कृति**
ब) गरिबावर असते प्रीती
क) झाली जयाला विरक्ती
ड) त्यानेच येथे यावे रे

२) अ) **सच्चिदानंद करुणालया**
ब) थोरा न आणी कमीपणा
क) हे जाणोन नारायणा
ड) गणू हा ठेवा संग्रही

३) अ) **निज भक्तांचे मनोरथ**
ब) समर्थ कैसे पुरवितात
क) ते येईल ध्यानात
ड) स्वामी शेगावग्रामीचे

४) अ) **हा ग्रंथ केवळ चिंतामणी**
ब) चिंतिले फळ देईल जाणी
क) त्याच्या अवघ्या मनकामना
ड) हे मात्र विसरू नका

५) अ) **म्हणून आदरे वंदना**
ब) विघ्ने अवघी भस्म होती
क) कापुसाचा पाड किती
ड) अग्निपुढे दयाघना !

६) अ) **भूपतीचा वशिला**
ब) मोठा नाही कोणी आन
क) देवा मम पातकालागून
ड) किमपि आता पाहू नको

७) अ) **बोल आता झडकर**
ब) काय तुझा विचार
क) त्याचा उपयोग करावा
ड) देणे घेणे चालते

८) अ) **तू जननी जनिता सद्गुरू**
ब) तू भक्तांना कल्पतरू
क) भवनदीचे भव्य तारू
ड) तूच की रे विठ्ठला

९) अ) **श्रोते या प्रपंचात**
ब) संकटे येती अतोनात
क) जो जो आला शरण पदा
ड) लोभ त्याचा मानावा

१०) अ) **परी तो जे काही बोलला**
ब) ऐसे बोलिला जरी बरवे
क) खोटेपणाचा राग आला
ड) म्हणून गेले उठोन

### प्रश्नसंच क्र. २६ चे भाग्यवान विजेते

संध्या चावडीपांडे, शर्वरी परब, राजेंद्र शानी, प्रसाद कावळे, अंजली भानेगावकर, अनघा वैद्य, नंदिनी कुलकर्णी, दिपाली पाटील, ओंकार गावडे सुनीता सोनारे, उज्वला कुलकर्णी, सुजाता कुलकर्णी, मंजुषा कठाळे, अलका देशमुख, निलम पांढरीपांडे, लक्ष्मीबाई अतकरे, शिवशक्ती साखरे, संतोष कापडणी, सुषमा सोमठाणकर, सुविधा कुलकर्णी, कविता देशपांडे, श्रद्धा कोकणे, रश्मी तेलंग, चित्रा अमृतकार, प्रियांका मालशे, ओम पडवळ, देवकाबाई तळपते, अतुल देवगडे, सानल पोंक्षे, अपर्णा गांधी, राम काणीकर, नयना खंबे, मंगला किम्मतकर, कल्पना साखरकर, निलिमा भाले, शांता शाह, विजय कुलकर्णी, सुरेखा वाणी, मनिषा सावजी, उत्तमराव वाकोडकर, जयश्री एतवडेकर, नारायण तावडे, नयना पाटील, जयश्री डोरले, डॉ.स्वाती कुलकर्णी, अमोल डोरले, डॉ.आनंद कुलकर्णी, अर्चना बिरारी, मुकेश पांढरे, सुलोचना येवले, अस्मिता तलाठी, स्नेहा जामकर, श्रद्धा भरत, सीमा निवसरकार, प्रितीलता वखरे

### प्रश्नसंच - २६ उत्तरे

१) काही शिष्य पितांबरास
२) महाराज देविदास व बंकटलालास
३) महाराज बाळाभाऊस
४) दासगणू परशुरामास
५) महाराज सदाशिवास
६) भास्कर कोणालातरी
७) महाराज माधवास
८) बाळाभाऊ कवरास
९) पाटील बंधू हरी पाटीलास
१०) महार महाराजांना

## देशोदेशीच्या लोककथा

प्रीती वडनेरकर/ ९८२३९९४७९२

# पराक्रमी मयुरेश

**भाग ८**

बालमित्रांनो, गणपतीच्या अनेक कथा तुम्ही ऐकल्या-वाचल्या असतील. गणेश, मयुरेश, गजानन, चिंतामणी आणि अजून कितीतरी! गणपतीने वेळोवेळी दुष्टांचा, राक्षसांचा संहार करण्यासाठी अवतार घेतले. त्यातल्या मयुरेशाची ही कथा! मिथिल देशात गंडकी नावाची नगरी होती. तिथे चक्रपाणी राजा राज्य करत होता. त्याच्या राणीचं नाव होतं उग्रा. त्यांना मुलबाळ नव्हतं. त्यांच्याकडे शौनक ऋषी आले असताना, राजा-राणींनी त्यांचा यथायोग्य आदरसत्कार केला आणि आपलं दुःख सांगितलं. शौनक ऋषींनी प्रसन्न होऊन आशिर्वाद दिला. 'तुम्हाला पुत्र होईल, परंतु त्यासाठी तुम्हाला सौरव्रत म्हणजे सूर्याचं व्रत करावं लागेल.'

त्या व्रतामुळे राणीला तीन डोळ्यांचा पुत्र झाला. राणीला त्याचा उग्र दाह सहन होईना. तिने त्याला समुद्रात सोडले. मात्र, समुद्रही त्याच्या धगीने कोरडा पडू लागला. त्यामुळे समुद्राने परत त्याला राजाकडे सोडले. पाण्याने दिलेला पुत्र म्हणून राजाराणीने त्याचे नाव 'सिंधू' ठेवले. सिंधू अतिशय तापट होता. मोठेपणी त्याचा देह अक्राळ विक्राळ झाला. त्याने वनात जाऊन सूर्याची कडक उपासना केली. सूर्याने प्रसन्न होऊना त्याला अमृत प्राशन करण्यास दिले आणि सांगितले,'हे अमृत, तुझ्या नाभीतून जो दूर करेल, त्याच्यापासून तुला मृत्यू ओढवेल.' सिंधू राजवाड्यात परत आला. राजाने त्याचा राज्याभिषेक केला. राज्यपद मिळाल्यावर सिंधू सर्व सैन्यानिशी, पृथ्वी जिंकायला निघाला. एकेक करत त्याने सर्व देश जिंकले. मग, त्याने इंद्रलोकात प्रवेश केला. इंद्र धावत विष्णुदेवाकडे गेला. सिंधूने इंद्राच्या ऐरावताचे गंधस्थळ फोडले. सिंधू आणि विष्णुदेव यांच्यात तुंबळ युद्ध झाले. विष्णुदेवांच्या गदेचे, सिंधूने दोन तुकडे केले. विष्णूदेव सिंधूच्या शौर्यावर आनंदले. प्रसन्न होऊन, त्यांनी सिंधूला वर मागायला सांगितले. 'तुम्ही माझ्या गंडकी नगरीत वास्तव्यास यावे.' विष्णुदेवांबरोबर सर्व देवांना गंडकी नगरीत राहणे भाग पडले. सिंधूच्या तावडीतून सुटण्यासाठी सर्व देवांनी गणेशाची मूर्ती बनवून त्याची पूजा केली. गणेश प्रसन्न झाला. सर्व देवांनी आपलं गाऱ्हाणं मांडलं.'देवाधिदेवा, या सिंधू राक्षसानं फार उच्छाद मांडला आहे. काही करून त्याला हरवायला हवे,' इंद्र म्हणाले.

'काळजी करू नका. मी माता पार्वतीच्या पोटी जन्म घेईन. मयूरेश म्हणून प्रसिद्ध होईन. मी सिंधू राक्षसाचा वध करेन,' गणेशाने आश्वासन दिलं. त्याप्रमाणे माता पार्वतीने तपश्चर्या केली आणि गणेशाने पुन्हा तिच्या पोटी जन्म घेतला. सर्व श्रेष्ठ ऋषीमुनींनी येऊन त्याला शुभाशिर्वाद दिला. त्याचवेळी सिंधूचे गुप्त दूत आकाशमार्गे जात होते. त्यांनी सर्व वर्णन सिंधूला कथन केले.

सिंधू घाबरला. त्याने आपल्या सर्व राक्षसांना, आपल्या मारेकऱ्यांचा शोध घेऊन त्याला ठार मारण्याच्या योजना आखल्या. त्याचे सारे राक्षसगण त्रिसंध्या क्षेत्रात गुप्तरूपानं येऊन राहू लागले. गृधासूर राक्षसानं गिधाडाचं रूप घेतलं आणि बाळाला पायाच्या पंजांनी उचललं. बाळानं गिधाडाची चोच आपल्या बाळमुठीमधे घट्ट पकडून ठेवली आणि त्याचा श्वास रोखून ठेवला. आपल्या खऱ्या रूपात गृधासुर मरून पडला.

बाळाच्या पाळण्यात, क्षेम आणि कुशल हे दोन



राक्षस उंदराच्या रूपात चढले. बाळाचे हात अंगावर पडले आणि दोन्ही राक्षस मेले. क्रूर नावाच्या राक्षसानं बोक्याचं रूप घेतलं. त्यानं पाळण्यात उडी मारली. बाळाच्या टाळूवर आपले दात रोवणार इतक्यात, बाळानं बोक्याचे दोन्ही कान आपल्या हातात पकडून पिरगाळले. त्याला अक्षरशः रक्तबंबाळ केले. तो ही मरून पडला.

जावळं काढलेल्या बाळाला अंगणात ठेवलं असताना व्योमासूर राक्षसानं आंब्याच्या झाडात प्रवेश केला. ते बाळाच्या अंगावर कोसळण्याच्या तयारीत असतानाच झाडाचे तुकडे झाले.

बाळ जसजसा मोठा होऊ लागला, तसतसे सिंधूचे राक्षस निरनिराळ्या रूपात येऊन बाळाला ठार मारायचा प्रयत्न करत राहिले. बाळ सहा वर्षांचा असताना विश्वकर्मा तिथे आले. त्यांनी 'बाल गुणेशाला मी अंकुष, परशू, पाश आणि पद्म अर्पण करतो.' एवढं बोलून विश्वकर्मा निघून गेले. सिंधू राक्षसाच्या कानावर या सर्व गोष्टी पोहचत होत्या.

कश्यप ऋषींची पत्नी विनिताला जंगलात एक अंड सापडलं. ते अतिशय कठीण होतं. इतकं की, वज्र आणि पर्वतही ते फोडायला असमर्थ होते. योगायोगानं, गुणेश एका राक्षसाला मारण्यासाठी तिथे आला. त्याला झाडाच्या ढोलीत ते अंडं मिळालं. त्याने ते अंडं हातात घेताच ते फुटलं. त्यातून मोर बाहेर पडला. तेव्हापासून मयूर गुणेशाचं वाहन झाला आणि गुणेशाला मयूरेश हे नाव मिळालं. या नावाने संबोधू लागले.

प्रथम नंदी पुढे गेला. त्यानं सिंधूला देवांना सोडण्याची विनंती केली. पण, त्याने नंदीचा घोर अपमान केला. हे कळताच मयुरेशने तात्काळ युद्धाची आज्ञा दिली. त्याच्या सैन्यानं कित्येक राक्षसांना ठार मारलं. सिंधू राक्षस संतप्त झाला. तुंबळ युद्ध झाले. राक्षसाचे दैत्य, अमात्य मारले गेले. सूर्यानं दिलेला प्रखर बाण सिंधूने सोडला. पण, मयूरेशनं परशूने त्याचा छेद केला. सिंधूने चक्र सोडले आणि मयूरेशने शूलाने ते मोडले. सिंधूचे पुत्र धर्म आणि अधर्म मारले गेले. त्याच्या शोकाकुल पत्नीने युद्ध थांबवण्यासाठी सिंधूला विनंती केली. चक्रपाणी राजानेही त्याला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो मागे हटला नाही.

सिंधू मयूरेशला मारायला धावला. मयुरेशनं विराट रूप धारण केलं. संपूर्ण आकाश व्यापलं. मयूरेशनं स्वतःचा परशू अभिमंत्रून सोडला. तो सिंधूच्या नाभीत शिरला आणि त्यातून अमृत बाहेर पडलं. तो तात्काळ मरण पावला. सर्वत्र आनंदी आनंद झाला. विष्णुदेवांसह साऱ्यांची सुटका झाली.

## वारसा

प्रवीण अविनाश योगी/+९१ ७५०७४ ९३११२

# राजदुर्ग राजगड

किल्ले राजगड...शिवरायांचा इमानी सेवक! स्वराज्याची पहिली राजधानी! गडांचा राजा आणि राजांचा गड! समुद्रसपाटीपासून १३९५ मीटर उंच असलेला हा किल्ला! सिंहगड, पुरंदर, मंगळगड ऊर्फ कांगोरी, तोरणा ऊर्फ प्रचंडगड या दुर्ग चौकडीच्या मध्यभागी राजगड हा किल्ला आहे. निरा, वेळवंडी, गुंजवणी, कानद या नद्यांनी वेढलेला हा डोंगर निसर्गतःच दुर्गम आहे. शिवरायांनी तोरणा उर्फ प्रचंडगडावर सापडलेल्या धनाचा उपयोग करून मुरूंबदेवाच्या डोंगरमाथ्यावर तटबंदीचं पागोटं चढवलं. पद्मावती, सुवेळा, संजीवनी अशा तीन माच्या तसेच आभाळाशी गप्पा मारणारा अभेद्य आणि मुलखावेगळा बालेकिल्ला हे याचं वैशिष्ट्य. राजगडाच्या माथ्यावरून पुरंदर, वज्रगड, रोहिडा, रायरेश्वर, महाबळेश्वर, मकरंदगड, प्रतापगड, वरंधा घाट, कावळ्या, मनमोहनगड, गोप्या घाट, मढ्या घाट, रायदंड, रायगड, लिंगाणा, तोरणा, लोहगड, विसापूर, प्रचंडगड, तिकोना आदी महत्त्वाची ठिकाणे सहज नजरेस पडतात. मुळात राजगडाची निर्मिती अतिशय दुर्गम ठिकाणी होती. याच्या दुर्गमतेविषयी लिहिताना साकी मुस्तैदखान म्हणतो,राजगड हा अतिशय उंच. त्याची उंची पाहता तो सर्व किल्ल्यात श्रेष्ठ होय असे म्हणता येईल. त्याचा घेर बारा कोसांचा आहे. त्याच्या मजबुतीची आणि उंचीची कल्पनाही करवत नाही. या डोंगराच्या दऱ्याखोऱ्यांतून आणि घनघोर अरण्यातून वाऱ्याशिवाय दुसरे काही फिरू शकत नाही. तिथे पावसालाच वाट मिळू शकते इतर कोणीही त्यातून जाऊ शकत नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स. १६४८ ते १६७२ हा पंचवीस वर्षांचा काळ या बुलंद, बेलाग आणि बळकट दुर्गावर काढला. शिवरायांच्या जीवनातील अनेक हर्ष-विषादांच्या स्मृती या गडाशी संलग्न आहेत. छत्रपती राजाराम महाराजांचा जन्म येथेच झाला. अफजलखानाचा बंदोबस्त करण्यास राजांनी इथूनच प्रस्थान ठेवले. सौभाग्य संपन्न सईबाई साहेबांचा मृत्यूही येथेच झाला. महाराज औरंगजेबाच्या भेटीसाठी दिल्लीला इथूनच रवाना झाले आणि दिल्लीपतीच्या हातावर तुरी देऊन महाराष्ट्रात परत आले ते याच राजगडावर!

गडावर प्रवेश करण्याचे मार्ग म्हणजे पाली दरवाजा, चोर दरवाजा, गुंजवणे दरवाजा, काळेश्वरी दिंडी, अळू दरवाजा तसेच अनेक चोर दिंड्या आणि ढोरवाटा. यातील सर्व मार्ग काही कायम वापरातले नाहीत. त्यातल्या त्यात पुणे-वेल्हा रस्त्यावरील मार्ग आणि चोर दरवाजा किंवा पाली दरवाजा मार्गाने बरेच लोक जातात. प्रत्येक वाटेने गडावर पोचण्यात एक थ्रिल आहे. राजगडाचे चार प्रमुख भाग आहेत १) बालेकिल्ला २) पद्मावती माची ३) सुवेळा माची आणि ४) संजीवनी माची. राजगडाचा आकार काहीसा पंख पसरलेल्या पक्ष्यासारखा आहे.

वायव्येकडे तोंड केलेल्या या पक्ष्याच्या उजव्या अंगास पद्मावती माची तर डावीकडे संजीवनी माची आहे. शेपटाकडील भागात सुवेळा माचीचा भाग येतो तर पाठीवर बालेकिल्ला!

पद्मावती माची : ही माची इतर दोन्ही माच्यांपेक्षा विस्तृत



आहे. पद्मावतीचे मंदिर, पद्मावती जलाशय, हवालदाराचा वाडा, राजांचा राहता वाडा, रत्नशाळा, सदर, लोडतक्याचा दगड, चोर दिंडी, पाली दरवाजे, गुंजवणे दरवाजे असे कितीतरी अवशेष येथे दिसतात.

सुवेळा माची : पद्मावती माचीवरून बालेकिल्ला उजवीकडे आणि गुंजवणे दरवाजा डावीकडे ठेवून पायवाटेने गेले की, उंच टेकाड दिसते त्याला डुबा म्हणतात. त्याच्यापुढे काही चौथरे दृष्टीस पडतात. तेथून तटबंदीच्या रोखाने पुढे गेले की, एका बुरुजातून दिंडी वाटेबाहेर पडता येते. येथेच उजव्या तटात एक गणेश मूर्ती आहे व थोडे पुढे गेले की सहा-सात मीटर उंचीवर त्या अरुंद कातळकड्याच्या भिंतीला असलेले आरपार खिंडार आहे. या चिंचोळ्या माचीला तटबंदी घातल्यामुळे ती संरक्षण योग्य झालेली दिसते.

संजीवनी माची : दिड -दोन कि.मी. लांबीची ही माची व तिची दुहेरी तटबंदीची नाळ म्हणजे दुर्ग शास्त्रातील प्रगत स्थापत्याचा आदर्श नमुनाच आहे. माची तीन टप्प्यांनी उतरत गेली आहे. त्या प्रत्येक टप्प्यात चिलखती बुरुज घालून अभेद्य केली आहे. तोरण्याची बुधला माची आणि राजगडाची संजीवनी माची जोडणारी एक डोंगररांग आहे. साहसी दुर्गयात्री ही जोड दुर्गयात्रा येथून पुरी करतात.

राजगडावर खरा कस लागतो तो बालेकिल्ला सर करायला. बालेकिल्ला हे राजगडाचे वैशिष्ट्य. चहुंगांनी तुटलेला कातळकडा आहे. वर जाण्यास एकच वाट आहे, ती ही तशी कठीणच. बालेकिल्ल्याचा मुख्य दरवाजा सुबक बांधणीचा आणि कोनदार बुरूजांमुळे डौलदार दिसतो. बालेकिल्ल्यावरील जननीचे मंदिर, ब्रह्मर्षीचे मंदिर, जवळच चंद्रकोरीसारखे टाके, त्याच बाजूचा सुटवलेला बुरुज, त्यातील चोरवाटेची दिंडी, महाराजांची सदर, राहता वाडा

बालेकिल्ल्यावरून सुरुवातीचं असलेलं चिमुकलं स्वराज्य येथून व्यवस्थित न्याहाळता येत असल्याने शिवरायांनी हा मोक्याचा गड राजधानीसाठी निवडला असावा. पुढे हिंदवी स्वराज्याच्या कक्षा विस्तारल्या आणि रायरी डोंगरावरच्या रायगडाला राजधानीचा मान मिळाला. महाराजांच्या पाऊलखुणा जास्तीत जास्त जर कुठे उमटल्या असतील तर त्या इथंच. त्यामुळे हा राजदुर्ग आयुष्यात एकदा तरी पाहायलाच हवा!

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शेतात काम करतांना महिलेचा सर्पदंशाने मृत्यू

### सोयगाव तालुक्यातील बोरमाळ तांड्यातील घटना

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१ सप्टेंबर



शेतात निंदणीचे काम करतांना अचानक पिकांमध्ये असलेल्या नाग प्रजातीच्या सापाने दंश केल्या ने महिला शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याची घटना तिडका शिवारात रविवारी सायंकाळी सहा वाजता गट क्र.१११ मध्ये घडली रात्री आठ वाजता वैद्यकीय सूत्रांनी तपासून मृत झाल्याची घोषित केले.या प्रकरणी रात्री नऊ वाजता ग्राम महसूल अधिकारी शंकर देवतुले यांनी तहसील कार्यालयात अहवाल सादर केला आहे

रुखमाबाई शिवा जाधव(वय.६०रा.बोरमाळ तांडा) असे सर्पदंशाने मृत झालेल्या महिलेचे नाव आहे सदर महिला गट क्र.१११ मध्ये शेतात पिकांच्या निंदणीचे काम करत असताना अचानक दगडाखाली असलेल्या नाग प्रजातीच्या सापाने तिला पायावर दंश केला असता ती बेशुद्ध पडली तिला तातडीने बनोटी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल केले प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी

तिला पाचोरा (जळगाव)येथे हलविण्यात आले परंतु तिला वैद्यकीय सूत्रांनी तपासून मृत घोषित केले तिच्या पश्चात पती,दोन मुले, एक मुलगी,सुना नातवंडे असा परिवार आहे सोमवारी सकाळी शवविच्छेदनानंतर तिच्यावर सकाळी अकरा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

# इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत भटके विमुक्त दिवस उत्साहात साजरा

अहिल्यानगर, दि. १ :- इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत न्यू आर्ट कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज सभागृहामध्ये भटके विमुक्त दिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून भटक्या विमुक्तांच्या जीवनाचे दर्शन घडवले.

यावेळी इतर मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक विनोद लोंढे, अशोक चोरमले, बेबीताई गायकवाड, शाहिद काझी, विजय तमनर, कांतीलाल जाडकर आदी मान्यवर उपस्थित होते.



प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा विभागातील सांस्कृतिक कार्यक्रमातून भटक्या विमुक्तांच्या जीवनपद्धती, चालीरीती व संस्कृतीचे दर्शन घडवले. आश्रमशाळेतील विद्यार्थिनींनी बंजारा नृत्याविष्कारातून बंजारा समाजाच्या संस्कृतीचे दर्शन घडवले व उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, वकृत्व स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांत सहभागी झालेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक गटांतील विजेत्या सामूहिक गटांना प्रथम, द्वितीय व तृतीय असे एकूण नऊ पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन प्रदान करण्यात आले. तसेच दहावी व बारावी (कला व विज्ञान शाखा) परीक्षेत अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. याशिवाय इस्रोच्या वैज्ञानिक सहलीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले.

सहाय्यक संचालक विनोद लोंढे म्हणाले, ब्रिटिश सरकारला विरोध करण्यात भटक्या विमुक्त समाजाची भूमिका महत्वाची होती. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ३१ ऑगस्ट १९५२ रोजी भारत सरकारने इंग्रजांनी लागू केलेला 'भटक्या जमाती गुन्हेगार कायदा' रद्द करून या समाजाला मुक्त केले. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्काराचेही त्यांनी कौतुक केले.

अशोक चोरमले यांनी भटके विमुक्तांची संघर्षगाथा व त्यांच्या समस्यांबाबत माहिती दिली. बेबीताई गायकवाड यांनी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य सांगून विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

कार्यक्रमाची सुरुवात पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात निरीक्षक कातकडे यांनी इतर मागास बहुजन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली व भटके विमुक्त दिवस साजरा करण्यामागील भूमिका स्पष्ट केली. कुरुंद आश्रमशाळेचे प्राध्यापक शाकीर शेख यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## डॉ. वैभव मावळे यांना नाट्यशास्त्रात पीएच.डी प्रदान



छत्रपती संभाजीनगर - खान्देशातील निवडक सात कलांमध्ये खान्देश हा श्रेष्ठ असल्याचे डॉ. वैभव मावळे यांच्या संशोधनातून समोर आले आहे. केवळ खान्देशच नाही तर खान्देशच्या आजूबाजूला असलेली दोन राज्यांतही (गुजरात आणि मध्य प्रदेश) खान्देशच्या लोककला फोफावल्या असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी मान्य केले आहे. डॉ. वैभव मावळे यांनी नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील नाट्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.वैशाली बोदेले देखरेखीत खान्देशातील निवडक लोककलांमधील नाटकीय तत्व व घटकांचा चिकित्सक अभ्यास या विषयात डॉ. संजय पाटील (के.एस.के. महाविद्यालय, बीड) यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी पूर्ण केली आहे. यावेळी बहिस्थ पर्यवेक्षक म्हणून डॉ. संयुक्ता थोरात आणि डॉ. प्रमोद चव्हान उपस्थित होते. दरम्यान, डॉ. किशोर वाघ, विद्यापीठातील प्रा. स्मिता साबळे, डॉ. गजानन दांडगे, डॉ. सनील टाक, धरमसिंग आडे, संदीप बोरसे, रामदास ठोके, आकाश पवार, बाळू बटूळे आणि अनिल बडे यांनी त्यांना सहकार्य केले आहे.

# एमजीएममध्ये राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित स्पर्धेचा बक्षीस वितरण संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. १ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठामध्ये राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या आंतर शालेय व आंतर महाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या तथा बुद्धिबळाच्या वुमन्स इंटरनॅशनल मास्टर साक्षी चितलांगे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.प्राप्ती देशमुख, क्रीडा संचालक नितीन घोरपडे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.दिनेश वंजारे, खेळाडू व सर्व



संबंधितांची उपस्थिती होती.

आंतर शालेय व आंतर महाविद्यालयीन जलतरण स्पर्धेमध्ये १५२ खेळाडूंनी, शूटिंगमध्ये १४०, बुद्धिबळमध्ये १९० खेळाडूंनी सहभाग घेतला होतं. या क्रीडा स्पर्धांतील विजेत्या खेळाडूंसोबत एमजीएम विद्यापीठाच्या क्रिकेट विजेत्या संघाचा देखील सत्कार करण्यात आला तसेच क्रीडा स्पर्धांमधील सर्व ऑफिशिअल्सचा देखील सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक क्रीडा विभाग प्रमुख डॉ.दिनेश वंजारे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. श्रीनिवास मोतीयेळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जॉय थॉमस, डॉ.शशिकांत सिंग, डॉ श्रीनिवास मोतीयेळे, डॉ. सदाशिव जव्हेरी, डॉ रहीम खान, विलास राजपूत हर्षदा नीठवे, सुनील चव्हाण, निलेश खरे, निरंजन फडके, आनंद राजहंस, लक्ष्मण सूर्यवंशी, अर्जुन तोडके, भाऊसाहेब फुले आदींनी परिश्रम घेतले.

**बुद्धिबळ प्रथम विजेत्या स्पर्धकांची नावे**

इयत्ता पहिली ते पाचवी (मुली) : १. स्वरा लड्डा, इयत्ता पहिली ते पाचवी (मुले) : १. मोहित राहुल पाटील, इयत्ता सहावी ते दहावी (मुली) : १. आर्या बाबासाहेब नाईक, इयत्ता सहावी ते दहावी (मुले) : १. अंश शेलार, महिला खुला गट : १. श्रुती जाधव, पुरुष खुला गट : १. सारंग कुलकर्णी.

## जीवनाचा विकास आसन किंवा अधिकाराने नाही तर आचरणानेच होतो : श्री विरंजन सागर जी महाराज



छत्रपति सभाजीनगर : देशमुख नगर श्री १००८ भगवान मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर येथे दशलक्षण पर्वानिमित्त आयोजित धर्मसभेत उपाध्यक्ष श्री विरंजन सागर जी महाराज यांनी प्रवचन करताना सांगितले की, उत्तम मार्दव धर्म म्हणजे अहंकाराचा त्याग करून नम्रतेला स्वीकारणे होय. मुनिश्री म्हणाले की, अहंकार म्हणजे मृत्यु आणि समर्पण म्हणजे मुक्ती. अहंकार माणसाला शून्यतेकडे नेतो, तर समर्पण पूर्णतेकडे नेतो. विनयच मोक्षाचे खरे द्वार आहे. व्यक्तीच्या अंतर्गत असलेला अहंकार त्याला पतनाकडे नेतो, म्हणून नम्रता स्वीकारणे आवश्यक आहे.

ते पुढे म्हणाले की, अहंकार खोटा आहे. मेंदूच्या कोशिका लहान असतात, स्मृती खऱ्या असतात, विचार प्रक्रिया खरी असते, पण आत्मा आणि शरीराचा संयोग झाला की अहंकार निर्माण होतो. अहंकार जिंकण्यासाठी दोन सूत्रे मुनिश्रींनी दिली - आपल्या उपलब्ध्यांवर नाच करू नका, अहंकार बाळगू नका, मंत्राचा उपयोग करा. आपला भूतकाळ आणि आपली औकात नेहमी लक्षात ठेवा. जीवनाचा विकास आसन किंवा अधिकाराने होत नाही, तो आचरणानेच होतो. सन्मान तात्पुरते असतात, समाधी शाश्वत असते. अहंकाराची पुतळी जळून जाते, पण समाधीधारकाची मूर्ती उभी राहते. आत्म्याचा शुद्ध धर्म हाच खरा धर्म आहे. प्रसिद्धीची भावना धर्म नाही, असेही मुनिश्रींनी नमूद केले. धर्मसभेच्या निमित्ताने हजारो भक्तांनी भगवानांची पूजन-अभिषेक केला. दुपारनंतर तत्वार्थ सूत्र महामंडल विधानाचे आयोजन करण्यात आले.

# संत साहित्यातून मिळणारी जीवनदृष्टी आनंददायी असते- डॉ. विजयकुमार फड



जालना - संत साहित्य हे मानवाला त्याच्या कर्तव्य व जबाबदारीची जाणीव करुन देणारे असून त्यातून मिळणारी दृष्टी ही आनंददायी असल्याने संत साहित्य वाचायला व अनुभवायला हवे, असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले.

मंठा तालुक्यातील पेव / नळडोह येथे धार्मिक सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कीर्तनरुपी सेवा पार पाडतांना फड यांनी संत साहित्य हे केवळ वाचण्याचा, ऐकण्याचा किंवा सांगण्याचा विषय नसून ते खऱ्या अर्थाने प्रत्यक्ष अनुभवण्याचा विषय आहेत असे म्हटले. ज्याला संत साहित्याचा अनुभव घेता येतो, त्याला उत्तम तसेच आनंददायी दृष्टी आपोआप मिळते. कीर्तनासाठी घेतलेला अभंग हा ज्ञानेश्वरीशी संबंधीत असल्याने त्यांनी ज्ञानेश्वरीवर भर दिला होता. ज्ञानदेवांनी केलेल्या कार्याची व त्यांच्या श्री ज्ञानेश्वरी, चांगदेव पासष्टी, स्फुट अभंग आणि हरिपाठाची तसेच संत तुकाराम, नामदेव महाराज आदी संतांच्या साहित्याची अनुभूती घेता येईल, त्याच्या जीवनात चिंता, तणाव, वाद, अहंकार, काम, क्रोध, नकारात्मक दृष्टी या मानवी शत्रूंना स्थान असणार नाही. अशा अनुभूती घेणाऱ्या व्यक्तीच्या जीवनात सुख, समाधान, शांती, समृध्दी, सकारात्मक दृष्टी, आनंद आदी आपोआप येत असतात. संतांच्या ग्रंथांची व जीवनकार्याची अनुभूती घेण्याची मूळात ओढ असेल तर ही अनुभूती अवघड नाही. अनेकांचे बाह्यवर्तन, बाह्यसौंदर्य चांगले असते पण प्रत्यक्ष वर्तन, विचार, मानसिक सौंदर्य नकारात्मक असतात. अशांच्या अशा वर्तनाचा विपरित परिणाम अनेकांना भोगावा लागतो. आपल्याकडून असे विपरित परिणाम कोणाला भोगण्याची किंवा कोणामुळे आपल्यावर विपरित परिणामाला सामोरे जाण्याची वेळ न येऊ देण्यासाठी 'मी कोण' हे खऱ्या अर्थाने समजले पाहिजे. माणसाला मी ची खरी ओळख संतांची ग्रंथसंपदा करून देते. त्यामुळे किमान आपले कौटुंबिक जीवन तरी आनंदी राहावे यासाठी का होईना संत साहित्य अनुभवायला हवे असेही फड म्हणाले.

# खुलताबाद- फुलंब्री महामार्गावर मराठा समाजाच्या आरक्षणासाठी रास्ता रोको आंदोलन

खुलताबाद: प्रतिनिधी संतोष करपे ,मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्यासाठी संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ खुलताबाद तालुका सकल मराठा समाजाच्यावतीने खुलताबाद- फुलंब्री महामार्गावरील काटशिवरीफाटा येथे सकाळी ११ वाजता रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी आरक्षण आमच्या हक्काच नाही कुणाच्या बापाच, मराठा समाजाला



आरक्षण मिळालेच पाहिजे यासह राज्य सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. व जो पर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही तोपर्यंत आंदोलन तेवत ठेवणार असल्याचा इशारा समाज बांधवांनी दिला. यावेळी झालेल्या रास्ता रोको मुळे एक तास वाहतूक ठप्प झाली होती. विशेष म्हणजे खुलताबाद उरूसासाठी येणा-या यात्रेकरूंची गैरसोय झाली होती. यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केली. खुलताबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी मोठा बंदोबस्त तैनात केला होता. यावेळी नायब तहसीलदार पांढरे यांनी निवेदन स्वीकारले .

# २००+ किलो वजनाच्या रुग्णावर यशस्वी शस्त्रक्रिया

पुणे - एका महत्त्वाच्या वैद्यकीय केसमध्ये, २०० किलोपेक्षा जास्त वजन असलेल्या एका ५२ वर्षीय रुग्णावर नुकतीच ज्युपिटर हॉस्पिटल, पुणे येथे लॅपरोस्कोपिक बेरिएट्रिक शस्त्रक्रिया करण्यात आली. मधुमेह आणि उच्च रक्तदाबाने त्रस्त असलेल्या या रुग्णाला शस्त्रक्रियेनंतर अवघ्या चार तासांत चालता आले. तसेच, एका महिन्यातच त्याचे २२ किलो वजन कमी झाले आहे. ही केस बेरिएट्रिक शस्त्रक्रिया केवळ वजन कमी करण्यासाठीच नव्हे, तर लठ्ठपणाशी संबंधित गंभीर आजारांवर उपचार करण्यासाठी कशी उपयुक्त ठरते, हे अधोरेखित करते. बेरिएट्रिक सर्जन डॉ. सतीश पट्टणशेट्टी यांच्या म्हणण्यानुसार, अति लठ्ठपणाने (ीलळव ेलशीळीूं) त्रस्त लोकांसाठी, बेरिएट्रिक शस्त्रक्रिया हे केवळ सौंदर्य वाढवण्याबद्दल नाही, तर जगण्याबद्दल आणि दीर्घकालीन आरोग्याबद्दल आहे. अनियंत्रित मधुमेह, उच्च रक्तदाब आणि स्लीप पनिया असलेल्या रुग्णांमध्ये शस्त्रक्रियेनंतर लक्षणीय सुधारणा झाल्याचे आम्ही पाहिले आहे,.

# प्रतिष्ठाण महाविद्यालयाचा वर्धापन दिन उत्साहात

तभा वृत्तसेवा
पैठण दि ०१:- : येथील प्रतिष्ठान महाविद्यालयात महाविद्यालयाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. एक सप्टेंबर १९६५ रोजी कै. खंडेरावजी पाटील शिसोदे ढाकेफळकर यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या मुलांसाठी तालुक्यातील पहिले महाविद्यालय सुरू केले. तो दिवस प्रतिष्ठान महाविद्यालयात 'महाविद्यालय वर्धापन दिन' म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने महाविद्यालयात सकाळी आठ वाजून ३० मिनिटाला संस्थेचे



अध्यक्ष रवींद्र पाटील शिसोदे, सचिव राजेंद्र पाटील शिसोदे यांच्या शुभहस्ते महाविद्यालयाच्या ध्वजाचे ध्वजवंदन करण्यात आले. ध्वजवंदनेच्यावेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रतिष्ठान गीत सादर केले. यानंतर कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीतांवर नृत्याचे सादरीकरण केले. एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी मान्यवरांना मानवंदना दिली. मान्यवरांनी कै. खंडेरावजी पाटील शिसोदे यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. संस्थेचे सचिव राजेंद्र पाटील शिसोदे यांनी यावेळी सर्वांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या वेळी युवा नेते सुशील पाटील शिसोदे,चि. अर्जुन पाटील शिसोदे, प्राचार्य डॉ. एस.जी. सोनकांबळे, उपप्राचार्य प्रा. वैजनाथ चाटे, प्रबंधक शेखर शिंदे, अधीक्षक इमरान पठाण यांच्यासह प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## ग्राहक आणि बिगर-ग्राहकांसाठी जीएसटी भरणा करण्याची सुविधा उपलब्ध

पुणे : आयडीएफसी फर्स्ट बँक आपल्या ग्राहक आणि बिगर-ग्राहकांसाठी जीएसटी भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करून देत असल्याची घोषणा करताना आनंद होत आहे. हे देशभरातील सर्व करदात्यांसाठी विविध डिजिटल माध्यमांच्या माध्यमातून सोयीसुविधा आणि उपलब्धता वाढवते. श्री आशिष सिंग, हेड - रिटेल लायबिलिटीज, आयडीएफसी फर्स्ट बँक, म्हणाले, एक युनिव्हर्सल बँक म्हणून, आमच्या ग्राहकांना परिपूर्ण सेवा देणे हे आमचे उद्दिष्ट आहे. आता आयडीएफसी फर्स्ट बँकेचे ग्राहक आणि बिगर-ग्राहक जीएसटी भरणा यूपीआय, क्रेडिट आणि डेबिट कार्ड्सद्वारे करू शकतील. यामुळे, कर भरणे आता अधिक सोपे, सुलभ आणि सर्वांसाठी उपलब्ध झाले आहे. जागतिक दर्जाच्या डिजिटल बँकिंग सेवा पुरवण्याच्या आणि सर्व करदात्यांना कोणताही अडथळा नसलेला भरण्याचा अनुभव देण्याच्या आमच्या व्यापक प्रयत्नांचा हा एक भाग आहे.

# विद्युत सहायकपदाच्या उमेदवारांना मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी शेवटची संधी

### महावितरणकडून ९ व १० सप्टेंबरला पडताळणी

छत्रपती संभाजीनगर : महावितरणमध्ये विद्युत सहायकपदी निवड झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी २० ते २२ ऑगस्टला पूर्ण झाली आहे. तथापि राज्यातील अतिवृष्टी व पूरपरिस्थिती तसेच इतर कारणांमुळे गैरहजर असलेल्या काही उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसाठी ९ व १० सप्टेंबरला शेवटची संधी देण्यात आली आहे.महावितरणने जाहिरात क्र. ०६/२०२३ अन्वये विद्युत सहायक पदासाठी निवड झालेले उमेदवार व त्यांना वर्ग केलेल्या परिमंडलांची यादी कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केली आहे. या उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची व प्रमाणपत्रांची पडताळणी संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये २० ते २२ ऑगस्टदरम्यान करण्यात आली आहे. मात्र या तीनही दिवसांत राज्यात अतिवृष्टी व पूरपरिस्थिती तसेच काही अपरिहार्य कारणांमुळे निवड झालेल्या ज्या उमेदवारांना उपस्थित राहता आले नाही, अशा काही गैरहजर उमेदवारांना मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी आणखी एक संधी देण्यात आली आहे.

# गौराईचे नटून.. थटून आगमन..! बाजारात उसळली गर्दी

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१ सप्टेंबर

सोयगाव सह परिसरात रविवारी सायंकाळी नटून थटून गौराईचे भर पावसात आगमन झाले आहे दरम्यान रविवारी दिवसभर बाजारात गर्दी उसळली होती.

गणेशोत्सव सुरू झाल्यानंतर पाचव्या दिवशी रविवारी ज्येष्ठा गौरींचे आगमन झाले आहे. गौरीचे आगमन हे संपत्ती, सौभाग्य, ऐश्वर्य आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे घरातील स्त्रिया विशेष उत्साहाने गौरीचे स्वागत करण्यात आले. गौराईच्या आगमनाने घरोघरी सुरु असलेल्या मांगल्याच्या या पर्वात आनंदाची आणखी एक भर पडेल.तलाव, नदी काठावरून वाजतगाजत, गौराई गीते गात या गौराईला घेऊन महिला घरी येतात. त्यानंतर भाजी, भाकरीचा नैवेद्य अर्पण केला जातो. त्यानंतर गौरींची मूर्तीसह मांडणी करून त्यांना सुंदर



साडी, दागिने, हार, गजरे घालून सजवले जाते. त्यांना नारळ, फुले, अक्षता, हळद-कुंकू, फळे, पंचपक्कान्नाच नैवेद्य अर्पण केला जातो. स्त्रिया एकत्र येऊन ओव्या, गाणी, झिम्मा, फुगडी अशा खेळांतून आनंद साजरा करतात. गौरींच्या आगमनाने पुढील दोन दिवस घरातले वातावरण अधिक मंगलमय आणि आनंदी झालेले पाहायला मिळणार आहे.

गौराई आगमनाच्या पार्श्वभूमीवर सोयगाव शहरात घरोघरी उत्साह भरून वाहू लागला आहे. महिलांकडून गौराईच्या गीतांनी, तसेच झिम्मा, फुगडीचे फेर धरून रात्र जागविल्या जाऊ लागल्या आहेत. विशेषतः हे चित्र सोयगाव, फर्दापूर, जरंडी, आमखेडा आदी भागात पाहायला मिळत आहे. सोयगावात गौरी-गणपतीचा सण मोठ्या उत्साहात सुरू झाला आहे.रविवारी ज्येष्ठा गौरी आगमन झाले आहे. या पार्श्वभूमीवर शहरात रविवारी दिवस भर खरेदीसाठी गर्दी होती.

**गौरी आगमनाचा मुहूर्त**

गौरी आवाहनासाठी सकाळी ०६:०० पासून सायंकाळी ०५.२७मिनिटांपर्यंत मुहूर्त आहे. नदी, तलाव व पाणवठे येथे कलशपूजन, करून वाजतगाजत गौरी आगमन झाले आहे.

**सोमवारी सुटी**

दरम्यान सोमवारी गौराईला गोडधोड पदार्थांचे नैवेद्य देऊन सोमवारी कुटुंबातील सर्वच सदस्य एकत्र येतात ऐन सोमवारी सुट्टी असल्याने पुन्हा आनंदात वाढ झाली आहे मंगळवारी गौराईचे विसर्जन होत आहे.

### अंकस्वस्तिक 2

सुचनाः-इथे या स्वस्तिकात दोन काळ्या चौकोनासहित सलग तीन चौकोनातील अंकांची बेरीज(30) आहे. यासाठी दिलेल्या चौकोटीतील अंक वापरावेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9 | | | | 8 |
| | | | | |
| | | 10 | | |
| | | | | |
| 11 | | | | 13 |

| | |
|---|---|
| 5 | 11 |
| 6 | 11 |
| 7 | 12 |
| 8 | 13 |
| 8 | 15 |
| 9 | 15 |

रचनाः-सौ.सुरेखा विजय काणे.छत्रपती संभाजीनगर
9960053521

### अंकस्वस्तिक 1 चेउत्तर

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9 | | 15 | 17 | 8 |
| 13 | | 14 | | |
| 18 | 11 | 11 | 17 | 12 |
| | | 16 | | 18 |
| 10 | 17 | 13 | | 10 |

अंकांची बेरीज( 40 ) आहे.

## जाहीर प्रगटण

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.४२९/२०२५

अर्जदार : १) बाळु उत्तम पुरी, वय ६५ वर्षे, धंदा शेती रा शेंदुरवादा ता गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) रमेश उत्तम पुरी, वय ५७ वर्षे धंदा शेती रा शेंदुरवादा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) रंजना भ्र. रमेश गिरी, वय ४९ वर्षे धंदा घरकाम रा. पाटोदा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :-निरंक

प्रकरण २-हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.बी. पदार यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ३ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिणी असुन ते वरील नमुद ठिकाणचे रहिवाशी आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील नाम उत्तम दामु पुरी हे मौजे शेंदुरवादा ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक १०/०९/२००५ रोजी मांजे शेंदुरवादा ता. गंगापुर येथे मयत झालेले आहे व तसेच अर्जदारांची आई नामे सुलाबाई उत्तम पुरी या यापुर्वीच दिनांक १४/११/१९८९ रोजी मयत झालेल्या आहे. मयत उत्तम दामु पुरी यांना अर्जदार क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचं सांगुन शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी वारसप्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्दीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाण वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २३/०७/२०२५ रांजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक ०६/१०/२०२५ रोजीची ठेवण्यात आलेली आहे.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

## अग्रलेख...

# ताक फुंकून प्यावे लागेल

गेल्या दोन महिन्यांपासून आंतरराष्ट्रीय राजकारणाला फार मोठी कलाटणी मिळाल्याचे चित्र दिसून येते. २०१७ पासून भारत आणि चीन या आशियातील दोन बलाढ्य देशांमधील संबंध डोकलाम संघर्षानंतर विकोपाला गेले. गलवान खोऱ्यातील रक्तरंजित संघर्षानंतर व्यापारी संबंधही कमालीचे बिघडले. अगदी जुलै महिन्यातही चीनने भारताला मौल्यवान खनिजाची निर्यात रोखली होती. याचा विपरीत परिणाम मोटार निर्मिती कंपन्यांवर झाला. पण, महिनाभरातच भारत-चीन संबंध रुळावर येण्यास प्रारंभ झाला. अर्थात दोन्ही देश निर्मळ मनाने एकत्र येण्यास राजी झाले असे नाही. २०१७ पासून जवळपास आठ वर्षे दोन्ही देश एकमेकांवर कुरघोडी करण्याची एकही संधी सोडत नसताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापुढे चीनने रेड कार्पेट अंथरले. शांघाय सहकार्य परिषदेच्या वार्षिक शिखर परिषदेच्या निमित्ताने मोदी चीनच्या दौऱ्यावर आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांच्या आडमुठ्या धोरणामुळे दोन्ही देशांना नाईलाजास्तव जवळ यावे लागत आहे. भारत-चीन यांच्यातील संबंध हे फक्त व्यावहारिक आहेत. अमेरिकेचा फटका या दोन्ही देशांना बसतो आहे. रशियाला लगाम घालण्यात अपयशी ठरल्याने आणि जागतिक शांतता नोबेल पुरस्कार मिळण्यात भारताने खोडा घातल्याचा राग ट्रम्प यांच्या मनात आहे. आज अडीच वर्षे झाली तरी रशिया युक्रेन आणि नाटो संघटनेसोबत एकटा लढतो आहे. अर्थात युक्रेनचे लचके तोडण्याच्या पुतिन यांच्या धोरणाचे समर्थन भारत कधीच करणार नाही. पण, बलाढ्य रशियाशी पंगा घेण्याचा झेलेन्स्की यांचा निर्णय धाडसी नव्हे तर अविचारी म्हणावा लागेल. रशियाची मागणी तरी काय होती? युक्रेनने नाटो संघटनेचा सदस्य देश होऊ नये एवढीच ना. या एकाच मुद्यावर झेलेन्स्की यांनी हजारो युक्रेनियन नागरिकांचा बळी दिला आणि विध्वंसाला आमंत्रण दिले. रशिया हल्ले थांबवत नाही आणि यासाठी चीन, भारताला जबाबदार धरून ट्रम्प यांनी मोठे व्यापारी शुल्क लावले. चीनवर तरी केवळ ३४ टक्केच लावले पण भारतावर तब्बल ५० टक्के व्यापारी शुल्क आकारले. यातून एकच बाब सिद्ध होते की भू-राजकीय पटलावर मित्रता, परस्पर विश्वास याला काहीच महत्त्व नाही. तसे नसते तर अमेरिकेने भारतासोबतच्या संबंधांचा बळी दिलाच नसता. बिल क्लिंटन राष्ट्राध्यक्ष असताना दोन्ही देशांमध्ये मैत्रीचे संबंध निर्माण होऊन ते ज्यो बायडेन यांच्या कार्यकाळापर्यंत मजबूत झाले होते. तसेच डोनाल्ड ट्रम्प यांची पहिली कारकीर्दही भारतासाठी दिलासा देणारी होती. राष्ट्रवाद आणि अमेरिका फर्स्ट या ट्रम्प यांच्या धोरणावर विश्वास ठेवून दुसऱ्या कारकीर्दीमध्ये भारताचाही पाठिंबा ट्रम्प यांनाच होता. पण, रशिया-युक्रेन युद्धामुळे केरात मुसळ गेले असेच म्हणावे लागेल. भारत रशियाकडून स्वस्तात कच्चे तेल खरेदी करतो आणि रिफाईन करून अन्य देशांना विकतो आणि नफा कमावितो. भारत करीत असलेल्या तेल खरेदीमुळे रशियाला आर्थिक बळ मिळत असल्याने युद्ध लांबत असल्याचे अकलेचे तारे ट्रम्प तोडत आहेत. जो देश जगात देशादेशांमध्ये भांडणे लावत त्याच देशांना शस्त्रे विकून पैसा कमावतो तो अमेरिका भारतावर आरोप करतो यापेक्षा दुसरा विनोद नाही. पण, जो चीन रशियाकडून भारतापेक्षा दुप्पट कच्चे तेल खरेदी करतो त्या देशावर भारतापेक्षा कमी व्यापारशुल्क आकारून नव्वद दिवसांची सूटही दिली आहे. ट्रम्प यांचा हा व्यवहार भारतासाठी मोठा धक्कादायक आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेली दहा वर्षे संबंध सुधारण्यासाठी केलेली मेहनत वाया गेल्यासारखे ठरले. अशाही परिस्थितीत मोदी यांनी संयम न ढळू देता परिस्थिती हाताळली. १४० कोटी जनतेचे हित लक्षात घेऊन भारत जागतिक बाजारपेठेत उपलब्ध असलेले कच्चे तेल खरेदी केले जाईल आणि भारत कुणाच्याही दबावाखाली येणार नसल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठणकावून सांगितले. चीन आणि युरोपियन देशांना सूट आणि भारतावर अतिरिक्त शुल्क, असे दुटप्पी, पक्षपाती धोरण स्वीकारल्याने भारतानेही प्रसंगी नुकसान सहन केले जाईल पण स्वाभिमानाला धक्का लागू न देण्याची स्पष्ट भूमिका घेतली. रशिया जुमानत नाही म्हणून भारतावर अतिरिक्त व्यापारशुल्क लावण्याचे अमेरिकेचे हास्यास्पद धोरण म्हणजे वांग्यावरचे तेल वड्यावर काढणे होय. भारतापूर्वी ट्रम्प यांनी चीनवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. पण, चीननेही जशास तसे उत्तर दिले.

गेल्या एप्रिल महिन्यात ट्रम्प यांनी चीनवर तब्बल १४५ टक्के व्यापारशुल्क आकारले. शी जिनपिंग यांनी लगेच अमेरिकेवर १२५ टक्के व्यापारशुल्क आकारून ट्रम्प यांना तडाखा दिला. भारताने अद्याप तरी संयम दाखवत अमेरिकन मालावर अतिरिक्त व्यापारशुल्क आकारले नाही. ५० टक्के व्यापारशुल्काचा भारताच्या निर्यातीवर परिणाम जाणवत असला तरी ही परिस्थिती नेहमीसाठी कायम राहील, असे नाही. एक मार्ग बंद झाला तर दुसरा मार्ग उघडतोच. नातेवाईक आणि शेजारी कधीही बदलले जाऊ शकत नाहीत, असे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी म्हणाले होते. दुर्दैव म्हणा की नशीब, भारताला चीन, पाकिस्तानसारखे कावेबाज, कपटी शेजारी लाभले आहेत. ज्यांचा डोळा सतत भारताची जमीन गिळंकृत करण्यावर असतो. पण, सध्या जगातील भू-राजकीय परिस्थितीने अशी काही कलाटणी घेतली की आज भारत आणि चीन एकाच नावेवर स्वार आहेत. ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानची ऐसीतैसी केल्यानंतर चीन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी रेड कार्पेट अंथरेल याची कल्पनाही जनरल आसिम मुनीर आणि शाहबाज शरीफ यांनी केली नसावी. परिस्थितीचे गांभीर्य म्हणा की काळाची गरज, भारतालाही चीनसोबत संबंध पूर्ववत करावे लागणार आहेत. कुणी कितीही नाकारले तरी चीन जगातील दुसरी महासत्ता आहे. सध्या तरी भारत आणि चीन यांच्यात आर्थिक पातळीवर तुलना करणे योग्य नाही. चीनने अमेरिकेसह जगभरात उत्पादन पुरवठा साखळी एवढी मजबूत करून ठेवली आहे की, युरोपीय देश आणि खुद्द अमेरिका हे देश हतबल ठरले आहेत. याही परिस्थितीत अपवाद फक्त भारताचा आहे. डोकलाम आणि गलवान खोऱ्यातील संघर्षानंतर मोदी सरकारने चीनला बाजूला सारले. देशाची आर्थिक घडी नीट बसविली. अमेरिकेसह, युरोप, आफ्रिका खंडात व्यापारासाठी संधी शोधण्याचे प्रयत्न सुरू ठेवले. स्पष्ट आर्थिक धोरणे, आत्मनिर्भर भारत अंतर्गत वस्तूंचे उत्पादन वाढवून निर्यातीत वाढ, स्वस्त कच्चे तेल आयात करून परकीय चलन वाचविणे, शेतकरी, सामान्यांना महागाईचे चटके बसणार नाही याची काळजी घेणे आदी उपायांमुळे आज भारत जगातील चौथी आर्थिक महासत्ता आहे. याच बळावर आपण चीनचा व्यापार, आर्थिक आणि लष्करी पातळीवर जोरदार मुकाबला केला. आता अमेरिकेची वेळ आहे. आज चीन भारतासोबत संबंध जोडू इच्छित असला तरी हा लाल ड्रॅगन विश्वासघातकी आहे हे विसरता कामा नये. चीन हा आकाराने, पैशाने बलाढ्य तर आहेच पण अत्यंत व्यवहारी आणि तितकाच कपटी आहे. पण, आजचा भारत १९६२ सारखा नक्कीच नाही, याची जाणीव चीनलाही आहे. गलवाननंतर हाडे गोठविणाऱ्या थंडीत चीनने जवळपास पाऊण लाख सैन्य तैनात करून दबाव आणण्याचा प्रयत्न केला पण भारतानेही रणगाडे, लांब पल्ल्यांच्या तोफांसह तितकेच सैन्य समोरासमोर उभे करून चीनला माघार घेण्यास बाध्य केले. शांघाय सहकार्य परिषदेच्या निमित्ताने तीन महाशक्ती एकत्र येत असल्याने हा अमेरिका आणि युरोपियन संघाला धोक्याचा इशारा आहे. परिषदेच्या एक दिवस अगोदर पंतप्रधान मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात द्विपक्षीय बैठक झाली. आशिया आणि दोन्ही देशांच्या भल्यासाठी हत्ती आणि ड्रॅगन यांनी एकत्र येणे आवश्यक असल्याचे वक्तव्य करीत जिनपिंग यांनी सीमेवर शांतता आणि स्थिरता राहणार असल्याचे संकेत दिले. तथापि, चीनचा पूर्व इतिहास पाहता भारताला ताक फुंकून प्यावे लागेल.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# पुन्हा संसद विरुद्ध सर्वोच्च न्यायालय

संसद आणि सर्वोच्च न्यायालय पुन्हा एकदा परस्परांसमोर उभ्या ठाकण्याच्या स्थितीत आहेत. एकीकडे सर्वोच्च न्यायालयात राष्ट्रपती व राज्यपालांचे अधिकार मर्यादित करण्याबाबत सुनावणी होत आहे तर दुसरीकडे राष्ट्रपती व राज्यपालांना अधिक अधिकार देणारे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत सादर करण्यात आले आहे.

**नवे विधेयक** : नुकत्याच संपलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या टप्प्यात १३० वे घटनादुरुस्ती विधेयक सादर करण्यात आले आणि त्यावरून झालेल्या गदारोळानंतर ते एका समितीकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. एखाद्या मंत्र्यास, मुख्यमंत्र्यास वा पंतप्रधानास गंभीर गुन्ह्याखाली अटक करण्यात आली असेल, त्यात त्याला पाच वर्षांची शिक्षा होण्याची शक्यता असेल आणि तो ३० हून अधिक दिवस कारागृहात असेल तर त्याला त्याच्या पदावरून हटविण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. मुख्यमंत्री वा राज्यातील मंत्री यांच्या संदर्भात त्यांना हटविण्याचे अधिकार राज्यपालांना तर पंतप्रधान वा केंद्रातील मंत्र्यास हटविण्याचे अधिकार राष्ट्रपतींना देण्यात येणार आहेत.

**एक काळ होता** : देशाच्या राजकारणात एक काळ होता त्यात नैतिक अधिष्ठान सर्वांत महत्त्वाचे मानले जात होते. एखादी चौकशी असो वा उच्च न्यायालयाचा साधा ताशेरा असो- मंत्री आपल्या पदाचा राजीनामा देत असे.

**मुंदडा प्रकरण** : पं. नेहरू पंतप्रधान असताना त्यांचे एक मंत्री टी. टी. कृष्णम्माचारी एल. आय. सी. घोटाळ्यात अडकले होते. या प्रकरणाच्या चौकशीची मागणी विरोधी पक्षांकडून केली जात होती. कृष्णम्माचारी हे पंतप्रधान नेहरू यांचे खास मंत्री व मित्र मानले जात होते. त्यांची चौकशी कोण व कशी करणार? तत्कालीन गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत यांनी हा निर्णय घेतला. चौकशीचे काम मुंबई उच्च न्यायालयाचे तत्कालीन मुख्य न्यायाधीश न्या. मोहम्मद करीम छागला यांच्याकडे सोपविण्यात आले. त्या चौकशीत कृष्णम्माचारी दोषी असल्याचे आढळून आले आणि त्यांना राजीनामा द्यावा लागला. विशेष म्हणजे कृष्णम्माचारी आपल्या गावी म्हणजे मद्रासला जाण्यासाठी निघाले तेव्हा त्यांना दिल्ली विमानतळावर निरोप देण्यासाठी स्वत: नेहरू उपस्थित होते. नेहरूंचे मोठेपण हे की त्यांनी न्या. छागला यांचा निर्णय स्वीकारला आणि नंतर याच छागलांना त्यांनी आपल्या सरकारात मंत्री म्हणून सामील केले. छागलांना सरकारी बंगला मिळेपर्यंत नेहरूंनी त्यांच्या निवासाची सोय आपल्या बंगल्यात केली होती.

केवळ कृष्णम्माचारीच नाही तर नंतरच्या काळात अनेक मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागल्याची अनेक उदाहरणे आहेत.

**सिमेंट घोटाळा** : महाराष्ट्रात एकेकाळी सिमेंट घोटाळा फार गाजला होता. त्यात तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांना राजीनामा द्यावा लागला. आजच्या संदर्भात विचार केल्यास तो काही फार मोठा घोटाळा नव्हता. पण, तरीही अंतुले यांना पायउतार व्हावे लागले होते.

**हवाला प्रकरण** : नरसिंहराव पंतप्रधान असताना काही विरोधी पक्ष नेते व काही कॅबिनेट मंत्री यांच्यावर सीबीआयने हवाला आरोपपत्र दाखल केले होते. केवळ त्याच आधारावर भाजप नेते लालकृष्ण अडवाणी यांनी लोकसभा सदस्यत्वाचा राजीनामा देत, हवाला आरोपातून निर्दोष सिद्ध झाल्याशिवाय आपण लोकसभेची निवडणूक लढविणार नाही अशी घोषणा केली होती. यानंतर मग अन्य विरोधी सदस्य व मंत्री यांनाही आपापल्या पदांचे राजीनामे सादर करावे लागले होते. पण आज स्थिती बदलली आहे.

**दिल्लीत केजरीवाल** : मागील काही वर्षांत नैतिक मूल्यांची घसरण होत गेली आणि राजकीय नेते निगरगट्ट होत गेले. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे त्याचे मूर्तिमंत उदाहरण होते. दिल्ली मद्य घोटाळ्यात त्यांना अटक झाली. त्यांची रवानगी तिहार कारागृहात करण्यात आली. पण, केजरीवाल काही राजीनामा देण्यास तयार होत नव्हते. काही काळ त्यांनी राजीनामा देण्याचा विचार केला होता. आपल्या पत्नीस मुख्यमंत्री करण्याचा विचार ते करीत होते. मात्र शेवटी त्यांनी राजीनामा न देण्याचा निर्णय घेतला. मुख्यमंत्री कारागृहात आणि तरी त्यांचे सरकार मात्र अस्तित्वात अशी हास्यास्पद स्थिती देशाच्या राजधानीत तयार झाली आणि बहुधा या एका कारणामुळे केंद्र सरकारने असे विधेयक आणण्याचा विचार केला असावा असे आता दिसते.

**दक्षिणेतील बालाजी** : तामिळनाडूतील एक मंत्री बालाजी यांच्याही बाबतीत असाच प्रकार घडला होता. त्यांनाही अटक करण्यात आली. पण मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी त्यांचा राजीनामा मागितला नाही आणि स्वत: बालाजी यांनी तो दिला नाही. ते मंत्री म्हणून तुरुंगात गेले आणि मंत्री म्हणून बाहेर आले. आणि जणू काही झालेच नाही अशा थाटात त्यांनी पुन्हा आपले कामकाज सुरू केले.

**विधेयकाचे भवितव्य** : संयुक्त समिती आपला अहवाल किती काळात देईल, ते केव्हा पारित केले जाईल, यावर सर्वोच्च न्यायालय काय भूमिका घेईल हे सारे प्रश्न आज तरी अनुत्तरित आहेत. येणाऱ्या काळात त्याची उत्तरे मिळू लागतील. मात्र या निमित्ताने राजकारणातील नैतिक मूल्यांचा मुद्दा पुन्हा समोर आणला गेला आहे. राजकीय नेत्यांनी नैतिक मूल्यांचे पालन केले असते तर कदाचित केंद्र सरकारवर असे विधेयक आणण्याचा प्रसंग आला नसता. नैतिक कारणांसाठी एखाद्या राजकीय नेत्याने वा न्यायाधीशाचे पद सोडल्याची घटना मागील काही वर्षांत घडल्याचे स्मरणात नाही. आरोपपत्र दाखल होऊन, अटक झाल्यावरही पदाला चिकटून राहण्याची नवी मानसिकता तयार झाली आहे. या साऱ्या पृष्ठभूमीवर या विधेयकाचे अवलोकन करण्यात आले पाहिजे.

१३० व्या घटना दुरुस्ती विधेयकात पंतप्रधान, मुख्यमंत्री यांना बरखास्त करण्याचा अधिकार राष्ट्रपती व राज्यपालांना देण्यात आला आहे. विशेष म्हणजे राष्ट्रपती व राज्यपालांच्या काही अधिकारांबाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. राष्ट्रपती व राज्यपाल यांनी संसद व विधानसभा यांनी पारित केलेल्या विधेयकांना एका निर्धारित अवधीत मंजुरी दिली पाहिजे असा एक निवाडा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यासंदर्भात राष्ट्रपतींनी कलम १४३ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाचे मत मागितले आहे.

**परखड प्रश्न** : राष्ट्रपतींनी मागितलेल्या अभिमतावर न्यायालयात सुनावणी सुरू असताना सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने एक परखड प्रश्न विचारला, 'एखाद्या राज्य विधानसभेने २०२० मध्ये एखादे विधेयक पारित केलेले असेल आणि २०२५ पर्यंतही त्याला राज्यपालांची मंजुरी मिळालेली नसेल तर याचा अर्थ सर्वोच्च न्यायालय असहाय- हतबल झाले आहे असा होत नाही काय' असा तो प्रश्न होता.

**अर्थ विधेयक** : विधानसभेने पारित केलेल्या अर्थ विधेयकाची मंजुरीही राज्यपाल रोखू शकतात काय असा एक प्रश्न न्या. नरसिंहा यांनी विचारला असता, महाराष्ट्रातर्फे युक्तिवाद करताना ॲड. हरीश साळवे यांनी होकारार्थी उत्तर दिले. राज्यपालांना हाही अधिकार असल्याचे त्यांनी न्यायालयास सांगितले. नंतर ॲटर्नी जनरल तुषार मेहता यांनी याबाबत स्पष्टीकरणाचा प्रयत्न केला.

**पुन्हा एक फेरी** : म्हणजे एकीकडे राष्ट्रपती व राज्यपाल यांचे अधिकार मर्यादित करण्याची सर्वोच्च न्यायालयाची भूमिका दिसून येत असताना त्यांना अधिक अधिकार देणारे १३० वे घटना दुरुस्ती विधेयक संसदेत सादर करण्यात आले आहे. थोडक्यात संसद विरुद्ध सर्वोच्च न्यायालय अशी आणखी एक फेरी झडण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

## वेध

पुंडलिक आंबटकर

# प्राणवायू निर्मितीत झाडांचे महत्त्व

वैज्ञानिक मान्यतेनुसार पृथ्वीवर सर्वप्रथम सूक्ष्म समुद्री जीव अस्तित्वात आले. त्यानंतर या जीवांनी ऑक्सिजन अर्थातच प्राणवायूची निर्मिती केली आणि कोट्यवधी वर्षांच्या प्रक्रियेनंतर जमिनीवर झाडांची उत्पत्ती झाली. या झाडांनीही प्राणवायू निर्मितीत योगदान सुरू केले जे आजतागायत कायम आहे. पृथ्वीवर प्राणवायू अस्तित्वात आल्यानंतरच चालते बोलते जीव आकारास आले. प्राणवायू जीवसृष्टीचा मूळ आधार आहे. प्राचीन काळी वातावरणात प्रहणवायूचे प्रमाण आजच्या तुलनेत अधिक होते. त्यामुळेच पूर्वी मनुष्याचे आयुर्मान १०० वर्षांवर होते. जे आज केवळ ७० वर्षे उरले आहेत. वैज्ञानिकदृष्ट्या कुठलेही झाड २४ तास ऑक्सिजन निर्मिती करीत नाही. परंतु, तुळस आणि पिंपळ हे दोन वृक्ष यास अपवाद आहेत. झाडे प्रामुख्याने प्रकाशसंश्लेषणाद्वारे प्राणवायू निर्मिती करतात. त्यामुळे बहुतांश झाडे दिवसा वातावरणात ऑक्सिजन सोडतात. तर रात्री ऑक्सिजन घेतात आणि कार्बन डायऑक्साईड उत्सर्जित करतात. परंतु, तुळस सदैव केवळ आणि केवळ ऑक्सिजनच उत्सर्जित करते. त्यामुळेच हिंदू संस्कृतीत तुळस पूजनीय आहे. वातावरणातील एकूण ऑक्सिजनच्या सुमारे २८ टक्के प्राणवायू जमिनीवरील झाडे आणि जंगलांमधून प्राप्त होतो. बाकी ७२ टक्के ऑक्सिजन समुद्रातील शेवाळजन्य वनस्पती व सूक्ष्म जीव निर्माण करतात. एका मान्यतेनुसार एक प्रौढ झाड दिवसाला जवळपास २७४ लिटर ऑक्सिजनची निर्मिती करते. ज्या झाडाला अधिक पाने असतात ते झाड अधिक प्राणवायू देते. सूर्यप्रकाश हा झाडांच्या जीवनाचा आधार आहे. झाडांना आपले अन्न तयार करण्यासाठी पाणी, कार्बन डायऑक्साईड आणि सूर्यप्रकाशाची गरज पडते. या प्रकियेतून तयार होणारा ऑक्सिजन झाडे आपल्या पानांच्या माध्यमातून वातावरणात सोडतात. मनुष्य मात्र केवळ प्राणवायू घेतो आणि कार्बन डायऑक्साईड वाढवून वातावरण दूषित करण्यास हातभार लावतो. शिवाय झाडांची कत्तल करून वातावरणाचा समतोल बिघडवतो. सध्या वातावरणातील ऑक्सिजनची टक्केवारी २१ इतकी आहे. जी पूर्वीच्या तुलनेत खूप कमी आहे. आधुनिक काळात जीवाश्म इंधन अर्थातच पेट्रोल, डिझेल, रॉकेल आदींचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. हे इंधन जाळण्यासाठी प्राणवायू खर्ची पडत असल्याने ऑक्सिजनचे प्रमाण कमी होत आहे. शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात जीवाश्म इंधनाचा वापर होत असल्याने ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी वातावरण अधिक दूषित झाले आहे. त्यामुळे अनेक आजारांचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. यातूनच 'हिरवेगार शहर' ही संकल्पना अस्तित्वात आली आहे. त्यामुळेच की काय, नागपूर शहरात जागोजागी मोठमोठे वृक्ष दिसून येतात. तसेही नागपूरकर पूर्वीपासूनच पर्यावरणवादी आहे, ही बाब वेगळी.



दक्षिण अमेरिकेत वसलेल्या ॲमेझॉन जंगलातून तब्बल २० टक्के ऑक्सिजन निर्मिती होत असल्याचा दावा पूर्वी केला जायचा. परंतु, एकट्या ॲमेझॉन जंगलामधून २० टक्के ऑक्सिजन कसा काय निर्माण होऊ शकतो, असा प्रश्न वारंवार उपस्थित केला जात होता. त्यानंतर या जंगलातून ६ ते ९ टक्के ऑक्सिजन मिळत असल्याचा निष्कर्ष शास्त्रज्ञांनी काढला आणि हा निष्कर्ष सर्वमान्य झाला. ॲमेझॉन हे एक वर्षावन असून त्याचा व्यास तब्बल ६.७ दशलक्ष चौरस किलोमीटर इतका आहे. हे वर्षावन अनेक देशांमध्ये विस्तारले असून त्याचे सर्वाधिक क्षेत्र ब्राझीलमध्ये आहे. कोरोना काळात संपूर्ण जगात ऑक्सिजनची कमतरता भासली. झाडे व अन्य घटकांकडून फुकट मिळणाऱ्या या ऑक्सिजनसाठी लाखो रुपये खर्च करूनही अनेकांचा जीव गेला. अशाही परिस्थितीत मनुष्याला अद्याप झाडांचे महत्त्व पूर्णत: कळल्याचे ठामपणे म्हणता येत नाही. काही नागरिक झाडांच्या संगोपनासाठी झटतात. परंतु, बहुतांश नागरिकांना त्याचे सोयरसुतक नसते. लोकसंख्या ज्या गतीने वाढत आहे, त्याच गतीने झाडांचा आणि प्रामुख्याने जंगलांचा नायनाट होत आहे. झाडेझुडपे कमी झाल्याने केवळ ऑक्सिजन निर्मितीवरच परिणाम झालेला नाही. तर यामुळे अनेक समस्यादेखील निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे भविष्यात पर्यावरणाचा समतोल राखायचा असेल तर मोठ्या प्रमाणात झाडे लावून त्यांचे संगोपन करावे लागतील. प्रत्येक मनुष्य या पृथ्वीवर केवळ एक पाहुणा आहे. येणाऱ्या पिढ्यांना पर्यावरणपूरक वारसा सोपविणे हे प्रत्येकाचेच कर्तव्य आहे आणि हीच खरी संस्कृती आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

अमोल पुसदकर

# महालक्ष्मी पूजनाचा खरा अर्थ

ज्येष्ठा गौरी आवाहन हा गणपतीमध्येच अतिशय धूमधडाक्यात साजरा होणारा उत्सव आहे. या उत्सवामध्ये गौरीची पूजा केली जाते. तसे पाहिले तर स्कंदपुराण, मार्कंडेय पुराण, पद्मपुराण, देवीभागवत या सर्वच ग्रंथांमध्ये देवीची उपासना सांगितलेली आहे. कधी तिला आद्यशक्ती म्हटलेले आहे, कधी राक्षसांचा संहार करणारी म्हणून तिचे पूजन केलेले आहे, तर कधी धन, धान्य, ऐश्वर्य, संपत्ती देणारी महालक्ष्मी म्हणून तिचे पूजन केलेले आहे.

आपल्या सनातन धर्मामध्ये पुरुष देवता आणि स्त्री देवता असा काही भेदभाव नाही. पूर्वी साधारणतः शंकर, विष्णू, देवी, सूर्य आणि गणपती या देवतांची सर्व पूजा केली जायची. वैष्णव हे विष्णूला प्रमुख देवता मानायचे आणि इतर सर्वांचीही पूजा करायचे. शैव शंकराला प्रमुख देवता मानायचे आणि इतर सर्वांचीही पूजा करायचे. त्याचप्रमाणे काही लोक देवीला प्रमुख देवता मानायचे, तर काही सूर्याला, तर काही गणपतीला. परंतु इतर सर्व देवतांची पूजा केली जायची.

ज्येष्ठा गौरी हे सुद्धा देवीचे स्वरूप आहे. देवीचीच ती पूजा आहे. ही धन, धान्य, ऐश्वर्य, संपत्ती देणारी महालक्ष्मी आहे. आपला समाज प्रामुख्याने गृहस्थाश्रमी समाज आहे. गृहस्थाश्रमी माणसाला नेहमीच त्याच्या परिवाराची, मुलाबाळांच्या भविष्याची चिंता असते. त्यामुळे ''आज माझ्याजवळ जी सुख-संपदा आहे ती भविष्यातही कायम राहील की नाही?'' ही चिंता त्याला नेहमी सतावत असते. त्याला वाटते की ही सुखसंपत्ती माझ्या आयुष्यापर्यंत तर राहिलीच पाहिजे, पण माझ्या मुलांनाही कशाची कमतरता पडू नये. ज्यांच्याजवळ आज धन-धान्य, ऐश्वर्य, संपत्तीची कमतरता आहे, त्यांना वाटते की आमच्या जीवनात जरी कमतरता आजपर्यंत राहिलेली असली तरी उद्या ती राहू नये आणि मुलांच्या जीवनात तर अजिबातच राहू नये. त्यामुळे हा समाज विविध निमित्ताने महालक्ष्मीची पूजा करीत असतो. ज्येष्ठा गौरी आवाहन हे महालक्ष्मीचेच आवाहन आहे.

आपल्या धर्मामध्ये लक्ष्मी आणि अलक्ष्मी अशी दोन रूपे सांगितलेली आहेत. परंतु सात्त्विक समाज हा फक्त लक्ष्मीची पूजा करतो. अलक्ष्मीला चांगले म्हटले गेलेले नाही. आज आपल्या समाजामध्ये काळा पैसा आहे, तो अलक्ष्मीचे स्वरूप आहे, असे मानले गेलेले आहे. या अलक्ष्मीमुळे कधीही सुखशांती येत नाही. आज आपण समाजामध्ये रोज निरनिराळे घोटाळे उघडकीस येताना पाहतो. एखादा मोठा राजनेता त्याचे आयुष्य खूप मोठ्या ऐश्वर्यात गेलेले असते, पण त्याच्या आयुष्याच्या संध्याकाळी त्याला तुरुंगात जावे लागते.

ज्यावेळी नोटबंदी झाली, त्यावेळी बँकेत विचारले जायचे की ''हे पैसे कुठून आणलेत? याचा उगम काय?'' त्यावेळी तो स्रोत सांगावा लागायचा. त्यामुळे अनेकांनी घरी पोत्यांमध्ये भरून ठेवलेले पैसे शेवटी पेटवून दिले, तर काहींनी ते उकिरड्यावर फेकले. तात्पर्य काय? अशांच्या जीवनात चिंता ही लागूनच राहते. चिंता हे अनेक रोगांचे कारण असते. त्यामुळे आयुष्यभर असा पैसा सांभाळणाऱ्या लोकांना अनेक शारीरिक व्याधी चिकटतात. इतिहास आपल्याला सांगतो की, ज्यांनी लोकांकडून लुबाडलेला पैसा गोळा केला, त्यांचा अंत त्या पैशाच्या राशीकडे पाहता पाहता झालेला आहे. श्रीमंत असणे, वैभवसंपन्न असणे हे चांगलेच आहे. अनेक मोठे व्यापारी अगदी चिकाटीने आपला व्यवसाय करतात व हळूहळू मोठी संपत्ती तयार करतात. अशा लोकांबद्दल समाजालाही आदर असतो आणि असे लोक समाजासाठी मुक्तहस्ते खर्च करण्यामध्येही मागेपुढे पाहत नाहीत. मागे मी एक लेख वाचला होता. त्यामध्ये सारांश असा होता की बिल गेट्स जगातील इतका श्रीमंत माणूस आहे, तो तर महालक्ष्मीची पूजा करत नाही, मग त्याच्याकडे एवढी लक्ष्मी कशी आहे? अनेक वेळा मोठमोठे लोक खूप छोटे प्रश्न विचारतात. अमेरिकेमध्ये राहणारा माणूस ''अमेरिका माता'' म्हणत नाही, जपानमध्ये राहणारा माणूस ''जपान माता'' म्हणत नाही. पण भारतामध्ये राहणारा माणूस मात्र भारताला भारत माता म्हणतो. भारतामध्ये राहणारा माणूस हा भारतमातेचे देवीस्वरूपात दर्शन घेतो, तिची पूजा करतो. मूळ वंदे मातरम्‌मध्ये दुर्गेचे वर्णन आहे ''त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणी'' असे म्हटलेले आहे. त्यामुळे हा पाश्चिमात्य आणि भारतीय दृष्टिकोनाचा फरक आहे.

आपण नेहमीच आपल्यापेक्षा उच्च आदर्शांकडे पाहिले पाहिजे. पोट तर पशू सुद्धा भरतात, परंतु पशू जसे खातात तसे आपण खात नाही. पशू जसे राहतात तसे आपण राहत नाही. ज्या गोष्टी बिल गेट्सला आपल्यापेक्षा चांगल्या येतात त्या त्याच्याकडून शिकाव्यात आणि ज्या गोष्टी आपल्याकडे चांगल्या आहेत त्या त्यालाही दिल्या पाहिजेत.

जो माणूस व्यवसाय करतो त्याच्याकडे पैसे हे येणारच आहेत. तो बिल गेट्स असेल, नाहीतर अंबानी असेल. परंतु मानवीय सभ्यतेचा उगम आपल्या देशात फार पूर्वी झाला आहे. आपल्या देशातील ऋषिमुनींनी, महापुरुषांनी सर्वसामान्य माणसाला जीवन कसे जगावे हे सांगितले आहे.

वाल्या कोळी नावाचा एक दरोडेखोर होता. तो दरोडे टाकून, लूटमार करून पैसे मिळवीत असे. देवर्षी नारदांनी त्याला विचारले ''ज्यांच्यासाठी हे पाप करतोस त्यांना विचारून पाहा की ते तुझ्या पापाचे वाटेकरी होतील का?'' वाल्याने त्याच्या बायको, मुलांना ते विचारले. त्यावर पत्नी आणि मुलं म्हणाली ''आमच्यासाठी पैसे कमवून आणणे आणि आमचे पोट भरणे हे तुमचे कर्तव्य आहे. पण आम्ही तुमच्या पापाचे वाटेकरी होणार नाही, कारण आम्ही तुम्हाला या प्रकारे पैसे कमवून आणा असे सांगितलेले नाही.''

हे भारतीय दर्शन आहे. हा भारतीयांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आहे. मिळेल ते खाऊन पोट तर जनावरं सुद्धा भरतात, पण पोट कसे भरले पाहिजे हे आपल्या ऋषिमुनींनी, साधुसंतांनी, महापुरुषांनी सांगितलेले आहे. समाजमाध्यमावर एक व्हिडीओ पाहिला होता. त्यामध्ये म्हटले होते- ''तुमचे मन तुमच्याकडे येणाऱ्या पैशाला नियंत्रित करू शकते.'' आपण जर सतत असा विचार करत राहिलो की ''माझ्याकडे हे नाही, ते नाही, मी दरिद्री आहे'', तर जगातील दारिद्र्य आपल्याकडे खेचले जाईल. आकर्षणाचा नियम सुद्धा हेच सांगतो. ज्येष्ठा गौरीचे आवाहन करणे म्हणजे प्रत्यक्ष महालक्ष्मी माझ्या घरी आलेली आहे. ''मला आता यापुढे काही कमी पडणार नाही. महालक्ष्मीचा आशीर्वाद माझ्यावर व माझ्या परिवारावर सदैव आहे आणि राहील''अशा पद्धतीचा विचार जर आपण केला, तर आकर्षणाचा सिद्धांत आपल्या मदतीला नक्कीच येईल आणि आपल्या घरात समृद्धी येईलच. ज्याप्रमाणे माहेरी आलेल्या मुलीची आपण खूपच काळजी घेतो, तिला मनाप्रमाणे व प्रसन्न राहता येईल असे पाहतो, तिला जे आवडते ते सर्व काही करतो, त्याप्रमाणेच ज्येष्ठा गौरीचे आवाहन म्हणजे आमच्या जीवनाला लागणाऱ्या सर्व गोष्टींची पूर्तता करणारी महालक्ष्मी. तिचे आवाहन व पूजन करण्याचा हा दिवस आहे. या महालक्ष्मीचा वास आमच्या घरात नित्य राहावा, आमच्या देशातही ही महालक्ष्मी स्थिर राहावी यासाठी महालक्ष्मीची पूजा आणि तिच्यासाठी प्रत्येकाने वर्षभर चांगले प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी समाजाने स्वदेशीची कास धरणे पण आवश्यक आहे. असे झाल्यास भारत परमवैभवशाली होईल आणि ज्येष्ठा गौरीचे आवाहनही सफल होईल.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## सुखसमृद्धीसाठी ज्येष्ठा गौरी व्रत

भाद्रपद शुक्ल पक्षात ज्येष्ठा गौरी व्रत केले जाते. अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी स्त्रिया हे व्रत करतात. पुराणात अशी कथा आहे की, असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया श्रीमहालक्ष्मी गौरीला शरण गेल्या. त्यांनी आपले सौभाग्य अक्षय करण्याविषयी तिची प्रार्थना केली. श्रीमहालक्ष्मी गौरीने भाद्रपद शुक्ल अष्टमीला असुरांचा संहार करून शरण आलेल्या स्त्रियांच्या पतींना तसेच पृथ्वीवरील प्राण्यांना सुखी केले. म्हणूनच अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी स्त्रिया ज्येष्ठा गौरीचे व्रत करतात. हे व्रत तीन दिवस चालते. महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी पाच लहान मडक्यांची उतरंड रचून त्यावर गौरीचा मातीचा मुखवटा बसवतात. काही ठिकाणी सुवासिक फुलांच्या वनस्पतीची रोपे किंवा तेरड्याची रोपे एकत्र बांधून त्यांची प्रतिमा बनवली जाते आणि त्यावर मातीचा मुखवटा चढवतात. त्या मूर्तीला साडी नेसवून अलंकारांनी सजवले जाते. काही ठिकाणी धातूची किंवा मातीची प्रतिमा करून अथवा कागदावर श्रीमहालक्ष्मीचे चित्र काढून पूजन केले जाते; तर काही ठिकाणी नदीकाठचे पाच लहान खडे आणून त्यांचे गौरी म्हणून पूजन करतात. गौरीची स्थापना झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी तिची पूजा करून नैवेद्य दाखवतात. तिसऱ्या दिवशी गौरीचे विसर्जन करतात. ज्येष्ठा गौरी व्रत केल्याने श्रीगणेशासह श्रीमहालक्ष्मीचा कृपाशीर्वाद लाभतो आणि ऐहिक जीवनात सुख-समृद्धी प्राप्त होते.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

## संवेदनशून्यता माणसाचे मोल शून्य करते

अलिकडेच ओडिशाच्या बालासोर येथील विद्यार्थिनी विभाग प्रमुखाकडून झालेल्या लैंगिक छळाविरोधात शासन-प्रशासन यांच्याकडे दाद मागते, पण ते बहिऱ्याचे सोंग घेतात, तेव्हा नैराश्यातून ती आत्मदहन करते. तिचा उपचारादरम्यान मृत्यू होतो आणि मग जनता पेटून उठते. माणूस मेल्यानंतरच जिवंत माणसे का बरे पेटून उठत असतील. आधुनिक विचारांची राज्यस्तरीय टेनिसपटू राधिका यादव हिचा सोशल

## वाचक पत्रे

मीडियावरील वावर न रुचलेल्या तिच्याच मध्ययुगीन मानसिकतेच्या वडिलांनी गोळ्या झाडून हत्या केली. त्या मुलीचे काय चुकले इथे. काळानुरूप ती बदलली, पण मागील पिढीचे विचार तेच पारंपरिक त्यामुळेच एखादी कर्तबगार लेक अशी बळी जाते.

आरपार आतून हसणारी, खिदळणारी माणसे हल्ली हरवली आहेत. निर्विकारता येऊ लागलीय अशी की, आता कसलेच काही वाटेनासे होत आहे. मुळात हा मानवी स्वभाव नाही. माणूस म्हणजे जो दुःख पाहिल्यानंतर दुःखी होतो तो, कुणाचे अश्रू बघून ज्याच्या काळजात कालवाकालव होते तो, हर्षाने जो खुलतो फुलतो तो, कौतुकाने आनंदतो तो. इतरांच्या सुखाने दुःखी होतो तो, सत्तेच्या उन्मादात इतरांना गुलाम समजतो त्याला माणूस म्हणावे का? आपल्या आतला कोलाहल ऐकता आला पाहिजे. विधायक उक्ती या कृतीतून बदलासाठी आपल्या क्षमतेने आपल्यातील निम्मे लोक जरी प्रेरित झाले तरी वेदना जाणवायला जागवू संवेदना या मार्गाने चालण्याची आपली सुरुवात होऊ शकेल.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

## जरांगे पाटलांचे मराठा आरक्षण आंदोलन

महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या लोकांना आरक्षण मिळावे यासाठी जरांगे पाटील सध्या मुंबईत आंदोलन करीत आहेत. ओबीसी आरक्षणाला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही सरकारची भूमिका आहे. त्या भूमिकेतून सरकार पुढे जात आहे, अशी भूमिका राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना मांडली. आंदोलन करण्याचा सर्वांना अधिकार आहे, मात्र राज्यात सर्वत्र गणेशोत्सव साजरा होत आहे. त्यामुळे गणेशोत्सवानंतर आंदोलन करता आले असते. ज्या राजकीय पक्षांनी या आंदोलनाला समर्थन दिले आहे, त्यांनीही याचा विचार करायला हवा होता.

भारतीय संविधानांप्रमाणे आरक्षणाचा कोटा हा निश्चित करण्यात आलेला आहे. त्यात मराठा समाजाला वेगळा आरक्षण कोटा देण्यात आलेला नाही. तरीही मराठा समाजाला आरक्षण पाहिजे आहे. हे आरक्षण त्यांना इतर मागासवर्गीय (ओबीसी) च्या कोट्यामधूनच देणे शक्य होऊ शकते. इतर मागासवर्गीय वर्गाकडून त्यांच्या कोट्यातून मराठा समाजाला आरक्षणाचा कोटा देण्यास सहमती नाही. मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी जे आंदोलन जरांगे पाटील करत आहे, त्यामागे कोणते राजकीय नेते आहेत हे सर्वश्रुत आहे. महाराष्ट्रातील जातींचा विचार केल्यास, इतर मागासवर्गीय वर्ग (ओबीसी) व मराठा समाज यातील फरक लक्षात घेणे गरजेचे आहे. इतर मागासवर्गीय वर्ग व मराठा समाज हे जर एकच असतील तर मराठा समाजाला वेगळे आरक्षण देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. सबब, मराठा समाजाने आंदोलन करून आरक्षण मिळविण्यापेक्षा न्यायालयीन प्रक्रियेद्वारे त्यांनी आरक्षण प्राप्त करून घ्यावे, असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# नांदेड जिल्ह्याला ढगफुटी सदृश्य अतिवृष्टी साठी विशेष पॅकेज द्या: आ. चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ सप्टेबर-**

ढगफुटीच्या सदृश्य परिस्थितीमुळे जिल्ह्याच्या वेगवेगळ्या भागात अतिवृष्टी झाली.लोहा कंधार सह अन्य तालुक्यात पुरामुळे शेतीचे, मानवी वस्तीचे, छोटे मोठे दुकानदार यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.त्यामुळे अतिवृष्टीचे नियम।बाजूला ठेवून नांदेड जिल्ह्यासाठी मदतीचे विशेष पॅकेज जाहीर करावे तसेच नदीकाठच्या शेतीसाठी विशेष बाब म्हणून शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे याच्याकडे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केली आहे.

लोहा-कंधार तालुक्यात २८ व २९ ऑगस्ट रोजी मागील चार फिवसा ढगफुटी सदृश्य अतिवृष्टी झाली त्यामुळे पूरपरिस्थिती उदभवली शेती , दुकाने,अनेक गावातब घराचे मोठे नुकसान झाले जीवनोपयोगी साहित्य पाण्यात गेले, जनावरे वाहून गेली.अनेक ठिकाणी रेसक्यु करून नागरिकांचें जीव वाचविण्यात आले. आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे २८ तारखेपासून दोन्ही तालुक्यात पूरग्रस्त भागात सकाळ पासून नागरिकांना शेतकऱ्यांना भेटून त्याच्या अडीअडचणी जाऊन घेत आहेत त्याची सोडवणुक करत आहेत.त्यांना धीर देत आहेत.



महालक्ष्मी सणाच्या दिवशी सकाळीच आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आठ वाजल्या पासून , गगणबीड हाडोळी, माळेगाव यात्रा, बेरळी, सावरकर नसरत, लोहा, शेलगाव, पिंपळगाव ढगे या गावात जाऊन त्यांनी नुकसान झालेल्या भागाची पाहणी केली नागरिकांशी संवाद साधला. त्याच्या सोबत तहसीलदार विठ्ठल परळीकर सा. बां. विभागाचे उपअभियंता मोहन पवार, जि प बांधकाम विभाग उपअभियंता शिवाजी राठोड, तालुका कृषी अधिकारी कासराळे लघु पाटबंधारे अभियंता बनसोडे, मृदा संधारण व जलसंधारण उपविभाग कंधार अभियंता उत्तम गायकवाड, एपीआय मुळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद नांदेड अशोक भोजराज, उस्मान नगरचे विद्युत वितरण कंपनीचे अभियंता गच्चे , माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे, माजी जि. प. सदस्य देविदास गीते, उपनगराध्यक्ष छत्रपती धुतमल, दता वाले, साहेबराव काळे, भास्कर पाटील, नरेंद्र गायकवाड, माजी उपसभापती बालाजी पाटील, यासह संबंधित गावातील तलाठी ग्रामसेवक उपस्थित होते

आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी नांदेड जिल्ह्यात ढगफुटी सदृश्य अतिवृष्टीमुळे फार मोठे नुकसान झाले आहे.त्यामुळे अतिवृष्टीबाबतचे नियम।बाजूला ठेवून जिल्ह्यासाठी विशेष अनुदान जाहीर करावे अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केले आहे.तसेच नदी काठच्या शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे जमीन खरडून गेली आहे. त्या शेतकऱ्यांना जास्तीची मदत घ्यावी अशी त्यांनी केली आहे. छोटेमोठे दुकानदार याची हानी झाली त्यांनाही मदत व्हावी. काही नियम व अटीं बाजूला ठेवून जास्तीतजास्त मदत पूरग्रस्त भागात व्हावी अशी अपेक्षा आमदार चिखलीकर यांनी व्यक्त केली व असा नैसर्गिक आपत्तीच्या काळात राजकारण न करता सगळी मिळून आपतिग्रस्त भागात मदत करावी .सरकार या पूरग्रस्त व नुकसान ग्रस्त लोकांना मदत करण्यासाठी सक्षम आहे असे प्रतापराव पाटील प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सांगितले

**सर्व विभाग प्रमुखाचे काम उत्कृष्ट**

लोहा कंधार तालुक्यात अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान झाले आहे या नैसर्गिक आपत्ती काळात एसडीएम गोरे, तहसीलदार विठ्ठल परळीकर व सर्वच विभागाच्या अधिकाऱ्यांनी अतिशय चांगले काम केले व करत आहेत अशी शाब्बासकीची थाप त्यांनी अधिकाऱ्यांच्या पाठीवर दिली

# विनोद पावडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित गौतमी पाटील यांचा कार्यक्रम रद्द

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ सप्टेबर-**



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष विनोद पावडे यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या आयोजित करण्यात आलेला गौतमी पाटील यांचा लावणीचा कार्यक्रम रद्द करण्यात आला असून वाढदिवसावर होणारा खर्च टाळून नांदेड जिल्ह्यातील पूरग्रस्तांना मदत करणे आणि मुंबईत सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या बांधवांसाठी भोजन व्यवस्थेवर खर्च करण्यात येईल अशी माहिती विनोद पावडे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेला विद्यार्थी सेना राज्य उपाध्यक्ष दिपक स्वामी, मनसे जिल्हाध्यक्ष रवी राठोड, वहातुक सेना जिल्हाध्यक्ष संतोष सुनेवाड, आकाश गेंटेवार, विशाल पावडे, आमर कोडराज, धम्मपाल आढाव ,योगेश्वर मोरे , गोविंद पाटील मोरे ,शक्ती परमार आदी उपस्थित होते.

समाज बांधव संकटात सोडून अशी कुठल्याही प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम उचित नसल्याने सर्व सांस्कृतिक कार्यक्रमाला फाटा देऊन केवळ साध्या पद्धतीने वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाढदिवसानिमित्त सकाळी सात वाजता मरळक येथील विमलेश्वर महादेव मंदिरात महाभिषेक करण्यात येईल. त्यानंतर या ठिकाणी वारकरी संप्रदाय साधक यांना भेटवस्तू आणि अल्पोपार देण्यात येईल. सकाळी नऊ वाजता नांदेड शहरातील महापुरुषांच्या पुतळ्याला दुग्धभिषेक करून अभिवादन करण्यात येणार आहे . सकाळी अकरा वाजता खडकुत येथील गो शाळेतील पशुंसाठी एक ट्रक चारा भेट देण्यात येणार आहे. दुपारी बारा वाजता तख्त सचखंड श्री हुजूर साहेब गुरुद्वारा येथे माथा ठेकून आशीर्वाद घेण्यात येणार आहे. दुपारी दोन वाजता धनेगाव येथील अंध विद्यालयातील विद्यार्थ्यांना समवेत साध्या पद्धतीने वाढदिवस साजरा करून त्यांना मिष्ठान्न भोजन पंगत देण्यात येणार आहे. दुपारी साडेतीन वाजता संध्याछाया वृद्धाश्रम मालेगाव रोड येथे अन्नदानाचा कार्यक्रम होईल. दुपारी चार वाजता सिंधुताई पावडे पेट्रोल पंपावर वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला आहे. सायंकाळी पाच वाजता नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील पूरग्रस्त गरजूंना धान्याची किट वाटप करण्यात येणार आहे. अशी माहिती ही या पत्रकार परिषदेत देण्यात आलेली आहे.

**मुंबईतील आंदोलकांसाठी भोजन आज रवाना**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज दादा जरांगे यांच्या नेतृत्वात मुंबईत मोठे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनात सहभागी झालेल्या मराठा बांधवांची कोणतीही उपासमार होऊ नये किंवा त्यांना खाण्यापिण्याचे अडचणी येऊ नयेत यासाठी स्वखर्चातून वीस हजार मराठा बांधवांना जेवण पुरेल इतके जेवण पाठवत असल्याचे विनोद वाडे यांनी सांगीतले.

## संक्षिप्त वृत्त

### किनवट बाल गणेश भक्तांचा स्वच्छता उपक्रम कौतुकास्पद

**किनवट**-अग्निपंख गणेश मंडळ, बालाजी चौक किनवट येथे बाल गणेश भक्तांनी परिसरात स्वच्छता अभियान राबवले. बालाजी चौक, सरस्वती मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह व विश्वकर्मा गणेश मंडळ परिसरात केरकचरा, प्लास्टिक, चिप्स पॅकेट्स आदी गोळा करून परिसर स्वच्छ करण्यात आला. नगरपरिषद स्वच्छता दूत बाळकृष्ण कदम यांनी मुलांशी संवाद साधून स्वच्छतेचे महत्त्व पटवले. नगरपरिषद टीमने फोटो सोशल मीडियावर प्रसिद्ध करून ट्रॅक्टरद्वारे कचरा उचलला व नालींमध्ये पावडर टाकली. या अभियानात अधिराज बाळकृष्ण कदम, मानव राहूल कसबे, साई रमेश अर्जावार, दर्शन राजू कसबे, मोक्ष देवा पबतवार, विराट संजय कसबे, दुर्वा बाळकृष्ण कदम, आरुषी विनोद जाधव, तनुषा देवा पबतवार, वैष्णवी श्रीचंद राठोड, संस्कृती रामप्रभू गुरूनले, सायली संजय कसबे, ममता सुर्वे, वेदिका श्रीचंद राठोड, पायल विनोद जाधव, मल्लेश दासरवार, मुकेश आकुलवार, वैराग दासरवार आदी बाल गणेश भक्तांनी सहभाग घेतला. सामाजिक बांधिलकी जपत साईरत्न मेडीकलचे विश्वजीत सूर्यवंशी यांनी मास्क व ग्लोजचे मोफत वाटप केले. गणेशोत्सवाच्या निमित्ताने अशा उपक्रमामुळे स्वच्छतेसह रोगराई नियंत्रणात ठेवण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



### स्नेहा माळोदे ठरल्या पैठणी साडीच्या मानकरी

**नांदेड**-शहरातील सार्वजनिक गणेश मंडळ येथे आयोजित करण्यात आलेल्या होम मिनिस्टर या कार्यक्रमांमध्ये प्रथम क्रमांक पटकावून सौ. स्नेहा शशिकांत माळोदे ह्या पैठणी साडीच्या मानकरी ठरल्या आहेत. त्यांना पैठणी साडी देऊन गौरविण्यात आले आहे. शहरातील जुन्या गावात असलेल्या माळोदे गल्ली येथे १९२५ रोजी सार्वजनिक गणेश मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. मानाच्या गणपतीचे १०१ वर्ष चालू आहे. मंडळाजवळ दिनांक २९ रोजी महादेव ढोणे यांच्या होम मिनिस्टर ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमास परिसरातील महिलांनी उदंड प्रतिसाद दिला.या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या महिलेसाठी परिवार कलेक्शन च्या वतीने पैठणी साडीचे पारितोषिक ठेवण्यात आले होते. या स्पर्धेत सौ. स्नेहा शशिकांत माळोदे यांनी प्रथम क्रमांक पटकावून पैठणी साडीच्या मानकरी ठरल्या, तर द्वितीय पारितोषिक संगीता सत्यप्रकाश माळोदे (मिक्सर),तृतीय पारितोषिक मेघाताई सुरेश उत्तरवार (गॅस शेगडी), चतुर्थ पारितोषिक शैलजाताई सतीश माळोदे (चांदीचे नाणे),पाचवे पारितोषिक शारदाताई सूर्यवंशी (डिनर सेट), सहावे पारितोषिक कोमल सूर्यकांत माळोदे (गोल्डन पाट),सातवे पारितोषिक सुशिलाबाई रामराव घाळप्पा (ए वन प्रेस) यांना देण्यात आले. स्पर्धेत विजयी झालेल्या सर्व महिला स्पर्धकांचा सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



### हर्षवर्धन सपकाळ यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**बाऱ्हाळी**-महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि प्रदेश महासचिव डॉ. श्रावण रॅपनवाड यांच्या वाढदिवसानिमित्त पूरग्रस्त परिस्थितीमुळे बॅनर जाहिराती आदि खर्चाला फाटा देऊन पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची वाटप करून साजरा करण्यात आला. मुखेड तालुक्यातील लेंडी प्रकल्प क्षेत्रात मागील पंधरवड्यात ढगफुटी सदृश्य पाऊस होऊन अनेक गावे पाण्याखाली गेले होते. त्या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ (३१ऑगस्ट) आणि महासचिव डॉ. श्रावण रॅपनवाड(१सप्टेंबर) यांचा वाढदिवस साधेपणाने साजरे करताना नांदेड जिल्ह्यातील प्रदेश पदाधिकारी प्रदेश उपाध्यक्ष प्रा.यशपाल भिंगे, प्रदेश महासचिव ॲड.सुरेंद्र घोडजकर, प्रदेश महासचिव डॉ. श्रावण रॅपनवाड, डॉ. रेखाताई चव्हाण, प्रदेश महासचिव डॉ दिनेश निखाते यांच्याकडून लेंडी प्रकल्प क्षेत्रातील पूरग्रस्त हसणाळ, भिंगोली, भेंडेगाव बु, भेंडेगाव खु,भाटापुर, रावणगाव आदी बुडीत गावातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य स्कूल बॅग, परीक्षा पॅड, पेन, कंपास व अर्धा डझन वह्या देऊन विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावत शिक्षणाचे महत्त्व विषद केले. या संपूर्ण गावातून फिरताना सोबत मुखेड तालुकाध्यक्ष राजीव पाटील रावणगावकर, कार्याध्यक्ष संभाजी पाटील उंदरीकर, नांदेड कार्याध्यक्ष बालाजी चव्हाण, शहराध्यक्ष हनुमंत नारनाळीकर, महिला आघाडीच्या प्रा ललिता कुंभार, जेसिका शिंदे, मुखेड शहर अल्पसंख्यांक आघाडी अध्यक्ष इम्रान पठाण, युवक काँग्रेस शहराध्यक्ष जयप्रकाश कानगुले, उपाध्यक्ष बालाजी वाडेकर,या ढगफुटी सदस्य पावसात या पूरग्रस्त भागाची, शेतीची आणि जनजीवनाची अतिशय वाताहत उडाली आहे. विद्यार्थी व लहान मुले हे भयभीत झाले असतानाच काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी शैक्षणिक क्षेत्रासाठी केलेल्या स्तुत्य उपक्रमाचे या जलसंकटग्रस्त भागात एक दिलासा ठरला आहे.

# ‘तेव्हा ना धर्म होता,तेव्हा ना जात होती’.... राहुलदेव कदम यांच्या गझल गायनाने देगलूरकर तृप्त

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १ सप्टेबर-**

येथील सुफी मित्र परिवार तर्फे आयोजित अंतर्नाद दुसरी मासिक संगीत सभेच्या कार्यक्रमात प्रसिद्ध गजल गायक राहुलदेव कदम यांच्या गझल गायनाने देगलूरकर तृप्त झाले.यावेळी त्यांनी एकापेक्षा मराठी आणि उर्दू गझल सादर करून रसिकांची मने जिंकली.

येथील देगलूर नगरीचे भूमिपुत्र प्रसिद्ध उर्दू शायर स्वर्गीय जुबेर अहेमद यांच्या स्मरणार्थ सुफी मित्र परिवारातर्फे सदरील गझल गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

सदरील कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी पंडित बाबुराव उप्पलवार,गझल गायक राहुलदेव कदम ,प्रसिद्ध बासरीवादक ऐनोद्दीन वारसी, रजी जुबेर अहेमद,शबाना हाशमी वारसी, दिपालीताई वडगावकर,श्रीमती वैशाली सागावे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना ऐनोद्दीन वारसी यांनी केली. त्यांनी संगीत सभेच्या आयोजनामागची भूमिका सांगितली आणि उर्दू शायर जुबेर अहेमद यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला आणि त्यांचे उर्दू शायरीमध्ये असलेले योगदान याची माहिती उपस्थितांना दिली.

प्रास्ताविक भाषणानंतर योगेश्वरी रत्नपारखे हिने बासरी वर राग यमन सादर केला . त्यानांतर गोविंद सुवर्णकार यांनी हम तेरे शहर में आये है हि गजल अप्रतिम रित्या सादर केली .यानंतर डॉ.सुनील जाधव यांनी होठों से छूलो तुम ही गजल सादर केली. यानंतर श्रीनिवास लंकावाड याने बासरीवर राग हंसध्वनी सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. यानंतर देगलूर चे सुप्रसिद्ध गायक बाळासाहेब पाटील यांनी शाम से आंख मे नमी सी है आणि सिने मे जलन हे गजल प्रस्तुत करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

स्थानिक कलावंतांच्या सादरीकरणानंतर लातूरहून आलेले महाराष्ट्रातील प्रसिद्ध गझल गायक राहुलदेव कदम यांच्या गझल गायनाचा कार्यक्रम झाला.यात त्यांनी एकापेक्षा एक मराठी आणि उर्दू गझल सादर करून देगलूरकरांची मने जिंकली.त्यांनी ' कोणती जागा अशी जिथे नाही गझल' ,मी कुठे जन्मभर संगती मागतो ,दिलासे दिल्याने बरे वाटते,तुम को देखा तो ये खयाल आया ,प्यार का पहला खत लिखने मे वक्त लगता है ,नये परिंदों को पहले उडणे मे वक्त तो लगता है ,जगू देत नाही मरू देत नाही,गर आप साथ होते तो कुछ और बात होती असे एकापेक्षा एक उत्कृष्ट गझल सादर करून श्रोत्यांची दाद मिळवली. कार्यक्रमात तबल्यावर प्रकाश सोनकांबळे आणि गंगाधर सुगावकर यांनी साथ दिली, हार्मोनियमवर प्रा. गौतम भालेकर यांनी साथ दिली,गिटार वर राहुल कदम तर बासरीवर अनहद वारसी यांनी साथ दिली. कार्यक्रमाची शेवट ऐनोद्दीन वारसी यांनी बासरीवर राग तिलक कामोद प्रस्तुत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवानंद स्वामी यांनी केले तर आभार कु. वरदा वारसी यांनी मानले .

कार्यक्रमास प्रा.शंकर बिरादार, प्रा. नामदेव पांचाळ श्यामसुंदर देशमुख, सुरेश देशमुख, चंद्रशेखर कौरवार, संजय मोतेवार, शीतल कुलकर्णी,उमाकांत काजळे,विजय आमटे, दामोदर सुवर्णकार, सेवानिवृत्त पोलीस मिरदोडे, गिरीश कळसकर,सोमेश मदनूरकर,प्रा. विवेक ठावरे आदी उपस्थित होते .

# निवेदनाद्वारे प्रभाग रचनेच्या प्रारुपात काँग्रेस पक्षाने लेखी नोंदविला आक्षेप



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १ सप्टेबर-**

मुदखेड नगर परिषदेच्या सार्वत्रीक निवडणुकीसाठी नगर परिषदेने शहरात एकूण २० प्रभाग रचनेचा प्रारूप दि १८ ऑगस्ट रोजी घोषित करण्यात आली होती स्थानिक काँग्रेस पक्षाने घोषित केलेल्या प्रभाग रचनेत अनेक विसंगती असून तांत्रिक दृष्ट्या सक्षम नसून २०२२ ची प्रभाग रचना स्थानिक राजकीय पक्षांनी आणि सामाजिक संघटनेनेही स्विकारला असून २०२५ ची शहराची नविन प्रभाग रचना राजकीय प्रभावाखाली तयार करण्यात आली असून सत्ताधारी राजकीय पक्षाला लाभ मिळवूण द्यावा या अनुषंगाने केल्याचा आरोप करत दि. ३० ऑगस्ट रोजी स्थानिक काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष कैलास गोडसे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने नगर परिषदेचे प्रतिनिधी तथा कर निरिक्षक महाजन यांना नविन तयार करण्यात आलेल्या प्रभाग रचनेच्या प्रारूपाचा २०२२ चा मॉडल 'जैसे थे ' ठेवण्याची मागणी करत लेखी स्वरूपात आक्षेप नोंदविला.

यावेळी तालुका कार्याध्यक्ष मोहम्मद गौस, शहर काँग्रेस उपाध्यक्ष सूर्यकांत चौदंते,शहर सचिव अतीख अहमद, शहर युवक काँग्रेस अध्यक्ष मुजीब पठाण, मुस्लिम समाजाचे ज्येष्ठ नेते अब्दुल हाजी अब्दुल रशीद मुलतानी, महंमद युसूफ,मोईन भाई फूलवाले, शहर सहसचिव अब्दुल्ल लतीफ टेलर,युवक शहर उपाध्यक्ष अविनाश चौदंते,सुभाष चौदंते, शहर युवक उपाध्यक्ष अविनाश सोनटक्के ,शहर युवक सचिव वेदांत शेवटे, काँग्रेस कार्यकर्ता संजय बोकेफोड, संतोष चमकुरे, गोविंद बळे यासह आदी काँग्रेस कार्यकर्त्यांची यावेळी उपस्थिती होती.

# आंदोलनकर्त्यांना पाठवल्या पाच हजार चपाती आणि ठेचा



**तभा वृतसेवा**
**निवघा, दि. १ सप्टेबर-**

मुदखेड तालुक्यातील निवघा येथील सर्व समाजबांधवांनी स्व खर्चातून सामान्य गरजवंत मराठा समाज बांधवांना चपाती व भाकर मिर्चीचा ठेसा व चटणी घेऊन मुंबई येथील मराठा समाज आंदोलन कर्त्यांना शेकडो कार्यकर्ते रवाना झाले आहेत.

मुंबई मध्ये आंदोलन कर्ते दाखल होताच रोडवरील हॉटेल व चाय नाष्टा दुकानं बंद केल्यामुळे अनेकांना जेवणाची सोय होत नसल्याची बातमी कळताच मुदखेड तालुक्यातील निवघा येथील गावकऱ्यांनी प्रत्येक घरातून चपाती व भाकरी ठेसा असं पाच हजार चपाती व भाकरी जमा करून दि.३० ऑगस्ट रोजी संध्याकाळी राज्यराणी एक्सप्रेसने मुंबई येथील आजाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलन कर्त्यांना पाठवण्यात आला आहे.

# दक्षिण मतदार संघात आमदार हेमंत पाटील यांच्याकडून पूरग्रस्तांना धान्य किट वाटप

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.१ सप्टेबर-**



राज्यासह नांदेड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे येथील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून नांदेड शहरालगत असलेल्या सिडको वसाहतीतील घरामध्ये पाणी घुसून जीवनावश्यक वस्तूंची नासाडी झाली व जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे काही नागरिकांचे संसार उघड्यावर आले आहेत. ही परिस्थिती स्वतः आ. हेमंत पाटील यांनी पाहणी करून दिनांक ३१ ऑगस्ट रोजी

शिवसेनेच्या वतीने दक्षिण मतदार संघातील सिडको येथील वसंतराव नाईक कॉलेज समोरील परिसरातील पूरग्रस्तांना शिवसेनेच्या वतीने धान्याच्या किट वाटप करण्यात आल्या आहेत.

सध्या झालेल्या अतिवृष्टीमुळे नांदेड जिल्ह्यात अतिवृष्टीचा मोठा फटका बसला असून येथील शेतकरी व सामान्य नागरिक यांचे संसार उध्वस्त झाले आहेत या पूरग्रस्त शेतकरी व नागरिक यांची तात्काळ पाहणी करून यांना जीवन आवश्यक वस्तूंची तात्काळ पुरवठा करण्यासाठी आमदार हेमंत पाटील यांनी दक्षिण मतदार संघातील सिडको येथे एका भागात खानपानासाठी अन्नधान्याची किट वाटप करण्यात आली पण सिडकोत सर्वात मोठा मागासव पूरग्रस्त भाग एनडी ४१ के-१ गोविंद कॉलनी येथील पूरग्रस्तांना कुठलीही मदत मिळालेली नाही या ठिकाणचे सर्वे तहसीलदार व तलाठी यांनी करून ही जीवन आवश्यक वस्तूंची मदत झाली नसल्याची येथील नागरिकांनी नाराजी व्यक्त केले आहे . वसंतराव नाईक कॉलेज समोरील भागातील एकूण लाभार्थ्यांपैकी काहींना जीवन आवश्यक धान्य किट मिळाल्याने तेथील मिळालेल्या कुटुंबीयांनी समाधानी व्यक्त केली. यावेळी आमदार हेमंत पाटील आणि आनंद बोंढारकर यांनी शिवसेनेच्या माध्यमातून पूरग्रस्तांना धान्य किट वाटप केली. ज्यामध्ये गहू, तांदूळ, मीठ, मिरची, तेल, डाळ अशा प्रकारच्या वस्तू असलेली कीड पूरग्रस्त कुटुंबीयांना त्यांच्या घरी जाऊन देण्यात आली. यावेळी आमदार हेमंत पाटील, दक्षिणचे आमदार आनंद बोंढारकर, तुलजेस यादव, विनय गिरडे यांच्यासह आदी शिवसैनिकांची उपस्थिती होती.

# वेंकटापूर येथे ८५ हजारांचा अवैध सागवान जप्त



**तभा वृतसेवा**
**इस्लापूर , दि. १ सप्टेबर-**

वनविभागाच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे आज सकाळी मौजे वेकटापूर येथे कारवाई करत अवैध सागवान लाकूड जप्त केले. आरोपी मिथुन धर्मा राठोड यांच्या घर व गोठ्याची तपासणी करण्यात आली असता, कट साईज सागी नग ३ (एकूण घनमीटर ३) व गोल माल नग १ (घनमीटर १) असा मिळून एकूण ४ घनमीटर सागवान लाकूड मिळून आले. सदर लाकडाची अंदाजित किंमत तब्बल ८५ हजार रुपये एवढी असल्याचे वन विभागाकडून सांगण्यात आले.

या कारवाईत इस्लापूर वनपरिक्षेत्राचे क्षेत्रीय वन अधिकारी (ठऋज) उमेश ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन धनंगे (वणपाल), श्रीराम सजन (वणपाल), शेख वसीम, शेख काझी, खरात (वनपाल), वनरक्षक कदमपले, रघुनाथ वनवे, कृष्णा घायाळ, गीता डोंगरे, फिरते पथक वनरक्षक श्री राठोड, झकडे यांच्यासह अन्य अधिनस्त कर्मचारी व वनमजूर उपस्थित होते.

सदर प्रकरणाची पुढील चौकशी सुरू असून आरोपीविरुद्ध संबंधित कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती वनविभागाकडून देण्यात आली.

# पूरपरिस्थितीमुळे अडकलेल्या ६६ नागरिकांना सुखरूपपणे काढले बाहेर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ सप्टेबर-**

पुरपस्थितीमुळे जिल्ह्यात सर्वत्र नागरिक पुराच्या पाण्यात अडकले होते. मदतीसाठी सर्व यंत्रणा धावपळ करीत असताना नांदेड जिल्ह्यातील होमगार्डची टीम सुद्धा तत्परतेने धाऊन गेली. त्यांनी ६९ नागरिकांना पुरातून बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी हलविले.

जिल्ह्यात पूरपरिस्थिती निर्माण झाल्यानंतर जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी तातडीने बचाव व मदत कार्य हाती घेतले. जिल्हा आपती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्याकडून होमगार्डची एक टिम धर्माबाद येथे उपविभागीय अधिकारी यांच्याकडे रवाना करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक कार्यालय यांना दिले.त्यानुसार अप्पर पोलीस अधीक्षक,नांदेड तथा होमगार्डचे जिल्हा समादेशक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली दोन अधिकारी व ९ जवान यांची टिम तत्परेने २९ रोजी धर्माबाद येथे रवाना झाली.

या मध्ये प्र. केंद्र नायक संतोष जैस्वाल यांच्या नेतृत्वाखाली वरिष्ठ पलटन नायक बशिरोद्दीन शेख, होमगार्ड जवान सय्यद इम्रान अली, शेख फेरोज शेख इमाम, माधव कोमटवार, बालाजी गवंडेल, मादास हिवरे, शिवाजी कोकरे, प्रभाकर कोमटवार, पृथ्वीराज कंधारे व हनुमान घोडके यांचा समावेश होता.

उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे तसेच तहसिलदार सुरेखा स्वामी यांच्या मार्गदर्शना खाली होमगार्ड टिम हुनगुंदा, संगम मनूर येथे पाठविण्यात आली. महसूल प्रशासनाकडे ओबीएम मशिनची फायबर बोट होती. सैन्य दलाची टिम देखील तेथे कार्यरत होती.पण बोट चालविणारे प्रशिक्षित कुशल तंत्रज्ञ नव्हते. राज्य आपती व्यवस्थान आणि होमगार्ड आपती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेतलेले होमगार्ड जवान लगेच सरसावले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन मोठी रिस्क घेत त्यांनी बोट सुरु करून हुनगंदा येथे पुरात अडकलेल्या ६३ नागरिकांना बाहेर काढून बोटीद्वारे सुरक्षित ठिकाणी हलविले.

संगम मनूर येथे महादेव मंदिराला पुराने वेढा घातला होता. त्यात मंदिरात महंत यांच्यासह सहा नागरिक आडकून पडले होतो. त्यांना देखील दिलासा देत पुरातून बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी हलविले.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,**
**‘ज्ञानतीर्थ’, विष्णुपुरी, नांदेड– ४६१ ६०६.**

**दीक्षांत समारंभ सूचना**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा **२८ वा दीक्षांत समारंभ शनिवार, दि.२० सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता विद्यापीठाचे मा. कुलपती महोदय यांच्या अध्यक्षतेखाली तसेच विद्यापीठाचे मा.कुलगुरु, मा.प्र-कुलगुरु व सर्व प्राधिकरण सदस्य** यांच्या उपस्थितीत विद्यापीठ प्रांगणात संपन्न होणार आहे.

सदरील दीक्षांत समारंभाची विद्यार्थ्यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती विद्यापीठाच्या **www.srtmun.ac.in** या संकेस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

**प्र. संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ.**

# आकांक्षा

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

**आपल्या कवितेने एख्रादा व्यक्ती आपले टेन्शन विसरून चार-पाच मिनिटे दिलखुलास हसतोय तर त्याहून वेगळी समाजसेवा कोणती? दिवसभर आपण वेगवेगळे मुखवटे घालून वावरतो. आयुष्यात काही क्षण असे यावेत की, आपण त्या मुखवट्यांचे ओझे उतरवून अगदी मनमोकळे हसावे. अशा वाटण्यावरचं उत्तर म्हणजे माहुरकर गुरुजींची कविता! सर्वसामान्य व्यक्तींप्रमाणे यांच्याही आयुष्यात असे अनेक चढउतार आलेत. या दाम्पत्याला आयुष्यात अत्यंत गंभीर अशा आर्थिक संकटाचा सामना करावा लागला. एक अत्यंत सुंदर आठवण ते सांगतात की, त्यांचा कार्यक्रम एका व्यसनमुक्ती केंद्रात झाला. कार्यक्रमानंतर एक तरुण त्यांच्याकडे आला आणि तो म्हणाला की, आता तो दारूच्या थेंबालाही शिवणार नाही. तो निघून गेल्यानंतर तेथील संचालकांनी त्यांना सांगितले की, या तरुणावर अनेक प्रकारचे उपाय करून झाले. आजपर्यंत एकाही उपायाला दाद दिली नाही. आज पहिल्यांदा हा स्वतःहून व्यसन सोडण्याविषयी बोलतोय. हा कवितेचा विजय होता.**

## कर्तृत्वाचे आकाश

निकिता गावंडे/९९७०६६३८१३

# हास्यपटलाचे राजे...





१० च्या दशकातील ब्लॅक अँड व्हाईट सिनेमात असावे तसे टिपिकल दृश्य! मध्यमवर्गीय घर, मोठी बहीण शिलाई मशीनवर काम करतेय, धाकटा तिथेच अभ्यास करतोय. त्याने कागदावर काहीतरी लिहिलं आणि ते बहिणीला दाखवलं. ती ससा कासवाची गोष्ट होती. तुम्ही म्हणाल यात काय विशेष? पण ती चक्क पद्यात लिहिलेली होती. ताई चकित होते. तो कागद एका मैत्रिणीला दाखवते. तिचा विश्वास बसत नाही. भावाच्या कर्तृत्वावर घेतलेल्या शंकेने बहीण अस्वस्थ ! आत्ताच्या आत्ता एखाद्या दुसऱ्या विषयावर असंच काहीतरी लिहून दाखव, असं फर्मान काढलं जातं. हा चिमुकला कोल्ह्याला द्राक्षे आंबट या विषयावर काहीतरी लिहून ते तिला दाखवतो. अचानक त्या मैत्रिणीच्या नजरेत त्या मुलाबद्दल आदर दिसतो. ही कविता लिहिणारे लहानगे हात हळूहळू अशा अनेक कविता खरडायला लागतात. नंतर 'ए आई मला पावसात जाऊ दे' या प्रसिद्ध गाण्याच्या चालीवर 'ए आई मला फोडणीचा भात करून दे' असं लिहून कॉलनीतील कार्यक्रमात चक्क वडिलांच्या बॉससमोर छान सादरीकरण करून त्यांची वाहवा मिळतो. अचानक असं काहीतरी केल्याने आपल्याला भाव मिळतो, हा साक्षात्कार त्या लहानग्याला होतो आणि यातूनच जन्माला येतो एक सुप्रसिद्ध हास्यकवी आणि विडंबनकार राजेश माहूरकर!

उपजत विनोदबुद्धी, असामान्य निरीक्षणशक्ती, अफाट वाचन, आयुष्याविषयीचा प्रगल्भ दृष्टिकोन, मानवी स्वभावाची अचूक जाण आणि ते कंगोरे नेमक्या शब्दांत पकडण्याची हातोटी ही या कवीची जमेची बाजू! नागपंचमीच्या शुभेच्छा हा कवी नागाचे चित्र, पंच आणि मी शब्दाचे इंग्रजी स्पेलिंग असा देतो. असलं भयंकर काहीतरी तुम्हाला कसं सुचतं? या प्रश्नावर हा कलंदर कवी म्हणतो,'तुम्हाला सेफ झोनमध्ये गाडी चालवायची असेल तर काही विषय जसे सरदारजी, बायको, राजकारण असे विषय घ्यावेत. एखादी विनोदी कविता चुकून एखाद्या धर्मातील वाईट रुढींवर प्रहार करणारी जरी असेल तरी, त्यातून कुणाच्या भावना कशा दुखावल्या जातील, काही नेम नाही. त्यामानाने बायकोवर कविता लिहिणे सोपे! अर्थात, तुमचे नाते तितके मजबूत असायला हवे किंवा तुम्हाला स्वयंपाक तरी जमायला हवा, असं डोळे मिचकावून बायकोकडे पहात ते म्हणतात.

***वटारून डोळे जवा, बघते माझी बाय***
***तवा मले तिच्यामंदी, दिसते दुर्गा माय...***

ही आपली सुप्रसिद्ध कविता जेव्हा ते अनेक कवी संमेलनांमधून सादर करतात तेव्हा सर्वाधिक कौतुक सौ. रंजनाताईंच्याच नजरेत दिसते. अशी ही हास्याच्या धाग्याने सात जन्म बांधली जोडी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात कार्यरत आहे. शिक्षक म्हणून कार्यरत असताना, अनेक मजेशीर अनुभव सांगतात. 'मी टेकाडीला असताना माझ्या गावात एक पंचायत समिती सदस्य होते. त्यांचे शिक्षण अंदाजे सातवा-आठवा वर्ग असेल. मी त्या गावातील गुर्जी अन् ते पंचायत समिती सदस्य! कुठे भाषण वगैरे असेल तर ते गुर्जीकडून लिहून घ्यायचे. एकदा त्यांना शाहू महाराज जयंतीनिमित्त भाषण द्यायचे होते. त्यांनी मला घरी बोलावलं आणि चहापाणी झाल्यानंतर आपल्या गरगरीत पोटावर हात फिरवत बोलले,'गुर्जी थे शाळेत भाषण द्याचं हाय शाहू महाराजांवर.' मी म्हटलं, ठीक आहे लिहून देतो.'बरं पयले हे सांगा का थे शाहू महाराज, आपल्या शिवाजी महाराजांचे वडील व्हय का जी?' मला हसावे की रडावे काहीच कळेना. मी म्हणालो,'बापू फक्त लिहून दिलेलं वाचजा. आपल्या मनाचं नको बोलजा.' तर असे अनेक गमतीशीर प्रसंग त्यांच्या शालेय कारकिर्दीत घडत गेले आणि त्यांच्यातला विनोदी कवी आकारास येत गेला. एकदा त्यांचा मुटकुरे नावाचा मित्र महानगरपालिकेच्या निवडणुकीला उभा राहिला. तेही त्या काळातील मोठ्या राष्ट?ीय पक्षाच्या सुप्रसिद्ध नगरसेवकाच्या विरोधात! अनेक मोठमोठ्या राष्ट?ीय पक्षांचे दिग्गज उमेदवार तेव्हा मैदानात होते. या मित्राच्या प्रचाराची धुरा आली माहुरकर गुरुजींच्या खांद्यावर! त्या निवडणुकीला एकूण चाळीस उमेदवार उभे होते. त्यांनी प्रचाराकरिता पंचलाईन तयार केली.

***चालीस के बनायेंगे मुरमुरे,***
***चुनकर लायेंगे मुटकुरे...***

ही पंचलाईन खूप गाजली. या घोषवाक्याने तो अपक्ष चक्क दुसऱ्या क्रमांकावर आणण्याची किमयाही केली. शिक्षक म्हणून काम करताना शंभर पैकी ९९ कार्यक्रमांच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी त्यांच्याकडेच असायची. शाळेव्यतिरिक्तही सातत्याने ते अनेक कवी संमेलनांचे बहारदार सूत्रसंचालन करीत असतात. त्यांच्या शैलीचे वैशिष्ट्य असे की, ते कधीच व्हॉट्सअपवरील फॉरवर्डेड जोक किंवा दुसऱ्या कवींच्या गाजलेल्या कविता सूत्रसंचालनात वापरत नाहीत. तर, अनेक प्रसंगनिष्ठ विनोद, एखाद्याच्या नावा-कामावरून, क्वचित पदावरून, कधी वागण्याबोलण्याच्या विशिष्ट लकबीवरून ते करतात. एक ठेवणीतला किस्सा ते सांगतात की, जवळपास १५ वर्षांपूर्वी जिल्हा परिषदेच्या एका कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तत्कालिन सीईओ इ.झेड.खोब्रागडे होते. पाहुण्यांची ओळख करून देताना आपले हास्यकवी म्हणाले की, माझ्या मते ते ए टू झेड खोब्रागडे आहे. विनोदाची ही विशिष्ट शैली त्यांना लोकप्रिय करते. अशाच एका कवी संमेलनाच्या कार्यक्रमात कवी राहुल गवस यांची ओळख करून देताना ते म्हणाले की, मित्रमंडळींच्या गराड्यात मला एक हिरा गवसला... आता मी बोलवतो आहे राहुल गवसला!

अनेक सामाजिक विषयांची जाण असणारा आणि त्यावर अतिशय प्रगल्भ लिखाण करणारा हा कवी सध्याच्या काळात असलेल्या साहित्य संमेलनातील रिकाम्या खुर्च्यांच्या अवस्थेकडे पाहून अस्वस्थ होतो. सध्या व्हॉट्सअपमुळे कवींचे वारेमाप पीक आले आहे. पण, दर्जाच्या बाबतीत मात्र मोठे प्रश्नचिन्ह आहे. कुठलीही तयारी नसताना कवीने कविता सादर करावी आणि प्रेक्षकांकडून मात्र टाळ्यांची अपेक्षा करावी हा मायबाप प्रेक्षकांवर होणारा अन्याय आहे, असे ते म्हणतात. अनेक कवी संमेलनातील सद्य:स्थितीवर भाष्य करणारी त्यांची एक कविता बोलकी आहे.

***चाळीस कवी जमा, आयकाले चार नाय***
***तवा मले वाटे, आपण पळून जावं काय?***
***लोक मले सांगे भाऊ, कवी नको होऊ***
***चावलं तुले कुत्रं, तू कुत्र्याला नको चावू...***

हास्यकविता करमणुकीपुरत्या मर्यादित राहतात का? या माझ्या प्रश्नावर उत्तर देताना हा कवी म्हणतो की, मुळात असं वाटणं हेच हास्यकवी व त्याच्या कवितेवर होणारा अन्याय आहे. मुळातच हास्यकविता ही करमणुकी पुरती मर्यादित नसतेच. आज सगळीकडे सहनशक्तीचा अभाव आहे. सार्वजनिक जीवनात तर तो आहेच आहे. समाजात एखादी चुकीची गोष्ट होताना दिसली तरी आपण एकदम विरोध करू शकत नाही. डायरेक्ट बोलणे हे बरेचदा घातक ठरते. त्यापेक्षा जर विनोदाचा आधार घेऊन एखाद्या गोष्टीवर टीका केली तर ती तितकी बोचत नाही पण, आवश्यक तो परिणाम मात्र नक्कीच करून जाते. ते समाजात बोकाळलेल्या भ्रष्टाचाराचे उदाहरण देतात. स्वतः शिक्षण क्षेत्रात कार्यरत असूनही या क्षेत्रातील भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवण्याची हिंमत या हास्यकवीने दाखवली. 'मास्तरचा खरा धंदा' ही त्यांची एक गाजलेली कविता! ते म्हणतात,

***माझा खरा काम धंदा, शब्द शेती फुलविणे***
***सोबतीला जोडधंदा, बिनपाणी भादरणे***

***आला दुकानात नेता, कधी मेला कधी जिता***
***त्याच्या घोटाळ्याचा पत्ता, शोधुनिया दाखवणे...***

एखाद्या गंभीर सामाजिक विषयांवर कविता लिहावी असं तुम्हाला वाटत नाही का? या प्रश्नावर उत्तर देताना मिश्किल हसून हा कवी म्हणतो, एकदा का हास्यकवीचा स्टॅम्प लागला की, मग हा माणूस मंचावर उभा राहिला तर पाच मिनिटे आपल्याला दिलखुलास हसवणार, या अपेक्षेने प्रेक्षक माझ्याकडे बघतात. सध्याच्या घडीला जगात इतके टेन्शन्स आहेत की, माणूस अक्षरशः पिडलेला आहे. तेव्हा जर आपल्या कवितेने एखादा व्यक्ती आपले टेन्शन विसरून चार-पाच मिनिटे दिलखुलास हसतोय तर त्याहून वेगळी समाजसेवा कोणती? दिवसभर आपण वेगवेगळे मुखवटे घालून वावरतो. आयुष्यात काही क्षण असे यावेत की, आपण त्या मुखवट्यांचे ओझे उतरवून अगदी मनमोकळे हसावे. अशा वाटण्यावरचं उत्तर म्हणजे माहुरकर गुरुजींची कविता! सर्वसामान्य व्यक्तींप्रमाणे यांच्याही आयुष्यात असे अनेक चढउतार आलेत. या दाम्पत्याला आयुष्यात अत्यंत गंभीर अशा आर्थिक संकटाचा सामना करावा लागला. एक अत्यंत सुंदर आठवण ते सांगतात की, त्यांचा कार्यक्रम एका व्यसनमुक्ती केंद्रात झाला. कार्यक्रमानंतर एक तरुण त्यांच्याकडे आला आणि तो म्हणाला की, आता तो दारूच्या थेंबालाही शिवणार नाही. तो निघून गेल्यानंतर तेथील संचालकांनी त्यांना सांगितले की, या तरुणावर अनेक प्रकारचे उपाय करून झाले. आजपर्यंत एकाही उपायाला दाद दिली नाही. आज पहिल्यांदा हा स्वतःहून व्यसन सोडण्याविषयी बोलतोय. हा कवितेचा विजय होता. अनेक धार्मिक, सामाजिक साहित्य संघटना जसे शिक्षकांसाठी कार्य करणारी महाराष्ट? राज्य शिक्षक सेना, साहित्यिकांसाठी राबणारी साहित्य कला सेवा मंडळ, अक्षरक्रांती प्रतिष्ठान, धार्मिक आयोजनासाठी जगदंबा सेवा समिती किंवा विद्यार्थी आणि समाजहितासाठी झटणारी वेध प्रतिष्ठान असो अनेक ठिकाणी त्यांचा वावर दिसून येतो

**विद्रोही कवीचं काव्य, तिखट रायते भारी,**
**सूर्या ले तो म्हणते चटणी, चंद्राले भाकरी...**

किंवा

***कार्यकर्ता असताना फाकावेत चणे,***
***वार्डाचा अध्यक्ष होता खावे शेंगदाणे...***
***आमदार झाल्यावर नोटाच पाहणे,***
***घरी मंत्रीपद गावे करोडोंचे गाणे...***

या त्यांच्या ओळी बरंच काही सुचवून जातात. संस्कृत काव्यात हास्योक्ती हा एक प्रकार आहे. यात हास्याच्या माध्यमातून समाजातील विसंगती दर्शविते. खरंच हास्यकवीला पाहिजे तितके गंभीरपणे न घेणे हे ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. निरक्षीरविवेक बुद्धीने कवीने ही भूमिका पार पाडायला हवी आणि या कसोटीवर हा कवी शंभर टक्के उतरलेला आहे, यात काही शंका नाही. त्यांच्या हसऱ्या साहित्यसेवेस शतशः नमन!

---

# शाश्वत विकास आणि कुटुंब संस्था!



**मानसिक कौशल्यांमध्ये ताण-तणाव नियोजन कौशल्य, मानासिक तयारी करणे, मानसिक तत्वांचा, तंत्राचा उपयोग करून एख्रादी गोष्ट शिकवणे आणि शिकणे म्हणजे व्यक्तीचे मानसिक उन्नयन करणे व यानुसार शारीरिक वाढ होतच राहणार. पण, विकासही तेवढाच महत्त्वाचा असतो. मानस शारीरिक योग प्रशिक्षण, शाश्वत विकासाची बीजे पेरणे गरजेचे आहे. यामधून आपल्याला पिढीमध्ये होणारा बदल अपेक्षित आहे. याच्या उत्कृष्ट नियोजनाने राष्ट्रीय आरोग्य निरामय तर होईलच पण, कौटुंबिक स्वास्थ्यही लाभेल, यात शंकाच नाही. आत्मिक विकासही घडविण्यात प्रत्येक पिढीचा हातभार लागणार.**

डॉ. अचला तांबोळी/९८९०६१७५३९

शाश्वतता हा जीवनाचा आधार होऊ शकतो यावर प्रत्येकाचा विश्वास असला पाहिजे. तात्पुरते प्राप्त झालेले यश अहंकार निर्माण करते. प्राप्त झालेल्या ज्ञानाचा दुरुपयोगही होऊ शकतो. यासाठी औपचारिक शिक्षणामध्ये सध्या तरी कोणतीही यंत्रणा कार्यरत झालेली वा अस्तित्वात आलेली नाही. यांत्रिकतेचा व विकासाचा वेग मात्र तीव्र गतीने वाढतोच आहे. त्यामुळे दोन पिढ्यांतील अंतर कमी होऊन एकंदरीत नम्रता, त्यागी वृत्ती, तडजोड अथवा जुळवून घेण्याच्या प्रवृत्तीचा ऱ्हास होताना दिसतो. मुलांमधील फाजील आत्मविश्वास, मोठ्यांशी अनाठायी वाद, नकारात्मक प्रवृत्तींचा विकास, स्वतःबद्दलच्या अवास्तव कल्पना, स्वप्नरंजन, भविष्याची चिंता इत्यादींनी नवीन पिढीचा ताबा घेतला आहे. अर्थातच अशा नकारात्मकतेची पाळेमुळे कुटुंब संस्थेत घट्ट होतानाही प्रत्यक्षात अनुभवास येतात. कुटुंबातील कलह, नात्यांमधील आपलेपणाचा ऱ्हास, आपापसात भौतिक गोष्टींच्या प्राप्तीसाठी जीवघेणी स्पर्धा इत्यादी कारणांनी विवाह संस्थेचा, कुटुंब संस्थेचा, समाज संस्थेचा देखील टिकाऊपणा पणास लागलेला आहे. कुटुंबसंस्थेचे स्वास्थ्य वेठीस धरले जात आहे. त्यामुळे 'भय इथले संपत नाही' अशा प्रकारची स्थिती आपण अनुभवतोय. एका पिढीतून दुसऱ्या पिढीत नेहमीच शाश्वत गोष्टी झिरपतात अर्थात, नवीन पिढी अशा संक्रमणांद्वारा जीन्सच्या रूपांमध्ये सुप्त शक्तीची साठवण करतात. म्हणूनच आपले संस्कार व अध्यात्मिकता यामधून पोषित होऊन टिकते व मानवी जीवन सुसह्य, सहज, सात्विक आणि समरस बनविते. आपली मानसिकता जपण्यासाठी सुरक्षा यंत्रणांचा वापर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे प्रत्येक व्यक्ती करते. पण अनियंत्रित वापर होऊ नये, यासाठी काळजीही घेणे आवश्यक आहे. ही यंत्रणा कोणती आणि त्याचा वापर कसा करायचा, हे आपण पाहू !

## शाश्वत विकासाची अष्टसूत्री यंत्रणा

**१. आकर्षकता** : आजचे युग स्पर्धेचे तसेच जाहिरातीचे देखील आहे. अर्थात यामधील रटाळपणा दूर झाल्यास रोजच्या जीवनात चैतन्य येते. तीच गोष्ट नाविन्याने व जिज्ञासू वृत्तीने पोषित करता येते. अर्थात यासाठी कुटुंब, समाज आणि राष्ट? जागृत असावे लागते. ही जागरूकता आकर्षणाच्या तत्त्वांनी विकसित करता येते. या तत्त्वांचा उपयोग औपचारिक शिक्षण पद्धतीद्वारा विकसित होऊ शकतो. शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमामध्ये याचा प्रात्यक्षिक विषयासाठी उपयोग करून घेणे अत्यंत फायदेशीर व स्वागतार्ह आहे.

**२. नियोजन** : शाश्वत विकासामध्ये तांत्रिक, मानसिक, शारीरिक, कौटुंबिक, सामाजिक नियोजन करावे लागते. त्यामध्ये कारक कौशल्य (वाहन चालविणे, वयानुसार कलाकुसर शिकणे) शिकण्याची संधी! मानसिक कौशल्यांमध्ये ताण-तणाव नियोजन कौशल्य, मानासिक तयारी करणे, मानसिक तत्वांचा, तंत्राचा उपयोग करून एखादी गोष्ट शिकवणे आणि शिकणे म्हणजे व्यक्तीचे मानसिक उन्नयन करणे व यानुसार शारीरिक वाढ होतच राहणार. पण, विकासही तेवढाच महत्त्वाचा असतो. मानस शारीरिक योग प्रशिक्षण, शाश्वत विकासाची बीजे पेरणे गरजेचे आहे. यामधून आपल्याला पिढीमध्ये होणारा बदल अपेक्षित आहे. याच्या उत्कृष्ट नियोजनाने राष्ट्रीय आरोग्य निरामय तर होईलच पण, कौटुंबिक स्वास्थ्यही लाभेल, यात शंकाच नाही. आत्मिक विकासही घडविण्यात प्रत्येक पिढीचा हातभार लागणार.

**अवांतर वाचन** : 'वाचाल तर वाचाल! हे संपूर्ण सत्य आहे. पण, आज वाचण्याची प्रक्रिया मंदावली नाही तर थंडावली आहे. जनतेमध्ये त्याविषयी शास्त्रीय जागृती निर्माण करावी लागेल. तसे नियोजनही लागेल. वाचण्याने चेहऱ्यावरील प्रत्येक अवयव कार्यरत होतो आणि मेंदूही जागरूक असतो. अर्थात, त्यामुळे सतर्कता वाढते, नवीन विचार निर्माण करण्याची सहजता निर्माण होते. मुख्य म्हणजे मेहनत करण्याची वृत्ती वाढते, चिकाटी वाढते, आनंदी वृत्ती विकसित होते. विशेषतः लहान मुलांच्या मेंदूच्या विकासासाठी हे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे उतारवयात देखील वाचनाची तेवढीच आवश्यकता आहे. उतार वयात अल्झायमर्स, विस्मरण, अर्धांग वायूसारखे मेंदूचे आजार हात जोडून उभेच असतात. यासाठी 'वाचन संस्कृतीची चळवळ' अमलात आणणं, हाच एक उपाय उपयुक्त ठरेल. टीव्ही व मोबाईलवरील दर्जेदार गोष्टी बघण्यावर भर देणे, शालेय शिक्षणातूनच तांत्रिक गोष्टींच्या दुष्परिणामांची चर्चा घडविणं अपरिहार्य आहे.

**अभ्यास** : अभ्यास ही संकल्पना समृद्ध करण्याची गरज आहे. यामध्ये शारीरिक, वाचिक आणि मानसिक घटकांचा त्रिकोण आहे, असे समजू या! अभ्यास न केल्यास केवळ व्यायाम, खेळ, फिरणे, चौरस आहार इत्यादीने शरीर स्वास्थ्य टिकवलं जाते. पण, वाचिक प्रगतीसाठी अवांतर वाचन, पाठांतर इत्यादीने भाषण संस्कृतीचा विकास होतो. मानसिक म्हणजे चिंतन-मनन, निधिध्यासनाने एकाग्रता वाढते. यामध्ये शिकावयाच्या/शिकण्याच्या गोष्टींशी माणूस संलग्न राहतो आणि त्यामधून आत्मीयता निर्माण झाल्याने शिकण्याची परिपूर्ण प्रक्रिया घडवून येते.

**अक्षयपात्र** : शारीरिक, वाचिक, मानसिक अंगांचा विचार करून अभ्यास करण्याची मुलांची बौद्धिक कुवत वाढविते. पण, त्याचबरोबर आपला मेंदू हे एक अक्षय्य पात्र आहे, याचीही जाणीव होते. डाव्या व उजव्या अशा दोन्ही मेंदूचा विकास होतो.

**अपवित्रतेचा नाश** : विचार शुद्ध होणे हे व्यक्तिच्या मानसिक पवित्र्याचे लक्षण आहे. त्यासाठी, प्रयत्नपूर्वक विचार शुद्धीकरणाची प्रक्रिया करावी लागते. त्यासाठी काही पथ्येदेखील पाळावी लागतात. जसे कोणाविरुद्ध किंवा पाठीमागे काहीही बोलणे, व्यक्तीचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अपमान करणे, चेष्टा करणे, त्याच्या अस्मितेला धक्का देणे या सर्व गोष्टींचा नायनाट केवळ चांगल्या आणि सकारात्मक विचारांनीच होतो. मानसिक शुद्धीकरणाची प्रक्रिया ही निरंतर चालणारी गोष्ट आहे. त्याकरीता व वागण्यातील असंबद्धता, असमंजस वृत्ती, आततायीपणा, अतिरेक इत्यादी गोष्टींना दूरच ठेवावे लागते.

**सुदृढ पालकत्त्वाची निर्मिती** : निरोगी पालकत्वावर संपूर्ण पिढी व पुढील पिढींचे पोषण होत असते. पर्यायाने, समाज आणि राष्ट?ाची नवनिर्मिती करण्याचे सामर्थ्य सुजाण पालकत्वामध्ये असते.

**अध्यात्मिकतेचा विकास** : जो समाज (व्यापक अर्थाने), मूल्याधिष्ठित तत्त्वांचा स्वीकार करून, त्याप्रमाणे मूल्याधिष्ठित राष्ट? निर्माण करण्याकडे गुंतला असतो तो समाज खऱ्या अर्थाने अध्यात्मिकतेचा विकास करू शकेल. शाश्वत विचारांची पायाभरणी ही अध्यात्मिकतेच्या विकासावरच अवलंबून असते. अध्यात्म म्हणजे आत्म्याचा विकासावर भर देणे आणि सत्याची स्थापना करणे. समाजाची दिशा जर अशा विकसित अवस्थेला पोहोचण्यासाठी सज्ज झाली असेल तरच आपण या अष्टसूत्रीचा पूर्णपणे विकास करू.

---

## भयकथा

श्रेया सरनाईक/८६००२७७८८८

**भाग -४**

नेक प्लँचेट बोर्डस् त्यांनी सुतारांकडून तयार करवून घेतले होते. विमानाच्या शेपटीला शेवटी असतो तसा हृदयाकृती आकार या बोर्डस्ना असायचा. महोगनी, रेडवुड वगैरे झाडांचं लाकूड त्यासाठी वापरलं जाई. मायकेल व त्याचे अनेक साथीदार मध्यरात्री ११ ते ३ या काळात बरेच प्रयोग करत कारण, यावेळी अतिंद्रिय शक्ती सर्वाधिक कार्यरत असतात, असं त्यांना अभ्यासांती वाटायचे. या काळात आलेले अनेक अनुभव लिहून ठेवायचे, अशा सूचना त्याने सभासदांना दिलेल्या होत्या. ज्यांना प्लँचेट बोर्ड वापरता येत असे त्यांना मिस्टिक हँड असा शब्द वापरला जाई. मायकेल हेड मिस्टिक हँड होता. हे वर्ष त्याच्यासाठी महत्वाचे होते.

कडाक्याची थंडी प्रचंड वाढल्याने शाळेला २-३ दिवस सुट्टी जाहीर झाली होती. त्यात वीज गेली. त्यामुळे रुथला अधिकच कंटाळा येऊ लागला. ते १९८० साल सुरू होते. वीज वारंवार जात असल्याने आवडत्या मालिका बघता येत नव्हत्या. आजही तसेच झाले. संध्याकाळी रुथला अगदी असह्य झालं तेव्हा ती व्हरांड्यात खुर्ची टाकून मायकेल त्याच्या रूममधून कधी बाहेर येतो, याची ती वाट बघत बसली. मायकेल प्लांचेट रूममधून बाहेर आला खरा! पण तो अत्यंत थकलेला दिसत होता. त्याच्या चेहऱ्यावर निराशा स्पष्ट दिसत होती. आज त्याचा दिवस खूप व्यस्त गेला. सकाळी कसलीशी दुर्मिळ पुस्तके वाचत त्याच्या नोट्स काढत बसला. दुपारी त्याने देह सोडून गेलेल्या आत्म्याची एनर्जी कशी ट्रान्सफर होते. याविषयी काही रेकॉर्डिंग त्याने टेपरेकॉर्डरवर केले. मनाची शक्ती कशी वाढवावी, इव्हिल एनर्जीवर कसा ताबा मिळवावा, मानवी डोळ्यांच्या पटलावर जो पडदा असतो त्यातील प्रतिमांचा अभ्यास करून त्यात मानवी प्रतिमांच्या इच्छेचे छायाचित्र उमटू शकते, असे काहीतरी क्रांतिकारक विधान त्यात असणार होते.

संध्याकाळी त्याच्याकडे मिसेस जेनी स्मिथ आली. आज त्याने फक्त ही एकच अपॉइंटमेंट घ्यायची ठरवली होती. जेनीचा नवरा परदेशात एका पोलाद उद्योगाशी संबंधित होता. हलक्या वजनाच्या स्टीलच्या वस्तू बनवण्याचा त्याचा मोठा कारखाना होता. स्थानिक गृहयुद्धात झालेल्या संघर्षामुळे तो कारखाना गुंडाळून फक्त रेल्वे रूळ तयार करण्याचे कंत्राटी पद्धतीने काम करून भरपूर नफा घ्यावा, अशी त्याची योजना होती. रेल्वेचे वाढते महत्त्व त्याच्या लक्षात आले होते.

पण, त्याच्या भागीदाराने काही कागदपत्रांवर त्याच्या नकळत सह्या घेतल्या. त्याला फसवण्याचा प्रयत्न केला. हे सगळे पुरावे जेनीच्या नवऱ्याला सापडले. पोलिस स्टेशनमध्ये तक्रार करण्यापूर्वी एक संधी पार्टनरला द्यावी, असे त्याला वाटले. याच विषयावर पार्टनरशी बोलणी करण्यासाठी, खरंतर भांडण करण्यासाठी तो आयर्लंड येथे गेला. पण, त्याचा तिथे अचानक मृत्यू झाल्याची बातमी जेनीला समजली. नवऱ्याचा नैसर्गिक मृत्यू झाल्याचा वैद्यकिय अहवाल होता. पण, त्याला घातपात झाला आहे अशी तिला खात्री होती.

अत्यंत आशेने ती मायकेलकडे आली होती. पतीचे अकाली जाणे तिच्यासाठी अतीव दुःखदायी होते. आता तिचा पती परत येऊ शकत नव्हता. पण, त्याच्याशी संपर्क साधता येईल, ही मायकेलकडून मिळालेली ग्वाही त्या दुःखातही तिला दिलासा देणारी होती. मायकेलने तिला आश्वस्त केले. दुपारी तीन वाजता प्लँचेट बोर्ड मांडल्या गेला. मेणबत्त्या पेटवल्या गेल्या. तिचा नवरा मिस्टर स्मिथ याचा फोटो समोर ठेवलेला होता. इज देअर एनी स्पिरीट प्रेझेंट हिअर...सुपरनॅचरल पावर्स प्लीज आम्हाला मदत करा! मायकेल बोलम होता.

मध्यभागी एका पेन्सिलवर दुसरी आडवी ठेवलेली होती. चारी बाजूंना मेणबत्त्या लावल्या होत्या. अनेकदा ऑटो रायटींगच्या माध्यमातून आत्मे संपर्क साधण्यास इच्छुक असतात, हे मायकेलला माहित होते. तिथे कागद ठेवलेला होता. अनेकदा आवाहन करूनही स्त्रीच्या पतीचा आत्मा आलाच नाही. असं फार क्वचितच घडत असे. दोघांनी एकमेकांकडे अत्यंत निराशेने पाहिले. दोघंही थोडा वेळ शांत बसून राहिले. अचानक त्या खोलीत सूक्ष्म कंपन ऊर्जा जाणवू लागली.

# रिंगा रिंगा रोजेस




पेन, कागद थरथरू लागला. मायकेलने पेन हातात घेतला. जेनी श्वास रोखून पुढे काय घडणार हे पाहू लागली. तिचा चेहरा या कल्पनेने उजळला होता की, तिचा प्रिय पती तिच्याशी बोलण्यासाठी उत्सुक आहे.

मायकेलच्या हाताचा ताबा कोणीतरी घेतल्याप्रमाणे पेनने कोणीतरी कागदावर लिहू लागले. अचानक त्यावर अक्षरे लिहिल्या गेली, माय बेबी!

माय बेबी? याचा काय अर्थ आहे? जेनी बुचकळ्यात पडली. मायकेल म्हणाला,'तुमचे पती बहुतेक तुमच्या बाळाविषयी विचारत आहेत. 'कसे शक्य आहे?मला कोणतेही बाळ नाही. कधी झाले नाही अन् भविष्यात होण्याची शक्यताही नाही. गर्भाशयाचा कॅन्सर असल्याने गर्भपिशवीच काही वर्षांपूर्वी काढून टाकली आहे. मी कधीच आई होऊ शकत नाही, हे त्याला पण माहित होते. त्याची माझ्याविषयी कधीच तक्रार नव्हती. आम्ही एकमेकांवर जीवापाड प्रेम करायचो. आम्ही एकमेकांसोबत आनंदी होतो. तो अचानक गेला अन् मी जणू शून्य झाले आहे. नाईलाज म्हणून श्वास घेते आहे इतकेच!'

दहा मिनिटे गेली. पुन्हा कागदावर माय बेबी एवढंच लिहिले गेले. काय गफलत होते आहे ते मायकेलच्या लक्षात आले. तो जेनीला शांतपणे म्हणाला, सॉरी! तुमच्या पतीच्या ऐवजी कोणत्यातरी दुसऱ्याच व्यक्तीचा आत्मा इथे आला आहे. वरवर शांत वाटणारा मायकेल आतून हादरला होता. एक थंड लहर खोलीभर पसरली.

**(जेनी तिच्या पतीच्या आत्म्याशी संपर्क करू शकते का? नव्या प्लांचेट बोर्डाचा रूथशी काय संबंध? वादळी हवेत कोणत्या विलक्षण गोष्टी दोघांच्या आयुष्यात घडतात? वाचू या पुढील भागात!)**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# क्रुर असलम कुरेशीने साथिदाराच्या मदतीने गोवंशाची कत्तल करत सोशल मिडीयावर व्हिडीओ केला व्हायरल !!

## आरोपींवर मकोका कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करावा - माजी आ. कैलाश गोरंटयाल

तभा वृत्तसेवा
जालना / सुरेश कवडे

जालना शहरात मागील दोन दिवसांपासून एक व्हायरल व्हिडीओ पहायला मिळत आहे. त्यात असलम कुरेशी हा आपल्या साथिदाराच्या मदतीने हिंदु धार्माला शिव्या देत असताना गोवंशाची क्रुरपणाने कत्तल करत आसतानाचा व्हिडीओ काढुण शोषल मिडीयावर व्हायरल केला. गोवंशांची सामुहीक अशी कत्तल करत आसताना गोवंश हत्या करत आसताना व्हिडीओ जालन्यातील हिंदु समाज बांधवांच्या भावणा दुखावणारा होता. तसेच देशात सरकारने गोवंश हत्या बंदी कायदा लागु केला असला तरी जालन्यातील काही ठरावीक भागांत राजरोजपणे गोवंश हत्या आजही खुलेआम होत आहे. त्यातच काही जणांनी जालना शहरात गोवंशाच्या मासांच्या विक्रीचे स्टॉलही लावले आहेत तर जालन्यात रात्री उशिरा रोजरासपणे गेवंशाची चोरी करत तस्करी केली जात आहे. हे सर्वप्रकार स्थानिक पातळीवर जालना पोलिसांना माहिती आहे. मात्र पोलिसांकडुन कारवाई होत नसल्याने कारवाई करायची कुणी असा सवाल सामान्यमाणसाला पडतो. प्रकरणी आणि गायींच्या तस्करीबाबत एक मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर येत आहे. राज्यात मागील काही दिवसांपासून गोवंश हत्या आणि गायींच्या तस्करी जालना शहरात मोठ्या प्रमाणात होत आहेत. गोवंश हत्या करण्यारा असलम व त्याचे साथिदार यांच्यावर शासनाने कडक कारवाई केली पाहिजे. अशी मागणी जालना शहरवासियांकडुण जोर धरू लागली आहे. तसेच जालन्यातील आजी माजी आमदार खोतकर, गोरंटयाल यांनीही केली आहे. तसेच जालन्यातील गोवेश हत्येचा व्हिडीओ दोन समाजात तेढ निर्माण करणारा आहे. समाज बांधवांनी शांततेत रहावे संबंधीत घटनेतील अरोपींना जालना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्या विरोधात सदर बाजार पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



### मकोका कायद्याअंतर्गत कारवाई करा - माजी आ. गोरंटयाल

जालन्याचे माजी आमदार कैलाश गोरंट्याल यांनी गोवंश हत्या या घटनेचा तिर्व निषेध व्यक्त केला आहे. संबंधीत गोवेश कत्तलीची घटना गंभीर असून, यावर पोलिस प्रशासनाने कठोर कारवाई करावी. गुन्हेगारांवर मकोका कायद्या अंतर्गत करवाई करावी अशी अग्रही मागणी केली .गोवंश हत्या संदर्भात सांगायचे म्हणजे जालन्यात रोजच ठरावीक ठिकाणी आजही गोवेश हत्या केली जाते त्या हत्या पोलिसांनी थांबवाव्यात व त्या अरोपितांना महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्याअंतर्गत (मकोका) कडक कारवाई करावी.



## संक्षिप्त

### जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून जिल्हाधिकारी कार्यालयात ध्यानसाधनेला सुरुवात



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जागतिक आरोग्य संघटनेने मानसिक स्वास्थासाठी ध्यानधारणा प्रभावी ठरते हे मान्य केलेले आहे. ध्यानसाधना केल्याने मन शांत होते, वैचारिक पातळीमध्ये वाढ होते व शारिरीक आरोग्य सुधारते, तसेच कामकाजातील कार्यक्षमता सुधारते. त्यामुळे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी आता नियमित ध्यानसाधना हा कार्यक्रम आयोजित करण्याच्या निर्णय घेतला आहे. तरी सोमवार दि.१ सप्टेंबर २०२५ रोजी तहसीलदार तथा प्रशिक्षक प्रणाली तायडे यांच्या मार्गदर्शनात जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनामध्ये सकाळी १० ते १०.२० या वेळेत ध्यान साधना कार्यक्रम पार पडला.

सद्यस्थितीत दैनंदिन जीवनातील व्यस्तता व तणावपूर्ण जीवनशैली हा प्रत्येकाच्या आयुष्याचा एक भाग झालेला आहे. ज्याचा नकळतपणे आपल्या आरोग्य व मानसिकतेवर विपरित परिणाम होत आहे. आरोग्य हीच आपली खरी संपत्ती हा दृष्टीकोन नजरेसमोर ठेवून सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचे हित साधण्यासाठी जीवनमानात ध्यान साधनेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. तरी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनानूसार अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी आरोग्यदायी कर्मचारी-सक्षम प्रशासन-समृध्द जिल्हा या संकल्पनेला मुर्त स्वरुप देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात सोमवार दि.१ सप्टेंबर २०२५ पासुन दररोज सकाळी १० ते १०.२० या वेळेत ध्यान साधनेचे आयोजन करण्यात येत आहे. कार्यालयीन कामकाजाची गती वाढविण्यासाठी ध्यानसाधना हा सर्वात सोपा, वैज्ञानिकदृष्ट्या सिध्द आणि सर्वांना उपयुक्त ठरणारा उपाय आहे. असे यावेळी सांगितले.

### शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांच्या हस्ते नवयुवक मानाच्या गणपतीची आरती



तभा वृत्तसेवा
जालना /प्रतिनिधी

शहरातील नवयुवक गणेश मानाचा गणपती यांच्या गाभाऱ्यात आज भक्तिभावाचा अनोखा सोहळा अनुभवायला मिळाला. शिवसेना शहरप्रमुख व नगरसेवक विष्णू पाचफुले यांनी सहपत्नींसह श्रींची महाआरती करून गणेशभक्तांच्या आनंदात भर घातली. आरतीच्या वेळी वातावरणात ढोल-ताशांचा गजर, शंखनाद आणि गणपती बाप्पा मोरया चा निनाद घुमत होता. सर्वत्र भक्तिभावाची अनुभूती येत होती. या प्रसंगी गणेश मंडळाचे अध्यक्ष राजू अबड, कोषाध्यक्ष प्रकाश गोरंट्याल, उपाध्यक्ष जयेश शहा , अल्केश अग्रवाल, जितेंद्र तालुका, रमेश दलाल, आनंद श्रीनाही, ओंकार भुतिया, राहुल तालुका, अनुराग अग्रवाल, सुरंग पाटील, जीत अबड, दीप अबड आदी मान्यवर तसेच असंख्य गणेशभक्त उपस्थित होते. गणपतीच्या चरणी सर्वांनी आरोग्य, सुख-समृद्धी आणि ऐक्याची मनोकामना केली.

## गणेश मंडळांनी समाज उपयोगी उपक्रम राबवावेत - पो. नि. भागवत

### तीन गणेश मंडळांना मिळणार प्रथम पारितोषिक

तभा वृत्तसेवा
परतूर / प्रतिनिधी

परतूर शहरातील सर्व गणेश मंडळांसाठी यावर्षी पोलीस प्रशासनाच्या वतीने उत्कृष्ट गणेश मंडळ स्पर्धा २०२५ आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत प्रथम तीन गणेश मंडळांची निवड करून त्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती परतूरचे पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांनी दिली. या स्पर्धेसाठी स्वतंत्र समिती गठीत करण्यात आली असून त्यामध्ये निवृत्त शिक्षक रमाकांत बरीदे, प्रा. एकनाथ कदम, डॉ. भगवान दिरगे, लक्ष्मीकांत माने व अजय देसाई यांचा समावेश आहे. स्पर्धेच्या नियमावलीनुसार मंडळांनी स्थळाची स्वच्छता राखणे, पोलीस परवानगी घेणे व समाजोपयोगी उपक्रम राबवणे आवश्यक आहे. रक्तदान शिबिरे, स्वच्छता अभियान, बेटी बचाव - बेटी पढाव यांसारखे उपक्रम, देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम, एकता रॅली यांना प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच स्वातंत्र्यसैनिकांचा सत्कार, अंधश्रद्धा निर्मूलन जनजागृती, चित्रकला, वक्तृत्व, निबंध व क्रीडा स्पर्धा, महिलांसाठी रांगोळी स्पर्धा तसेच लहान मुलांसाठी आनंद नागरी असे उपक्रम राबवणे अपेक्षित आहे. या उपक्रमांचा अहवाल समितीकडे सादर करणे बंधनकारक आहे. ही स्पर्धा ही फक्त मंडळांमधील स्पर्धा नसून समाजहितासाठीचा एक उपक्रम आहे. प्रत्येक मंडळाने समाजोपयोगी कार्यात आघाडी घेतली तर गणेशोत्सवाचे खरे औचित्य साधले जाईल. आम्ही समिती सदस्य म्हणून पारदर्शक पद्धतीने मूल्यमापन करू आणि समाजासाठी कार्य करणाऱ्या मंडळांना प्राधान्य देऊ.
प्रा. एकनाथ कदम, समिती सदस्य



गणेशोत्सव हा सामाजिक एकतेचा आणि सार्वजनिक सहभागाचा उत्सव आहे. फक्त मनोरंजनापुरता न ठेवता मंडळांनी समाजोपयोगी उपक्रम राबवावेत. तरुणाईला सकारात्मक दिशा देणारे उपक्रम, स्वच्छता व जनजागृती यांना प्राधान्य दिल्यास समाजात आदर्श निर्माण होईल. पोलीस प्रशासनाकडून सर्व गणेश मंडळांना आवश्यक ते सहकार्य मिळेल.
- सुदाम भागवत, पोलीस निरीक्षक, परतूर

## म्हणोयात्री मनमंदिर धाकलगाव येथे मनोरुग्ण महिलेने दिला गोडस बाळाला जन्म

तभा वृत्तसेवा
अंबड प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील धाकलगाव येथील सात महिन्यापूर्वी म्हणोयात्री महिला रस्त्याच्या कडेला शहापुर येथे मनोरुग्ण महिला सापडली अण्णावाचून शहापूर येथील दुकानासमोर भिक मागत उभी होती सदरील दुकानदाराने धाकलागाव म्हणीयात्री मनमंदिर चे अध्यक्ष महादेव पवार यांना लगेच माहिती दिली लगेच पवार हे आपल्या पत्नीसह त्या महिलेला अन्नासाठी शहापूर येथे गेले व त्या मनोरुग्ण महिलेला घेऊन मनमंदिर मध्ये घेऊन आले व सदरील मनोरुग्ण महिलेची माहिती गोद्री पोलिस स्टेशन प्रमुखांना दिली व गोद्री पोलीस प्रशासनाच्या सांगण्यावरून ते मनोरुग्ण महिलेची घेऊन गोंदी पोलीस स्टेशन येथे घेऊन गेले तेथे गेले असता पवार यांना गोद्री पोलीस प्रशासन यांना सदरील मनोरुग्ण महिलेची पूर्ण माहिती दिली व पोलीस प्रशासन गोद्री यांना पवार यांना पत्र दिल कि सदरील मनरुग्ण महिलेला अंबड येथील उपजिल्हा रुग्णालय सिव्हिल हॉस्पिटल अंबड येथे घेऊन जावे पवार हे कुठल्या विलंब न लावता सदरील महिलेला सिविल हॉस्पिटल अंबड येथे घेऊन गेले असता सदरील मनोरुग्ण महिलाला डॉ. यांनी पूर्ण तपासणी केली व लगेच डॉ. यांनी सदरील महिलेची पूर्ण टेस्ट करायचे सांगितले व लगेच डॉ. यांच्या आदेशाने त्यांच्या टीमने सदरील मनोरुग्ण



महिलेच्या पूर्ण टेस्ट केल्या नंतर काही वेळाने सदरेल मनोरुग्ण महिलेचे पूर्ण रिपोर्ट आल्यानंतर डॉ. रिपोर्ट बघून डॉ. यांच्या असे लक्षात आले की सदरील महिला ही गरोदर आहे असे पवार यांना सांगितल दवाखान्याचा उपचार व डॉ यांच्या सल्ल्याने पवार हे सदरील मनोरुगृण महिलेला घेऊन मनमंदिर धाकलगाव येथे घेऊन आली सदरील मनोरुग्ण महिला हिने आज आज दि १/८२०२५ वार सोमवार रोजी तीने गोंडस बाळाला जन्म दिला या परिसरात म्हणीयात्री मनमंदिरचे अध्यक्ष महादजी पवार यांच्या परिसरातून कौतुक होत आहे महादेव पवार व त्यांच्या पत्नीशी यांचे संपर्क साधला असता जनसेवा हीच ईश्वरसेवा व्यसन सोडा माणसं जोडा हीच खरी ईश्वरसेवा आहे असं पवार यांनी सांगितलं.

## पेशवा युवा गणेश मंडळ प्रथम बक्षीसात बाजी मारणार!



तभा वृत्तसेवा
जाफ्राबाद / प्रतिनिधी

जाफ्राबाद मध्ये यावर्षी एकूण १३ सार्वजनिक गणेश मंडळात श्री गणेशाचे स्थापना करण्यात आली येथील ब्राह्मण गल्लीमधील पेशवा युवा गणेश मंडळात पेन येथून आकर्षक मूर्ती आणून गणेश मूर्तीची स्थापना करण्यात आली. मूर्ती समोर अत्यंत रेखीव सजावट करून सनातन धर्मातील संस्कृतीनुसार मंडप डेकोरेशन अखंड भारत मातेची हातात भगवा ध्वज घेऊन उभे तैलचित्र प्रवेशद्वारा जवळील सर्वांचे लक्ष वेधणारे गणेश उत्सवाचे जनक लोकमान्य टिळक व हिंदू धर्माची आन-बान शान असलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे चार फूट उंचीचे तैलचित्र लावलेले आहे. याचबरोबर सामाजिक बांधिलकी राहावे म्हणून रक्तदान शिबिर सुद्धा आयोजित करण्यात आले आहे. दिनांक ३ सप्टेंबर रोजी संभाजीनगर येथील विलास कुलकर्णी यांचा जगदंब भजनी मंडळाचा सुश्राव्य कार्यक्रम आयोजित केलेला आहे मंडळामध्ये सकाळी साडेआठ वाजता व रात्री साडेआठ वाजता श्रीची आरती करण्यात येते या अगोदर सकाळी गणपती अथर्वशीर्ष पाठ वेदोक्त मंत्र म्हणून केल्या जातात याचबरोबर मंडळामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमावर भर देण्यात आला आहे. पेशवा युवा गणेश मंडळाचे अध्यक्ष वैभव मुळे यांच्यासह सर्व जबाबदारीने कार्यक्रम पार पाडण्यासाठी सर्वश्री अनिरुद्ध मुळे, गोपाळ डाकेफळे, मधुर मुळे, चेतन बायस, गणेश मुळे, सौरभ मुळे, नितीन भवर, विवेक मुळे, वल्लभ मुळे, रामू ढाकेफळे, ओम गौतम, विवेक काकडे, अक्षय देशपांडे, प्रणव गौतम, अक्षय मुळे, अर्जुन मुळे, सुरेश मुंगीकर, टोणपे हे कार्यकर्ते दररोज होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये हिरीरीने भाग घेत आहे.

## गणेशउत्सवातून आपण केवळ पूजा-अर्चा करत नाही, तर आपल्या सांस्कृतिक वारशाला जपतो - आ. बबनराव लोणीकर

### जिल्हा भाजपा कार्यालयात स्थापन श्री गणेशाच्या महाआरतीस आ. बबनराव लोणीकर यांची प्रमुख उपस्थिती

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

गणेशउत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून, आपल्या संस्कृतीचा, एकतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा उत्सव आहे. भगवान गणेश हे विघ्नहर्ते तर आहेतच, पण ते बुद्धी, विवेक आणि नव्या सुरुवातीचे प्रतीक देखील आहेत. आजच्या या शुभदिनी आपण सर्वांनी संकल्प करूया की, आपण आपल्या समाजात प्रेम, बंधुभाव आणि सकारात्मक बदल घडवून आणू असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री परतुर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष लोकप्रिय आ. बबनराव लोणीकर यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री, परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान कर्तव्यदक्ष आ. बबनराव लोणीकर यांनी आज दिनांक ०१ सप्टेंबर २०२५ रोजी सोमवारी जालना शहरात असलेल्या भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय जालना येथे उपस्थित राहून भाजपा कार्यालयात स्थापन केलेल्या श्री गणेशाची मनोभावे पूजा प्रार्थना करत आरती केली या भारतीय जनता पार्टी आयोजित श्री गणेशाच्या महाआरतीनंतर उपस्थित भाविक भक्त व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत असताना ते बोलत होते. पुढे बोलताना आ. बबनराव लोणीकर म्हणाले की आपला हा गणेशोत्सव अनेक वर्षांपासून आपल्या परंपरेचा एक अविभाज्य भाग आहे. या उत्सवातून आपण केवळ पूजा-अर्चा करत नाही, तर आपल्या सांस्कृतिक वारशाला जपतो. गणेशोत्सवात होणारे सांस्कृतिक कार्यक्रम, भजन, कीर्तन, नाट्य, आणि सामाजिक उपक्रम आपल्या समाजाला एकत्र आणतात. आपल्या सर्वांच्या सहकार्याने आपण आपल्या परिसरात विकास, शिक्षण आणि एकतेचे नवे पर्व सुरू करू. गणपती बाप्पांच्या आशीर्वादाने आपण सर्व मिळून आपला समाज अधिक मजबूत आणि समृद्ध करू. या प्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष जालना शहर भास्करआबा दानवे, रामेश्वरजिजा भांदर्गे, राजेश राऊत, विजय कामड, अशोक पांगरकर, सुजित जोगस, अंकुशराव बोबडे, संजय देठे, ओमप्रकाश चितळकर, बाबासाहेब कोलते, कैलास शेळके, अशोक पवार, शिवराज नारीयलवाले, संजय आटोळे, रोहित नलावडे, शुभम जयस्वाल अंकुश होंडे, सदाशिव यादव, नारायण पवार, सचिन गाडे, अर्जुन गोरक्षक यांच्या संस्थेकडे भारतीय जनत पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



# ‘द्वारकाधीश’ मंडळाकडून मुंबईत २५ क्विंटल खिचडी वाटप

## संवेदनशीलतेचे उत्तम उदाहरणं म्हणजे समाजसेवक परशुराम गुरखुदे









**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ सप्टेंबर**

मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील मुंबईत उपोषणाला बसले आहेत. त्यांना पाठिंबा म्हणून बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रभरातून मराठा बांधव मुंबईत दाखल झाले आहेत. पाठिंबा देणाऱ्या बांधवांची संख्या जास्त असल्या कारणाने अनेकांची गैरसोय होत आहे. अनेक बांधवाना पाणी, जेवण सुद्धा मिळत नाही. हे पाहता बीडमधील समाजसेवक, कायम सामाजिक कार्यात सक्रिय असणारे परशुराम भैय्या गुरखुदे यांनी मराठा बांधवांची होत असलेले हेळसांड बघून २५ क्विंटल खिचडी द्वारकाधीशच्या माध्यमातून वाटप करण्यात आली आहे. परशुराम भैय्या हे नेहमीच सामाजिक कार्यात तत्पर असतात. कोरोनाच्या काळात देखील द्वारकाधीश ग्रुपच्या माध्यमातून त्यांनी अन्न साखळी निर्माण केली होती.

दररोज शेकडो कुटुंबाना ‘द्वारकाधीश’च्या मार्फत जेवण मिळायचे. मनाने दिलदार असणाऱ्या भैय्यांना राजा सारखं मन, मना सारखा राजा म्हणणं देखील चुकीचे ठरणार नाही. अडचणीत येणारा व्यक्ती कोणत्याही जाती धर्माचा आहे हे कधी भैय्यांनी पहायलच नाही. आत्तापर्यंत अनेकांना मदतीचा हात भैय्यांनी दिला आहे. आणि यामुळेच भैय्यांवर आजपर्यंत कोणी आरोप प्रत्यारोप करू शकले नाही. राजकारणापासून कोसोदूर असणारा हा नेता मनाने संवेदनशील आहे इतरांच दुःख म्हणजे आपलं दुःख हे समजून आपले सामाजिक जिवन जगणारा हा नेता सर्वांना हवाहवासा वाटतो अगदी लहानापासून ते थोरमोठ्यापर्यंत.







काल जेष्ठगौरी लक्ष्मीपूजन संपन्न झाले. त्यानिमित्त बीडच्या भाजी मंडई मध्ये विविध प्रकारच्या फळे भाज्या, रांगोळी विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात आली होती. (छाया कृष्णा शिंदे बीड)

## लिंबागणेशचे श्रीकृष्ण कानिटकर यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ सप्टेंबर**



बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जेष्ठ नागरिक व माजी ग्रामपंचायत सदस्य,शेतीनिष्ठ शेतकरी श्रीकृष्ण मोरेश्वरराव कानिटकर वय ७७ यांचे रविवारी दुपारी ३.२० वाजता संभाजीनगर येथील खाजगी रूग्णालयात उपचारा दरम्यान निधन झाले.

कृष्णा बाबा या नावाने गावात परिचीत असलेले कानिटकर यांचा धार्मिक, सामाजीक कार्यात मोठा सहभाग होता. गावात पाणीटंचाई असतांना त्यांनी स्वत:च्या शेतातील पीकाची पर्वा न करता गावातील लोकांना मोफत पाणी देवुन त्यांची तहान भागवली. येथील ग्रामपंचायतीवर अनेकवेळा ते सदस्य म्हणून निवडून गेले होते. वृध्दापकाळाने मागील सहा दिवसांपासून संभाजीनगर येथील खाजगी रूग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात येत होते. उपचार सुरू असतांना रविवारी दुपारी त्यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थीवावर रविवारी रात्री साडेआठ वाजता वाजता गावातील भालचंद्र मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याजवळील स्मशानभुमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात दोन विवाहित मुली, जावई ,एक मुलगा असा परिवार आहे.

## इंद्रजित देशमुख यांच्या उपस्थितीत शिक्षक दिनी होणार वितरण

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१ सप्टेंबर**

शारदा प्रतिष्ठानच्या १७ व्या आदर्श शिक्षक पुरस्कारांची घोषणा कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी केली आहे. शिक्षक दिनी दि. ५ सप्टेंबर रोजी सुप्रसिद्ध व्याख्याते इंद्रजित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिष्ठानकडुन ११ आदर्श शिक्षकांचा गेवराई येथे गौरव होणार आहे. यावेळी मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ देवुन आदर्श शिक्षकांचा सपत्नीक गौरव केला जाणार आहे. अमरसिंह पंडित यांच्या अध्यक्षतेखाली होणार्या समारंभास आ. विजयसिंह पंडित यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी शिक्षक बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शारदा प्रतिष्ठानचे सचिव भाऊसाहेब नाटकर यांनी केले आहे.

## बीड जिल्हा ग्राहक पंचायत व ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेकडून हर्षद मोरे यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१ सप्टेंबर**

गेवराई येथील न्यू ईरा पब्लिक पब्लिक स्कूल शाळेमधून इयत्ता दहावी परीक्षांमध्ये (८५.८०) टक्के गुण घेऊन शाळेत तृतीय क्रमांक येण्याचा बहुमान मिळविला आहे. त्यांच्या यशाबद्दल बीड ग्राहक पंचायत महाराष्ट्र व श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था गेवराई यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिक कार्यालय विरंगुळा केंद्र नगरपरिषद गेवराई येथे सत्कार करण्यात आला.

हर्षद शिवाजी मोरे यांनी इयत्ता दहावी मध्ये (८५.८०) घेऊन तृतीय क्रमांक घेऊन यश संपादन केले आहे त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलक्याची व बिकट असताना व त्यांचे वडील सन २०१२ मध्ये मयत असताना तेव्हापासून हर्षद अथंग मेहनत करून परिश्रम करून सातत्यपूर्ण अभ्यास करून यश संपादीत करीत आहे. त्याची दखल संस्थेकडून घेऊन त्यांचा सत्कार करण्यात आला व त्यांना पुढील वाटचालीबद्दल हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या व त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे. याप्रसंगी बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष तथा श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक अध्यक्ष अनिल बोर्डे, ॲड बी एम मुळे विश्वास चपळगावकर रामेश्वर वाघमारे अभिषेक पाटेकर आदी उपस्थित होते.

## हुतात्मा स्मारकाची होणार स्वच्छता आणि रंगरंगोटी



## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या कार्यक्रमासाठी प्रशासन सज्ज

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ सप्टेंबर**

आगामी १७ सप्टेंबर रोजी बीड शहरातील हुतात्मा स्मारकावर आयोजित कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर सोमवार दिनांक १ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या सूचनेनुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्मारकाची पाहणी केली . जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, तहसीलदार चंद्रकांत शेळके, नगरपरिषद मुख्याधिकारी शैलेश फडसे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता चंद्रकांत बोराडे यांनी स्थळाला भेट देऊन आवश्यक कामांची तपासणी केली .

यावेळी स्मारक परिसरातील स्वच्छता , रंगरंगोटी आणि व्यवस्थापन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली . नगरपरिषदेचे नगर अभियंता किरण देशमुख , मंडळ अधिकारी सचिन सानप , ग्राम महसूल अधिकारी शब्बीर शेख , स्वच्छता विभाग प्रमुख भागवत जाधव आणि स्वच्छता निरीक्षक आयुब शेख आदी अधिकारीही या पाहणीवेळी उपस्थित होते. प्रशासनाने स्मारक परिसर स्वच्छ , आकर्षक आणि सुव्यवस्थित ठेवण्याच्या सूचना दिल्या असून नागरिकांच्या सहभागातून हुतात्म्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी तयारी करण्यात येत आहे . १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या कार्यक्रमासाठी सर्व यंत्रणा सज्ज राहणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## सेवा पंधरवडा : जनतेच्या समस्या सोडवण्याचा लोकाभिमुख उपक्रम

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या जयंतीनिमित्त दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दिनांक २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राज्यभर सेवा पंधरवडा राबवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे . महसूल व वन विभागाच्या माध्यमातून हा उपक्रम राबवण्यात येणार असून यामध्ये सामान्य जनतेच्या दैनंदिन समस्या , शेतकऱ्यांच्या अडचणी आणि नागरिकांच्या तक्रारी सोडवण्यासाठी विशेष मोहीमा राबवल्या जाणार आहेत .

जनतेच्या हिताचा विचार करणारा शासन निर्णय म्हणजेच लोकाभिमुख प्रशासन . याच धर्तीवर शासनाने तीन टप्प्यांमध्ये हा उपक्रम उभारला आहे . पहिला टप्पा – पाणंद रस्ते विषयक मोहीम – शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत जाणाऱ्या पाणंद रस्त्यांचे संरक्षण , नोंद नसलेल्या रस्त्यांची नोंद घेणे , शेतजमिनीपर्यंत रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी सीमांकन , रस्ता अडथळे दूर करणे अशा कामांवर भर दिला जाणार आहे .

पिके लावूनही जर रस्ता नसेल, तर शेतकरी काय करील ?
धान्य द्यायला रस्ता नसेल, तर भाकर कोण शिजवील ?

या प्रश्नांची उत्तरे शासनाने या मोहिमेतून शोधण्याचा प्रयत्न केला आहे . दुसरा टप्पा – सर्वांसाठी घरे व पात्रांना पट्टे वाटप : दिनांक २३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबरदरम्यान या टप्प्यात ’ सर्वांसाठी घरे ’ या योजनेअंतर्गत राहिवाशांना शासकीय जमिनीवरील नियमित हक्क देणे , झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन , शेतकऱ्यांना पट्टे वाटप , तसेच गरजूंना कायमस्वरूपी मालकीचा अधिकार देण्याचे काम केले जाणार आहे .



घर हेच सुखाचं मूळ,
घराशिवाय संसार कसा फुल ?
शेतकऱ्याला जमीन, नागरिकाला घर,
यातूनच दिसेल समृद्धीचा दरबार !

तिसरा टप्पा – नावीण्यपूर्ण उपक्रम – दिनांक २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान जिल्हाधिकारी स्थानिक समस्यांवर उपाययोजना राबवतील . पाणी , जमीन , आरोग्य , शिक्षण यासंबंधी जिल्ह्यातील स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासन पुढाकार घेईल . यातूनच शासनाचा लोकाभिमुखताचा चेहरा अधिक स्पष्ट होईल .

हा निर्णय शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे . कारण पाणंद रस्त्यांची समस्या वर्षानुवर्षे शेतकरी अनुभवत आहेत . शेतमाल बाजारात पोचवण्यासाठी रस्त्यांची सुविधा हा शेतकऱ्यांचा मुलभूत अधिकार आहे . घर आणि जमिनीवरील हक्क ही तर प्रत्येक नागरिकाची गरज आहे . शासनाने या उपक्रमातून त्या समस्या दूर करण्याचे वचन दिले आहे .

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे – सोनवणे, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, अधीक्षक भूमी अभिलेख तसेच उपअधीक्षक भूमी अभिलेख यांच्या प्रयत्नातून नागरिकांच्या तक्रारी व अडचणी तातडीने सोडवण्याचे काम सुरू आहे . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनीही पुढाकार घेऊन वादग्रस्त रस्ते मोकळे करणे , सस्ती अदालतांचे आयोजन करणे आणि नागरिकांना प्रत्यक्ष न्याय देणे अशा अनेक उपक्रमांत सक्रिय सहभाग नोंदवला आहे.

मागील शासन निर्णयांचा संदर्भ घेतल्यास , ग्रामविकास विभागाचा दिनांक १६.०२.२०१८ चा निर्णय , नगरविकास विभागाचा दिनांक ११.०९.२०१८ चा निर्णय , तसेच महसूल विभागाचे १९९६ पासूनचे विविध निर्णय हे सर्व या उपक्रमाशी जोडले गेले आहेत . म्हणजेच, हा उपक्रम केवळ औपचारिक नसून, आधीच्या निर्णयांना नवा गतीमान वेग देणारा आहे.

रस्ता मिळाला, तर पिके बाजारात पोहोचतील ,
घर मिळालं, तर संसार उजळून निघेल ,
हक्क मिळाला, तर न्याय अनुभवता येईल ,
सेवा पंधरवडा जनतेचा दीप उजळवेल !

या उपक्रमात स्थानिक लोकप्रतिनिधी, पंचायत समिती , ग्रामपंचायत सदस्य , शेतकरी , नागरिक सर्वांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे . म्हणूनच सेवा पंधरवडा हा केवळ उपक्रम नाही , तर तो जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी शासनाचा संकल्प आहे . छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या माध्यमातून सुरू झालेला हा लोकाभिमुख प्रवास राज्यातील शेतकरी व नागरिकांसाठी नवा आशेचा किरण ठरेल यात शंका नाही .